MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग




## वार्षिक अहवाल २०१७–२०१८

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## वार्षिक अहवाल

## २०१७-२०१८

# अनुक्रमणिका


१. **आयोगाची स्थापना व कार्ये** ........ १

२. **आयोगाचा संरचनात्मक तक्ता** ........ २

२.१ अध्यक्ष व सदस्य ........ २

२.२ आयोगाच्या आस्थापनेवरील कर्मचारी ........ २

२.३ सल्लागार ........ ३

३. **राज्य सल्लागार समिती** ........ ४

४. **महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्रातील परिस्थिती** ........ ५

४.१ वीज निर्मिती ........ ५

४.२ विजेचे पारेषण ........ ६

४.३ विजेचे वितरण ........ ७

४.४ नूतनशील ऊर्जा ........ ८

५. **महत्त्वाचे प्रश्न** ........ १०

५.१ नूतनशील ऊर्जेच्या वाढीस चालना देणे ........ १०

५.२ वीज मागणी व्यवस्थापन ........ ११

५.३ पारेषण नियोजन ........ १२

महापारेषण कंपनीने कार्यान्वित केलेल्या योजना ........ १४

५.४ मंजूर केलेले परवाने ........ १४

६. **वीज दराचे आणि अन्य निवडक आदेश** ........ १६

७. **तत्त्वतः मंजुरी दिलेली महत्वाची भांडवली गुंतवणूक** ........ ३५

८. **विनियम** ........ ३६

९. **ग्राहक गाऱ्हाणे निवारण यंत्रणा** ........ ३७

९.१ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच ........ ३७

९.२ विद्युत लोकपाल ........ ३९

१०. **माहितीचा अधिकार** ........ ४०

११. **वार्षिक लेखे - एक दृष्टीक्षेप ( आर्थिक वर्ष २०१७-१८ )** ........ ४१

**परिशिष्ट- १ :** दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षासाठी आय-व्यय लेखा ........ ४३

**परिशिष्ट- २ :** आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये आयोगाने पारित केलेले आदेश ........ ४६

# १. आयोगाची स्थापना व कार्ये

विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ च्या अंतर्गत, महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ ऑगस्ट, १९९९ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची स्थापना केली असून आयोगात अध्यक्ष व दोन सदस्य आहेत. आयोगाकडे (एक) अर्ध-न्यायिक, (दोन) अर्ध-वैधानिक आणि (तीन) कार्यकारी स्वरुपाची कामे सोपविण्यात आली आहेत. सदर अधिनियमांतर्गत आयोगाकडे सुरुवातीला खालील कार्ये सोपविण्यात आली होती :-

अ) राज्यातील घाऊक, ठोक, ग्रिड किंवा किरकोळ वीज विक्रीचे दर निश्चित करणे;

ब) पारेषण सुविधेचा वापर करण्यासाठी पारेषण दर निश्चित करणे;

क) राज्यातील विजेचे पारेषण, विक्री, वितरण आणि पुरवठा करण्यासाठी निर्मिती कंपन्या, किंवा अन्य 'स्त्रोतांकडून ज्या किंमतीने वीज प्राप्त करुन घेण्यात येईल त्या किंमतीसह पारेषण कंपन्या आणि वितरण कंपन्यांच्या विजेची खरेदी आणि वीज प्राप्त करुन घ्यावयाच्या प्रक्रियेचे नियमन करणे;

ड) या अधिनियमाची उद्दिष्टे व हेतू साध्य करण्यासाठी, वीज उद्योगात स्पर्धा, कार्यक्षमता व काटकसरीस चालना देणे.

जून २००३ मध्ये विद्युत अधिनियम, २००३ अंमलात आल्यानंतर विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ रद्द झाला व आयोगाकडे खालील अन्य अतिरिक्त कार्ये सोपविण्यात आली :-

अ) विजेचे राज्यांतर्गत पारेषण व वहन सुकर करणे;

ब) विजेचे पारेषण, वितरण आणि विजेचा व्यापार करण्यासाठी परवाना देणे;

क) नूतनशील उर्जा स्त्रोतांपासून सह-निर्मितीस आणि वीज निर्मितीस चालना देणे;

ड) परवानाधारक आणि वीज निर्मिती कंपन्या यांच्यामधील आणि परवानाधारकांमधील आप-आपसातील वादासंबंधी अभिनिर्णय देणे आणि वाद लवादाकडे संदर्भ करणे;

इ) या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता शुल्क लावणे;

फ) राज्य ग्रिड संहिता विनिर्दिष्ट करणे;

ग) परवानाधारकांच्या सेवेची गुणवत्ता, सातत्य व विश्वासार्हता यांची मानके विनिर्दिष्ट करणे किंवा अंमलात आणणे;

ह) राज्यांतर्गत विजेच्या व्यापारासाठी, आवश्यकता असल्यास, नफ्याचे प्रमाण निश्चित करणे;

ज) या अधिनियमाखाली सोपविण्यात येतील अशी अन्य कार्ये पार पाडणे;

य) विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(२) अंतर्गत राज्य शासनास सल्ला देणे.

# २ आयोगाचा संरचनात्मक तक्ता

## २.१ अध्यक्ष व सदस्य

श्री. आनंद भि. कुलकर्णी यांनी दिनांक ०९.०८.२०१७ रोजी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला. श्री. अज़ीज एम. खान आणि श्री. दीपक लाड हे सदस्य म्हणून या वर्षात पुढेही कार्यरत होते.

## २.२ आयोगाच्या आस्थापनेवरील कर्मचारी

महाराष्ट्र शासनाने विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ अंतर्गत आयोगावर सोपविण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी आयोगाच्या आस्थापनेवर सुरुवातीला जून, २००० मध्ये २४ पदे मंजूर केली होती. त्यानंतर, मार्च, २०१० मध्ये आयोगावर विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत सोपविण्यात आलेल्या व्यापक कार्यांतून निर्माण झालेली वाढीव कामे पार पाडण्यासाठी शासनाने आयोगास अतिरिक्त ३९ पदे मंजूर केली. या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

**३१ मार्च, २०१८ रोजीची कर्मचाऱ्यांची माहिती**

| अनु क्रमांक | पदाचे नांव | मंजूर पदांची संख्या | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | सचिव | १ | १ | ० |
| २. | कार्यकारी संचालक | १ | १ | ० |
| ३. | संचालक (विद्युत अभियांत्रिकी) | २ | १ | १ |
| ४. | संचालक (वीज दर) | २ | ० | २ |
| ५. | संचालक (विधी) | १ | ० | १ |
| ६. | संचालक (प्रशासन व वित्त) | १ | ० | १ |
| ७. | उप-संचालक (तांत्रिक) | ८ | ८ | ० |
| ८. | उप-संचालक (विधी) | ४ | २ | २ |
| ९. | उप-संचालक (प्रशासन व वित्त) | ४ | २ | २ |
| १०. | अवर सचिव | १ | १ | ० |
| ११ | कक्ष अधिकारी | २ | २ | ० |
| १२. | सहाय्यक संचालक | ४ | १ | ३ |
| १३. | संगणक प्रणाली प्रशासक | १ | ० | १ |
| १४. | डेटाबेस/वेब प्रशासक | १ | १ | ० |
| १५. | सहाय्यक लेखा अधिकारी | १ | ० | १ |

| अनु क्रमांक | पदाचे नांव | मंजूर पदांची संख्या | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १६. | स्वीय सहाय्यक (निवड श्रेणी) | ३ | ३ | ० |
| १७. | स्वीय सहाय्यक (उच्च श्रेणी) | २ | १ | १ |
| १८. | उच्च श्रेणी लघुटंकलेखक (इंग्रजी) | १ | ० | १ |
| १९. | उच्च श्रेणी लघुटंकलेखक (मराठी) | १ | ० | १ |
| २०. | स्वागतकार-नि-दूरध्वनी चालक-नि-कार्यालय सहाय्यक | १ | १ | ० |
| २१. | लिपिक-टंकलेखक-नि-कार्यालय सहाय्यक | ७ | ३ | ४ |
| २२. | ग्रंथपाल-नि-कार्यालयीन सहाय्यक | १ | १ | ० |
| २३. | वाहन चालक-नि-सामान्य सहाय्यक | ५ | ४ | १ |
| २४. | शिपाई | ८ | ७ | १ |
| | **एकूण** | **६३** | **४०** | **२३** |

## २.३ सल्लागार

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ९१(४) अंतर्गत, आयोग आपली कर्तव्ये पार पाडण्याकरिता त्यास मदत करण्यासाठी कुशल सल्लागारांची नियुक्ती, विहित करण्यात येतील त्या अटी व शर्तींवर, करु शकतो. आयोगाने मविनिआ (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम, २००४ अधिसूचित केले आहेत. आयोग, आवश्यक असेल तेव्हा, विविध तांत्रिक, वित्तीय, कायदेविषयक व प्रशासकीय स्वरुपाची कार्ये पार पाडताना त्यास मदत करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करतो.

## ३. राज्य सल्लागार समिती

आयोगाकडून विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८७ अंतर्गत राज्य सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य सल्लागार समिती स्थापण्यामागचे उद्देश (एक) महत्त्वाच्या धोरणात्मक प्रश्नांबाबत; (दोन) परवानाधारकांनी पुरविलेल्या सेवेचा दर्जा, सातत्य आणि व्याप्तीशी संबंधित बाबींबाबत; (तीन) परवानाधारकांनी त्यांच्या परवान्याच्या अटी व आवश्यकतांचे पालन करण्याबाबत; (चार) ग्राहक हिताचे रक्षण करण्याबाबत आणि (पाच) विद्युत कंपन्यांचा ऊर्जा पुरवठा आणि त्यांच्या एकूण कामगिरीच्या दर्जाबाबत, आयोगास सल्ला देणे, हे आहेत. राज्य सल्लागार समिती (एस ए सी) दर दोन वर्षांनी पुनर्गठीत करण्यात येते. आयोगाचे अध्यक्ष हे राज्य सल्लागार समितीचे अध्यक्ष आहेत व आयोगाचे सदस्य हे या समितीचे पदसिध्द सदस्य आहेत. आयोगाचे सचिव हे राज्य सल्लागार समितीचे सदस्य-सचिव आहेत. आयोगाने, समितीच्या सदस्यांचा कार्यकाल २२ ऑगस्ट, २०१६ रोजी संपल्यानंतर, राज्य सल्लागार समितीचे पुनर्गठन दोन वर्षांच्या कालावधीसाठी खालील सदस्यांसह केले:-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष, मविनिआ | - | पदसिध्द अध्यक्ष |
| २. | सदस्य, मविनिआ (एक) | - | पदसिध्द सदस्य |
| ३. | सदस्य, मविनिआ (दोन) | - | पदसिध्द सदस्य |
| ४. | सचिव, मविनिआ | - | सदस्य-सचिव |
| ५. | सचिव, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन | - | पदसिध्द सदस्य |
| ६ | सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन | - | पदसिध्द सदस्य |
| ७. | सह सचिव, नूतन व नूतनशील ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली | - | सदस्य |
| ८. | महा व्यवस्थापक / मुख्य अभियंता (विद्युत), मध्य रेल्वे, मुंबई | - | सदस्य |
| ९. | परिमंडल व्यवस्थापक (पचिम परिमंडल), ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ मर्यादित, मुंबई | - | सदस्य |
| १०. | महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर, मुंबई | - | सदस्य |
| ११. | फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री, (एफआयसीसीआय) महाराष्ट्र स्टेट कॉन्सिल, मुंबई | - | सदस्य |
| १२. | कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय), महाराष्ट्र स्टेट कॉन्सिल, मुंबई | - | सदस्य |
| १३. | प्रयास, (ऊर्जा ग्रुप), पुणे | - | सदस्य |
| १४ | अध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत, मुंबई | - | सदस्य |
| १५. | अध्यक्ष, ठाणे-बेलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन, नवी मुंबई, | - | सदस्य |
| १६. | महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना, इचलकरंजी, जिल्हा - कोल्हापूर | - | सदस्य |
| १७. | टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई | - | सदस्य |
| १८. | इंदिरा गांधी इन्स्टिट्युट ऑफ डेव्हलेपमेंट रिसर्च, मुंबई | - | सदस्य |
| १९. | मुख्य कार्यकारी अधिकारी, इंडियन एनर्जी एक्सचेंज लि., मुंबई | - | सदस्य |
| २०. | संचालक, (विद्युत अभियांत्रिकी विभाग), इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई | - | सदस्य |
| २१. | अध्यक्ष, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन, नागपूर | - | सदस्य |

# ४. महाराष्ट्राच्या विद्युत क्षेत्रातील परिस्थिती

## ४.१ वीज निर्मिती

राज्याची विजेची गरज, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, खाजगी वीज निर्मिती कंपन्या (स्वतंत्र वीज निर्माते (आयपीपी)), केंद्रीय क्षेत्रातून मिळणारा वाटा आणि नूतनशील ऊर्जा निर्माते यांच्याकडून, भागविण्यात येते. महाराष्ट्राची ऊर्जेची गरज आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता १५४२१५ दक्षलक्ष युनिट्स इतकी होती व त्यापैकी ३४.२० टक्के महानिर्मिती कंपनीकडून, ३०.५८ टक्के केंद्रीय क्षेत्राच्या वाटातून, २३.५१ टक्के स्वतंत्र वीज निर्माते, ४.३६ टक्के नूतनशील ऊर्जा निर्माते, ७.३५ टक्के मुंबईतील निर्मात्यांकडून - (टाटा पॉवर कंपनी लि. - निर्मिती (टीपीसी-निर्मिती) आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. - निर्मिती (आरइन्फ्रा-निर्मिती)कडून भागविण्यात आली.

राज्याच्या एकूण स्थापित क्षमतेमध्ये, महानिर्मिती कंपनीचा १३४७२ मेगावॅट्सचा प्रमुख वाटा आहे. यामध्ये औष्णिक निर्मिती क्षमता १०१७० मेगावॅट्स, जल-विद्युत निर्मिती क्षमता २४५० मेगावॅट्स, वायुवर आधारित निर्मिती क्षमता ६७२ मेगावॅट्स आणि १८० मेगावॅट्स सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेचा समावेश होता. महानिर्मिती कंपनीची निर्मिती केंद्रे राज्यभर पसरली असून त्यामध्ये चंद्रपूर, कोराडी, पारस, परळी, भुसावळ, खापरखेडा, आणि नाशिक या औष्णिक केंद्रांचा, उरण येथील वायुवर आधारित प्रकल्पाचा आणि कोयना, वैतरणा, भिरा, घाटघर (पंप स्टोअरेज) या जल-विद्युत प्रकल्पांचा समावेश आहे. महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) या राज्य शासनाच्या वितरण कंपनीशी दीर्घ-कालिन वीज खरेदी करार केला आहे.

महानिर्मिती कंपनीशिवाय, काही स्वतंत्र वीज निर्माते (आयपीपी) देखील राज्यातील वितरण परवानाधारकांना वीज पुरवठा करतात. राज्यातील काही प्रमुख स्वतंत्र वीज निर्माते खालीलप्रमाणे आहेत:-

### महाराष्ट्रातील प्रमुख स्वतंत्र वीज निर्माते

| अ.क्र. | स्वतंत्र वीज निर्माते (आयपीपी) | स्थापित क्षमता (मेगावॅट) |
|---|---|---|
| **वितरण परवानाधारकांबरोबर वीज खरेदी करार केलेले** | | |
| १ | अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड, तिरोडा | ३३०० |
| २ | जेएसडब्ल्यु एनर्जी लि., रत्नागिरी | १२००* |
| ३ | रत्तनइंडिया पॉवर लि., अमरावती | १३५० |
| ४ | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि. बुटीबोरी | ६०० |
| **वितरण परवानाधारकांबरोबर वीज खरेदी करार न केलेले** | | |
| ५ | रत्तनइंडिया पॉवर लि., नाशिक | ५४० |
| ६ | वर्धा पॉवर कंपनी लि., चंद्रपूर | ५४० |
| ७ | अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि., नागपूर | २४६ |
| ८ | गुप्ता एनर्जी प्रा. लि. चंद्रपूर | १२० |
| ९ | आयडिअल एनर्जी प्रोजेक्ट्स लि. नागपूर | २७० |
| १० | धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ३०० |
| ११ | अन्य स्व-वापरासाठीचे वीज निर्माते/ स्वतंत्र वीज निर्माते | ६५९.४ |
| | **एकूण** | **९१२५.४** |

**एकूण क्षमतेच्या काही भागासाठी वीज खरेदी करार*

### मुंबईतील स्थापित निर्मिती क्षमता

| अनु. क्र. | कंपनी | स्थापित क्षमता ( मेगावॅटमध्ये ) |
|---|---|---|
| १ | टाटा पॉवर कं. लि. – निर्मिती (औष्णिक आणि जल) | १३७७ |
| २ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. – निर्मिती / (डहाणू औष्णिक विद्युत केंद्र) | ५०० |
| | **एकूण** | **२३७७** |

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लिमिटेडने (महानिर्मिती कंपनी) (पूर्वीची एमएसईबी) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडशी (महावितरण कंपनी) वीज खरेदी करार केला असून दोन्ही राज्य सरकारी कंपन्या आहेत.

आयोगाने, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६२ मधील तरतुदींनुसार नियामक चौकटीअंतर्गत आवश्यक असलेल्या जनतेशी सल्ला–मसलतीच्या उचित प्रक्रियेनंतर महानिर्मिती कंपनीचे वीज दर निश्चित केले.

राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळाच्या (एनटीपीसी) कोर्बा, विंध्याचल, कावास, गंधार, सिपत, मौदा, इ. आणि भारताचे अणुशक्ती विद्युत महामंडळ लि. (एनपीसीआयएल) च्या तारापूर येथील प्रकल्पामधून केंद्रीय क्षेत्रातील विजेचा वाटा पुरविण्यात आला. महावितरण कंपनी सरदार सरोवर प्रकल्प (एसएसपी), पेंच, रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रा.लि. (आरजीपीपीएल) आणि कोस्टल गुजरात पॉवर लि. (सीजीपीएल), युएमपीपी मुंद्रा यासारख्या अन्य वीज निर्मिती प्रकल्पांमधून वीज घेत आहे.

## ४.२ विजेचे पारेषण

विजेचे पारेषण हे एक विद्युत यंत्रणेचे महत्त्वाचे कार्य असते आणि निर्मिती केंद्रातून मोठा प्रमाणावर विजेचे निष्कासन करण्यासाठी आणि अंतिमत: ग्राहकांपर्यंत वीज पोहोचवण्यासाठी पारेषणाची आवश्यकता असते. विविध पारेषण परवानाधारकांच्या पारेषण यंत्रणांना एकत्रितपणे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा असे म्हणतात. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन करण्याची जबाबदारी राज्य पारेषण कंपनी (एसटीयु), म्हणजेच महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीवर (महापारेषण) असते. महाराष्ट्रात खालीलप्रमाणे नऊ पारेषण परवानाधारक आहेत–

### पारेषण परवानाधारक

| अ.क्र. | परवानाधारक | परवाना क्र. | परवानाचा दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि., (महापारेषण कंपनी ) | मानीव परवानाधारक | |
| २ | टाटा पॉवर कंपनी (पारेषण)– (टीपीसी–(पारेषण ) | सन २०१४ चा १ | १४ ऑगस्ट– २०१४ (१६ ऑगस्ट, २०१४ पासून अंमलात) |
| ३ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर (पारेषण)– (आरइन्फ्रा–पारेषण) | सन २०११ चा १ | ११ ऑगस्ट, २०११ (१६ ऑगस्ट, २०११ पासून अंमलात) |
| ४ | जयगड पॉवर ट्रान्समिशन लि. (जेपीटीएल) | सन २००९ चा १ | ८ फेब्रुवारी, २००९ |
| ५ | अदानी ट्रान्समिशन (इंडिया) लि.(एटीआयएल) (पूर्वीची अदानी पॉवर महाराष्ट्र लि.–एपीएमएल ) | सन २००९ चा २ | ६ जुलै, २००९ |
| ६ | महाराष्ट्र ईस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एमइजीपीटीसीएल ) | सन २०१० चा १ | २१ सप्टेंबर, २०१० |

| अ.क्र. | परवानाधारक | परवाना क्र. | परवानाचा दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ७ | सिन्नर पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एसपीटीसीएल) | सन २०१० चा २ | २८ डिसेंबर, २०१० |
| ८ | अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एपीटीसीएल) | सन २०१० चा ३ | ३० डिसेंबर, २०१० |
| ९ | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि. (पारेषण) - (व्हीआयपीएल--पारेषण) | सन २०१५ चा १ | ५ जानेवारी, २०१५ |

विद्यमान आणि नव्याने उभारलेल्या निर्मिती प्रकल्पांमधील विजेचे निष्कासन करण्याकरिता, राज्य पारेषण कंपनीकडून केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीईए) आणि पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (पीजीसीआयएल) यांच्याबरोबर समन्वयाने हाती घेण्यात आलेल्या यंत्रणेच्या अभ्यासाच्या आधारे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन, जिचा वर उल्लेखलेले पारेषण परवानाधारक एक भाग आहेत, करण्यात येते.

महाराष्ट्रातील पारेषण वाहिन्या आणि उप-केंद्रे यांचा ( ३१ मार्च, २०१८ रोजी) तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | परवानाधारकाचे नाव | सर्किट-किमी वाहिनी | उप-केंद्रांची संख्या | ट्रान्सफॉर्मेशन क्षमता (एमव्हीए) |
|---|---|---|---|---|
| १ | महापारेषण कंपनी | ४६२१८ | ६६० | १२३८४७ |
| २ | टीपीसी-पारेषण | ११८६ | २१ | ९५८३ |
| ३ | आरइन्फ्रा-पारेषण | ५३९ | ८ | ३२१५ |
| ४ | जेपीटीएल | ३३४ | ० | ० |
| ५ | एटीआयएल | ४३८ | ० | ० |
| ६ | एपीटीसीएल | २२२ | ० | ० |
| ७ | एमइजीपीटीसीएल | १३२० | ३ | ६००० |
| ८ | एसपीटीसीएल | ११३ | ० | ० |
| ९ | व्हीआयपीएल-पारेषण | ६.१२ | ० | ० |
| | **एकूण** | **५०३७६.१२** | **६९२** | **१४२६४५** |

## ४.३ विजेचे वितरण

महाराष्ट्रातील ग्राहकांची विजेची गरज चार वितरण परवानाधारक भागवितात. हे परवानाधारक पुढीलप्रमाणे आहेत - महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण कंपनी), रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी लि. (आरइन्फ्रा-वितरण), दि टाटा पॉवर कंपनी लि. (टीपीसी-वितरण) आणि बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट). बेस्ट, आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरण या कंपन्या बहुतांश मुंबई शहर आणि त्याच्या उपनगरांना वीज पुरवितात तर उर्वरित महाराष्ट्रात (आणि मुंबई उपनगरातील छोट्याशा क्षेत्राला) महावितरण कंपनीद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो.

राज्यातील विजेच्या वितरणाची स्थिती खालील तक्त्यात दाखविण्यात आली आहे:-

| तपशील | महावितरण २०१७-१८ | टीपीसी २०१७-१८ | आरइन्फ्रा २०१७-१८ | बेस्ट २०१७-१८ |
|---|---|---|---|---|
| ग्राहकांची संख्या (लाखांत) | २५४.१४ | ७.८५ | २३.८६ | १०.४९ |
| विक्री (दशलक्ष युनिट) | ९६,४३० | ५,१०२ | ८,५०९ | ४,७६४ |
| वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च (रुपये प्रति युनिट) | ६.६३ | ६.९५ | ९.३३ | ८.२७ |
| वीज खरेदीचा सरासरी खर्च (रुपये प्रति युनिट) | ४.४९ | ४.८९ | ४.८९ | ५.०६ |
| एकाचवेळी असलेली (कोइन्सिडंन्ट) सर्वोच्च मागणी (मेवॅ) | १६६६३ | ९७३ | १३९७ | ८३७ |

याशिवाय, आयोगाने अधिसूचित केलेल्या सेझ क्षेत्रात विजेचा पुरवठा करण्यासाठी विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत मानीव वितरण परवानाधारक असलेल्या ६ विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) विकासकांना वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी निर्गमित केल्या आहेत. ते खालीलप्रमाणे -

१) माइण्डस्पेस बिझनेस पार्क्स प्रा. लि.
२) महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि.
३) क्वाड्रॉन बिझनेस पार्क लि.
४) गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि.
५) निदार युटीलिटीज् पनवेल एलएलपी
६) न्युफाऊण्ड प्रॉपर्टीज् ॲण्ड लिजिंग प्रा. लि.

या मानीव वितरण विकासकांनी त्यांचा वितरण व्यवसाय सुरु करण्याचे काम विकासाच्या वेगवेगळया टप्प्यावर आहे. केंद्रीय विद्युत नियामक नियामक आयोगाने भारतीय रेल्वेला विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत मानीव वितरण परवानाधारक म्हणून मान्यता दिली आहे.

## ४.४ नूतनशील ऊर्जा

महाराष्ट्राची नूतनशील ऊर्जा निर्मितीची संभाव्य क्षमता ७४५०० मेगावॅट आहे जी राष्ट्रीय क्षमतेच्या (८९६६०२ मेगावॅट) ८.३० टक्के आहे. खालील तक्त्यात नूतनशील आणि अ-पारंपरिक स्त्रोतांपासून (पवन, सौर, बायोमास, ऊसाच्या चिपाडांपासून सह-निर्मिती इ. सह) ऊर्जा निर्मितीची सद्यस्थिती दाखविण्यात आली आहे:-

| स्त्रोत | भारत | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|
| | संभाव्य क्षमता (मेगावॅट) | संचयी साध्य (मेगावॅट) (२८.०२.२०१८ पर्यंत) | संभाव्य क्षमता (मेगावॅट) | संचयी साध्य (मेगावॅट) (३१.०३.२०१८ पर्यंत) |
| पवन ऊर्जा | १०२७७२ | ३२८४८ | ५९६१ | ४७८१.८१ |
| सौर ऊर्जा | ७४८९९० | १७०५२ | ६४३२० | ८०७.४५ |
| बायोमास | १७५३६ | - | १८८७ | २१५ |
| ऊसाच्या चिपाडांपासून सह-निर्मिती | ५००० | ८४१३ | १२५० | १९५३.८५ |
| लघु-जल विद्युत | १९७४९ | ४४१८ | ७९४ | ३३५.५२५ |
| कचऱ्यापासून ऊर्जा | २५५४ | ११४ | २८७ | ३७.७१३ |
| **एकूण ( मेगावॅट मध्ये )** | **८९६६०२** | **६२८४६** | **७४५००** | **८१३१.३४८** |

देशाच्या एकूण निर्मितीशी तुलना करता, महाराष्ट्राची नूतनशील स्त्रोतांपासून ऊर्जा निर्माण करण्याची संभाव्य क्षमता जरी १५ टक्के असली तरी प्रत्यक्ष निर्मिती देशातील एकूण निर्मितीच्या १७ टक्के आहे. मागील १४ वर्षांमध्ये विविध स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मिती क्षमतेमध्ये घालण्यात आलेली भर खालील तक्त्यामध्ये दाखविण्यात आली आहे:-

| अ. क्र. | नूतनशील ऊर्जेचा प्रकार | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | एकूण ३१-०३-२०१८ पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पवन ऊर्जा प्रकल्प | *४५६ | ५४५ | ४८५ | २६८ | १७८ | १३९ | २३९ | ४०७.०६ | २८८.६ | १०७४ | ३६२.०५ | २२०.२ | १०७.३ | १२.६ | ४७८१.८१ |
| २ | बायोमास विद्युत प्रकल्प | ८ | ० | १० | १६ | ६१ (#) | २० | ४० | ० | १५ | २० | १० | १५ | ० | ० | २१५ |
| ३ | ऊसाच्या चिपाडांपासून सह-निर्मिती | **८४ | १७ | ५७ | ८१ | ३० | २९ | ३२३.१ | २७२.९ | १९५ | २६५.७५ | ६० | ३६१.१ | ७३ | १०५ | १९५३.८५ |
| ४ | कचऱ्यातून ऊर्जा | ० | ० | ० | ० | ० | ० | ४.७३ | ० | ४ | ३ | ० | २५.९८ | ० | ० | ३७.७१३ |
| ५ | लघु-जल प्रकल्प | *** २०६.८३ | ० | ० | ६.५ | ० | १६ | १६.९ | १८.५ | ६ | ० | १३.३ | ८.२२ | ७.७७५ | ३५.५ | ३३५.५२५ |
| ६ | सौर ऊर्जा | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १९ | ३०.१५ | १८०.१० | ९९ | ३६.५ | १०.२५ | ४३१.४५ | ८०७.४५ |
| | एकूण | ७५४.८३ | ५६२ | ५५२ | ३७१.५ | २६९ | २०४ | ६२४.७३ | ७१७.४६ | ५३८.७५ | १५४२.८५ | ५४४.३५ | ६६७.२८ | १९८.३२५ | ५८४.२७३ | ८१३१.३४८ |

*टीप :- सन २००४-०५ मध्ये क्षमतेमध्ये प्रत्यक्ष घातलेली भर फक्त ७४.२५ मेगावॅट्स होती. (स्त्रोत-महाऊर्जा)*

** या क्षमतेमध्ये सन २००४-०५ पूर्वी सुरु झालेले ४०७ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.*

*** या क्षमतेमध्ये सन २००४-०५ पूर्वी सुरु झालेले ६७ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.*

**** या क्षमतेमध्ये सन २००४ पूर्वी सुरु झालेले २०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.*

# ५. महत्वाचे प्रश्न

## ५.१ नूतनशील उर्जेच्या वाढीला चालना देणे

विद्युत अधिनियम २००३ आणि वातावरणातील बदला संबंधीच्या राष्ट्रीय कृती आराखड्याच्या अनेक उद्दिष्टांपैकी नूतनशील उर्जेच्या विकासाला चालना देणे, हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ८६ (१) (इ) अंतर्गत नूतनशील उर्जेच्या विकासाला चालना देण्यासाठी राज्य विद्युत नियामक आयोगाला संबंधित वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रात नूतनशील ऊर्जा 'स्त्रोतांपासून निर्माण झालेल्या विजेतून खरेदी करावयाच्या विजेच्या टक्केवारीचे (आरपीओ) लक्ष्यांक विनिर्दिष्ट करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार आयोगाने, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० ('आरपीओ विनियम') हे विनियम ७ जून, २०१० रोजी अधिसूचित केले आहेत. यामध्ये बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थांकरिता आर्थिक वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ या कालावधीत त्यांनी नूतनशील ऊर्जा इन्स्टिट्युट स्त्रोतांपासून निर्माण झालेल्या विजेतून खरेदी करावयाच्या विजेच्या टक्केवारीचे (आरपीओ) लक्ष्यांक विहित करण्यात आले होते.

त्यानंतर, आयोगाने ३० मार्च, २०१६ रोजी आरपीओ विनियम अधिसूचित करुन त्यामध्ये बंधन असलेल्या व्यक्ति/संस्थांसाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० करिता आरपीओ लक्ष्यांक निश्चित केले आहेत. या आरपीओ विनियमांतर्गत, वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० पर्यंतच्या कालावधीत दरवर्षी बिगर- सौर नूतनशील ऊर्जा खरेदीच्या ०.२ टक्के खरेदी मिनी/मायक्रो जल-विद्युत प्रकल्पांमधून करणे आवश्यक आहे.

आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थांसाठी खालीलप्रमाणे आरपीओ लक्ष्यांक निश्चित केले आहेत:

| वर्ष | नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून ( युनिट मधील सममूल्य ऊर्जा ) करावयाच्या किमान वीज खरेदीचे परिमाण ( टक्केवारीत ) | | |
|---|---|---|---|
| | सौर | बिगर सौर ( अन्य नूतनशील ऊर्जा ) | एकूण |
| | (अ) | (ब) | (क) |
| २०१६-१७ | १.००% | १०.००% | ११.००% |
| २०१७-१८ | २.००% | १०.५०% | १२.५०% |
| २०१८-१९ | २.७५% | ११.००% | १३.७५% |
| २०१९-२० | ३.५०% | ११.५०% | १५.००% |

मागील विनियमांप्रमाणेच, नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या (आरपीओ) लक्ष्यांकाची पूर्तता नूतनशील ऊर्जा प्राप्त करुन किंवा नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे (आरईसी) खरेदी करुन करता येईल. तथापि, हे लक्ष्यांक मागील लक्ष्यांकापेक्षा खूप अधिक आहेत.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाच्या (महाऊर्जा) नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या हिशोबपूर्ती अहवालाच्या आधारे, आयोगाने, वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१५-१६च्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्यांकांच्या केलेल्या पूर्ततेच्या पडताळणीवर, आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये स्वत:हून आदेश देखील निर्गमित केले आहेत.

आयोग, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेचे दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१५च्या (आर्थिक वर्ष

२०१९-२० पर्यंत अंमलात) आधारावर, निरनिराळया नूतनशील ऊर्जा स्त्रोतांसाठी दरवर्षी आदेशांच्या माध्यमातून लेव्हलाईज्ड व्यापक वीज दर निश्चित करते.

आयोगाने, सन २०१५ च्या प्रकरण क्र. १३५ मध्ये, १० नोव्हेंबर, २०१५ ते ३१ मार्च, २०१६ या कालावधीकरिता व्यापक (जेनरिक) नूतनशील ऊर्जा वीज दराचा आदेश २५ जानेवारी, २०१६ रोजी निर्गमित केला. आयोगाने सन २०१६ च्या प्रकरण क्र. ४५ मध्ये दि. २९ एप्रिल, २०१६ च्या आदेशात आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी आणि सन २०१७ च्या प्रकरण क्र. ३३ मध्ये दि. २८ एप्रिल, २०१७ च्या आदेशात आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी देखील व्यापक वीज दर निश्चित केला. आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी व्यापक नूतनशील ऊर्जा वीज दराच्या निश्चितीकरणाच्या प्रक्रियेस सुरुवात झाली असून प्रारुप आदेश अंतिम करण्याचे काम सुरु आहे.

## ५.२ वीज मागणी व्यवस्थापन

मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करावयाची चौकट) विनियम, २०१० आणि मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१०, हे वीज मागणी व्यवस्थापनासंबंधीचे विनियम तयार करणारा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग हा देशातील पहिला विद्युत नियामक आयोग आहे.

या विनियमांचा उद्देश, विद्युत परवानाधारकांमार्फत कार्यक्षम ऊर्जा व ऊर्जा संवर्धनासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना चालना देणे, हा आहे. या विनियमांमुळे परवानाधारकांवर वीज मागणी व्यवस्थापन हे त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा एक भाग करणे आवश्यक झाले आहे. परवानाधारक वीज मागणी व्यवस्थापनावर होणारा त्यांचा खर्च हा शेवटी ग्राहकांकडून वीज दराच्या माध्यमातून वसूल करावयाचा खर्च म्हणून तो एकूण महसुली गरजेत समाविष्ट करु शकतात.

वीज मागणी व्यवस्थापनास पध्दतशीरपणे प्रोत्साहन मिळावे आणि हे कार्यक्रम कमी खर्चिक असावेत यासाठी, आयोगाला मदत करण्याकरिता या विनियमांखाली वीज मागणी व्यवस्थापन सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे.

मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ मधील विनियम ६.४ अंतर्गत वितरण परवानाधारकांनी कार्यक्षम ऊर्जा आणि वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ठरवून देण्यात आलेले लक्ष्यांक विचारात घेऊन किती वीज खरेदी करण्याची गरज असेल, त्याचा अंदाज काढणे आवश्यक आहे.

### आर्थिक वर्ष २०१७-१८ मधील वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमाखालील प्रगती

आयोगाने वीज मागणी व्यवस्थापनांतर्गत प्रोत्साहनांवर आधारित विविध कार्यक्रम मंजूर केले आहेत. या कार्यक्रमांतर्गत झालेली प्रगती व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे:

### पंचतारांकित सिलिंग पंख्यांचा कार्यक्रम

आरइन्फ्रा-वितरण, टीपीसी-वितरणने पंचतारांकित सिलिंग पंख्यांचा कार्यक्रम राबविला. आरइन्फ्राने आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये ७२ पंखे बदलले आणि ०.००८ दशलक्ष युनिट्सची बचत करुन लक्ष्यांक साध्य केला. टीपीसी- वितरणने १०१२५ पंखे बदलले व १.८८३ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

### पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांचा कार्यक्रम

आरइन्फ्रा वितरण आणि टीपीसी-वितरणने पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांचा कार्यक्रम राबविला होता. आरइन्फ्राने या कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी सुरु केली असून त्यांचा जुनी १५०० वातानुकुलित यंत्रे पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांनी बदलण्याचा लक्ष्यांक असून त्यांनी वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांसाठी ९८७ स्प्लिट वातानुकुलित यंत्रे बसविली आणि १.१ दशलक्ष युनिट्सची बचत केली. टीपीसी-वितरणने पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रे बसविली आणि १.०२३ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

### पंचतारांकित रेफ्रिजरेटरचा कार्यक्रम

पंचतारांकित रेफ्रिजरेटरचा कार्यक्रम आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरणकरिता मंजूर करण्यात आला होता. आरइन्फ्राने १०६३ रेफ्रिजरेटर्स बदलण्याचे लक्ष्यांक साध्य केले आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये ०.१६ दशलक्ष युनिट्सची बचत केली. टीपीसी-वितरणने ८८ रेफ्रिजरेटर्स बसविले आणि १.२९ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

### ऊर्जा लेखापरीक्षण कार्यक्रम

आरइन्फ्रा-वितरणने जास्त वीज वापरणाऱ्या ग्राहकांकरिता ऊर्जा लेखापरीक्षण कार्यक्रम सुरु केला. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या ग्राहकांना, जर त्यांना सूचित करण्यात येणाऱ्या उपाययोजना त्यांनी स्वीकारल्या तर प्रोत्साहन म्हणून त्यांना, लेखापरीक्षण शुल्काच्या ७५ टक्के रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते. त्यांनी ७ ग्राहकांचे ऊर्जा लेखापरीक्षण पार पाडले असून त्यामुळे सुमारे ०.६५ दशलक्ष युनिटसची बचत होईल. टीपीसी-वितरणकडून ५ ऊर्जा लेखापरीक्षणे पूर्ण करण्यात आली असून त्यांच्याकडून अंदाजे ०.५०६ दशलक्ष युनिट्सची बचत होईल.

### घरगुती ऊर्जा कार्यक्षम प्रकाश कार्यक्रम ( डीईएलपी )

टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण, बेस्ट आणि महावितरण कंपनी यांच्याकडून घरगुती ऊर्जा कार्यक्षम प्रकाश हा कार्यक्रम राबविण्यात येतो. टीपीसी-वितरणने १६,६३५ एलईडी बल्बचे वाटप केले असून त्याद्वारे ६.३६४ दशलक्ष युनिट्सची बचत झाली. बेस्टने ही योजना ऑगस्ट, २०१५ मध्ये सुरु केली असून ९६२४ एलईडी बल्बचे वाटप केले व त्याद्वारे ०.०८३ दशलक्ष युनिट्सची बचत झाली. आरइन्फ्रा-वितरणने १,२०,००० एलईडी बल्बचे वाटप करुन १.०० दशलक्ष युनिट्ची बचत केली.

### घरगुती ऊर्जा कार्यक्षम ट्युब लाईट कार्यक्रम ( डीईटीपी )

बेस्टने डीईटीपी कार्यक्रम राबविला आणि १७८४ ट्युब लाईट्सचे वाटप करुन ०.००७ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

### घरगुती ऊर्जा कार्यक्षम सिलिंग पंखे कार्यक्रम ( डीईएफपी )

बेस्टने डीईएफपी कार्यक्रम राबविला आणि १३१ सिलिंग पंखे वितरीत करुन ०.००१४ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

## ५.३ पारेषण नियोजन

भारतातील पारेषण यंत्रणेत आंतर-राज्य पारेषण यंत्रणा आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणांचा समावेश असतो. आंतर-राज्य आणि आंतर-प्रादेशिक पारेषण यंत्रणा या मुख्यत्वेकरुन पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (पीजीसीआयएल) च्या मालकीच्या आहेत. आंतर-राज्य पारेषण यंत्रणा, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा आणि समर्पित पारेषण वाहिन्या यांची आंतरजोडणी झालेली असते आणि या सर्व एकत्र मिळून पारेषण ग्रिड तयार होते.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण हे विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ७३ (ए) मधील तरतुदींनुसार, भावी वीज निर्मिती आणि पारेषण आराखडे तयार करण्यासाठी आणि नियोजन एजन्सींच्या कामकाजात सुसुत्रता आणण्यासाठी जबाबदार आहे. केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु) ही एक कार्यक्षम आणि समन्वित आंतर-राज्य पारेषण यंत्रणा विकसित करण्यासाठी जबाबदार असते तर, राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) हेच काम राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी करण्यास जबाबदार असते.

राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) ही, केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु) आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीइए), प्रादेिक विद्युत समिती (आरपीसी), विद्युत प्रकल्प विकासक यांच्याशी विचारविनिमय करुन, पारेषण नियोजनाच्या निकषांच्या नियमावलीनुसार, आवश्यक यंत्रणा अभ्यास पार पाडून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या जाळयाच्या मजबुतीकरणासाठी, राज्यांतर्गत निर्मिती प्रकल्पांमधील विजेच्या

निष्कासनासाठी आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या ठिकाणांतून वीज खेचण्यासाठी, प्रस्ताव तयार करते. या अभ्यासात ग्रिडची मानके, ग्रिडला जोडणीची तांत्रिक मानके आणि अन्य संबंधित मानके/विनियम विचारात घेण्यात येतात. प्रमुख राज्यांतर्गत योजनांचे नियोजन समन्वित रितीने करण्यात येते आणि त्यावर स्थायी समितीमध्ये चर्चा करण्यात येते.

अति गर्दीच्या नागरी/निम-नागरी क्षेत्रात, अवघड भूप्रदेश इ. बाबतीत, वहिवाटीचे हक्क व खर्च इष्टतम स्तरावर ठेवून, पारेषण मार्गिकांसाठी जागेचे नियोजन करण्यात येते. हे करण्यासाठी, अंतिम यंत्रणेसाठी उच्च व्होल्टेजची पातळी स्वीकारुन आणि सुरुवातीच्या टप्प्यावर एक पातळी कमी स्तरावर काम करुन, किंवा भविष्यात अतिरिक्त सर्किटमध्ये वाहिनी टाकणे शक्य होण्यासाठी बहु-सर्किट मनोऱ्यांचा किंवा एचव्हीडीसी, जीआयएस इ. सारख्या तंत्रज्ञानांचा वापर करण्यात येतो.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ३९ नुसार, राज्य पारेषण कंपनी ही, राज्य पारेषण कंपनीच्या ग्रिडला जोडलेले/जोडावयाचे असलेले राज्यांतर्गत वीज निर्माते आणि वितरण परवानाधारक यांच्याशी समन्वय साधून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या नियोजनासाठी, एक नोडल एजन्सी म्हणून कार्य करते. राज्य पारेषण कंपनी ही राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा नियोजनासाठी एकल बिंदू संपर्क असते आणि ती, राज्यांतर्गत सर्व विद्युत कंपन्यांच्या वतीने, राज्यातील निर्मिती केंद्रांमधील विजेचे निष्कासन करण्यासाठी, वितरण परवानाधारकांच्या आवश्यकता भागविण्यासाठी आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या आराखड्यास अनुसरुन, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधून वीज खेचण्यासाठी, जबाबदार असते. राज्य पारेषण कंपनी, नागरी नियोजन एजन्सीज्, विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) विकासक, औद्योगिक विकासक इ. यांच्या बरोबर, त्यांच्या दीर्घ-कालिन गरजा भागविण्यासाठी पुरेशा पारेषण मार्गिकेकरिता आणि नवीन उप-केंद्रांकरिता जागेची तरतूद करण्यासाठी, समन्वय साधते.

या यंत्रणेचे नियोजन, सदर यंत्रणा नेहमीच्या परिस्थितीत तसेच संभाव्य आकस्मिक घटना घडल्यानंतर अनुज्ञेय मर्यादांमध्ये काम करु शकेल, अशारितीने करण्यात येते. तथापि या यंत्रणेत क्वचित प्रसंगी टोकाच्या आकस्मिक घटनांना सामोरे जावे लागण्याची शक्यता असते आणि अशा घटनांवर मात करण्याचे नियोजन या यंत्रणांमध्ये केलेले नसू शकते. ग्रिडची सुरक्षितता राखण्यासाठी अशा टोकाच्या/ क्वचित घडणाऱ्या परंतु संभाव्य आकस्मिक घटना वेळोवेळी निश्चित करण्याची गरज आहे आणि त्यांचा विपरित परिणाम शिथिल करण्यासाठी सुयोग्य पध्दत, जसे की, भार-नियमन, निर्मितीच्या शेड्युलिंगचे फेर-निर्धारण, आयलॅन्डिंग, यंत्रणा संरक्षक योजना इ. तयार करणे आवश्यक आहे.

नियोजित पारेषण क्षमतेला मर्यादा आहेत. पूर्व-नियोजन न केलेल्या दिशेने जर मोठ्या प्रमाणावर विजेचे पारेषण करावयाचे असेल तर नक्कीच अतिभार निर्माण होऊ शकतो.

नवीन उप-केंद्रांकरिता आणि निर्मिती केंद्रांकरिता, उचित संपर्क यंत्रणांचे नियोजन केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु)/ राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) यांच्याकडून करण्यात येते आणि त्याची अंमलबजावणी त्यांच्याकडून आणि वीज निर्मात्यांकडून करण्यात येते. ज्यामुळे अशा यंत्रणा, असे केंद्र सुरु करण्याच्या वेळेस तयार झालेल्या असू शकतील.

यंत्रणेचे नियोजन पुढील विद्युत यंत्रणा अभ्यासांच्या आधारे करण्यात येते. जसे की- १) वीज प्रवाहाचा अभ्यास, २) शॉर्ट सर्किटचा अभ्यास, ३) स्थिरतेचा अभ्यास, ४) इलेक्ट्रोमॅग्नेटिक ट्रॅन्झिएन्ट प्रोग्राम (इएमटीपी) अभ्यास (स्विचिंग/ डायनॅमिक ओव्हर-व्होल्टेजीज, इन्सुलेशन को-ऑर्डिनेशन इ.करिता ).

मागितलेल्या दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाच्या गरजा विचारात घेऊन, विद्युत केंद्रापासून सुरु होऊन सर्वात जवळच्या ग्रिड बिंदूपर्यंत जाणाऱ्या नवीन पारेषण वाहिन्यांचे, निर्मात्यांशी विचार-विनिमय करुन व निर्मिती केंद्रांची जादा भार सामावून घेण्याची क्षमता विचारात घेऊन, नियोजन करण्यात येते. यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या नवीन पारेषण वाहिन्या टाकण्याचे नियोजन, वाहिन्या आणि ट्रान्सफॉर्मर्सच्या औष्णिक लोडिंग मर्यादेत १० टक्क्यांचे मार्जिन ठेवून, करण्यात येते.

महापारेषण कंपनीने आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये खालील प्रमुख योजना कार्यान्वित केलेल्या आहेत:

| अनु. क्र. | योजना |
|---|---|
| १ | २२० केव्ही बोईसर बोरीवली सीकेटी - १ (८२.६१ सीकेटी.किमी.) जिल्हा - ठाणे |
| २ | वरोरा-वर्धा २ (भूगाव) (१६५ सीकेटी. किमी) जिल्हा- नागपूर डबल सर्कीट टॉवर्स (डीसीडीसी) वर २२० केव्ही डबल सर्कीट वाहिनी |
| ३ | २२० केव्ही बालापूर-मालेगाव डीसीडीसी वाहिनी सीकेटी-१ (७१ सीकेटी किमी) जिल्हा अमरावती |
| ४ | २२० केव्ही फलटन उप-केंद्र ते २२० केव्ही वालचंद नगर उप-केंद्र (११४.२ सीकेटी.किमी) जिल्हा - पुणे पर्यंत २२० केव्ही डीसीडीसी वाहिनी |
| ५ | २२० केव्ही डीसीडीसी मालेगाव - कळवण वाहिनी (९७.८४ सीकेटी किमी), जिल्हा- नाशिक |
| ६ | २२० केव्ही अकोला-अंजनगाव डीसीडीसी वाहिनी (१०६ सीकेटी किमी), जिल्हा- अमरावती |
| ७ | ४०० केव्ही औरंगाबाद - २ उप-केंद्र ते २२० केव्ही जालना एमआयडीसी (नागेवाडी) उप-केंद्र (७७.०९ सीकेटी. किमी) जिल्हा - औरंगाबाद पासून २२० केव्ही डीसीडीसी वाहिनी |
| ८ | नागेवाडी उप-केंद्र ते २२० केव्ही परतुर उप-केंद्र (१२६.२ सीकेटी किमी) जिल्हा औरंगाबाद पासून २२० केव्ही डीसीडीसी वाहिनी |
| ९ | २२० केव्ही चंद्रपूर - २ - चंद्रपूर एमआयडीसी (तडाली) (८१.०२ सीकेटी. किमी) जिल्हा- नागपूर |
| १० | २२० केव्ही मालेगाव उपकेंद्र, २२०/१३२ केव्ही, २ X १०० एमव्हीए आयसीटी जिल्हा वाशिम |
| ११ | ४०० केव्ही कुडुस उप-केंद्र, २ X ४००/२२०, ५०० एमव्हीए आयसीटी जिल्हा ठाणे |
| १२ | २२०/१३२/३३ केव्ही जालना-एमआयडीसी (नागेवाडी) उप-केंद्र, १०० एमव्हीए, २२०/१३२ केव्ही आयसीटी-१ आणि ५० एमव्हीए, २२०/३३ केव्ही टी/एफ - २ जिल्हा, जालना |
| १३ | २२० केव्ही क्रिश्नुर उप-केंद्र, १ X २५ एमव्हीए, २२०/३३ केव्ही टी/एफ जिल्हा नांदेड |
| १४ | ४००/२२० केव्ही चंद्रपूर-२ उप-केंद्र, ३ X १६७ एमव्हीए, ४००/२२० केव्ही, आयसीटी जिल्हा औरंगाबाद |
| १५ | ४०० केव्ही औरंगाबाद-२ उप-केंद्र (थाप्टीतांडा), १X५०० एमव्हीए, ४००/२२० केव्ही, आयसीटी जिल्हा औरंगाबाद |

## ५.४ मंजूर केलेले परवाने

आयोगाला विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ अंतर्गत विजेचे पारेषण, वितरण आणि व्यापार करण्यासाठी परवाना मंजूर करण्याचे अधिकार आहेत. परवानाधारक त्यांच्या परवान्यात सुधारणा करण्यासाठी आयोगाकडे कलम १८ अंतर्गत अर्ज करु शकतात.

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (आरइन्फ्रा)च्या वर्सोवा येथील अति-उच्च दाब रिसिव्हींग उप-केंद्रात सहा अतिरिक्त २२० केव्ही बेज समाविष्ट करण्यासाठी पारेषण क्षेत्रात बदल करण्यासाठी त्यांच्या पारेषण परवान्यात सुधारणा करण्यात आली. तसेच, या सुधारणे अंतर्गत

पारेषण वाहिन्या आणि बेज यांची अद्ययावत स्थिती समाविष्ट करण्यात आली आणि काही प्रस्तावित वाहिन्या आणि बेज ज्यांची आवश्यकता नव्हती त्यांना पारेषण परवान्यातून गाळण्यात आले.

निदार युटीलिटीज पनवेल एलएलपीने (विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (बी) अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार एक मानीव वितरण परवानाधारक) रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील तळेगाव आणि पन्शील गाव, पनवेल तालुक्यातील भोकरपाडा गाव येथील त्यांच्या माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित बहुविध सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठीच्या (सेझ) वितरण परवान्याच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका दाखल केली होती. आयोगाने निदार युटीलिटीज पनवेल एलएलपीच्या परवाना विनियमांच्या विशिष्ट अटींमध्ये दिनांक २६ मे, २०१७ रोजी सुधारणा केली.

# ६. वीज दराचे व अन्य निवडक आदेश

## आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्राप्त झालेली आणि निकालात काढलेली प्रकरणे

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये आयोगास प्राप्त झालेल्या आणि निकालात काढलेल्या प्रकरणांची स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. | सुरुवातीची शिल्लक प्रकरणे | १७१ |
| २. | वर्षादरम्यान प्राप्त झालेली / आयोगाने स्वत:हून घेतलेली / विद्युत अपील न्यायाधिकरणाने वर्ग केलेली प्रकरणे | २७१ |
| ३. | वर्षादरम्यान निकालात काढण्यात आलेली प्रकरणे | २०१ |
| ४. | आदेशाद्वारे मागे घेतलेली प्रकरणे | १५ |
| ५. | वर्षाअखेरीस शिल्लक प्रकरणे | २२३ |

आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशांची यादी परिशिष्ट-२ मध्ये देण्यात आली आहे. या यादीवरुन आयोगाने हाताळलेले विविध प्रश्न दिसून येतील. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये पारित झालेल्या १५२ आदेशांचे विषयनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| वीज दराशी संबंधित (नूतनशील ऊर्जा वगळून) | २९ |
| नूतनशील उर्जेशी संबंधित (मुक्त प्रवेश वगळून) | २३ |
| मुक्त प्रवेशांशी संबंधित प्रश्न | २४ |
| विद्युत लोकपाल / ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या आदेशांची अ-पूर्तता | ३७ |
| परवाना मंजुरीशी संबंधित | ०९ |
| वीज खरेदीशी संबंधित | २३ |
| पारेषण कामांसाठी जमीन मालकांना नुकसानभरपाई देण्याबाबत | १४ |
| अन्य | ४५ |

सर्व आदेश आयोगाच्या संकेत-स्थळावर जनतेच्या माहितीसाठी उपलब्ध आहेत.

## वीज निर्मिती

**महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. ची कोराडी निर्मिती संच ८, ९ आणि १०, चंद्रपूर संच ८ आणि ९ तसेच परळी संच ८ च्या भांडवली खर्च आणि वीज दराच्या मान्यतेसाठी याचिका (सन २०१७ चे प्रकरण क्र. ५९) दिनांक १४ डिसेंबर, २०१७**

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लिमिटेडने (महानिर्मिती कंपनी) कोराडी निर्मिती संच ८, ९ आणि १० (२ X ६६० मेगावॅट), चंद्रपूर संच ८ व ९ (२ X ५०० मेगावॅट) आणि परळी संच ८ (२५० मेगावॅट) च्या भांडवली खर्च आणि वीज दराच्या मान्यतेसाठी याचिका दाखल केली.

आयोगाने दि.१४ डिसेंबर, २०१७ रोजी खालील ठळक मुद्यांसह याचिका निकाली काढली:

➢ आयोगाने विद्युत प्रकल्पाच्या उभारणी दरम्यानचे व्याज (आयडीसी), विद्युत अपील न्यायाधिकरणाने सन २०१० च्या अपील क्र. ७२ मध्ये दिलेल्या निकालानुसार ज्यामध्ये न्यायाधिकरणाने तीन वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये झालेल्या विलंबामुळे निर्माण झालेल्या अतिरिक्त आयडीसीच्या उपाययोजनेसाठी तत्त्वे विनिर्दिष्ट केली होती, त्यानुसार निश्चित केले. प्रकल्पाला झालेला विलंब अंशत: महानिर्मिती कंपनीच्या नियंत्रणाखालील आणि अंशत: महानिर्मिती कंपनीच्या नियंत्रणाबाहेरील घटकांमुळे

झाल्याचा निष्कर्ष आयोगाने काढला. त्यामुळे, आयोगाने कोराडी संच ८, ९ आणि १०, चंद्रपूर संच ८ व ९ आणि परळी संच ८ कार्यान्वित होण्यासाठीच्या वाढलेल्या कालावधीतील आयडीसीच्या केवळ ५० टक्के खर्चास मान्यता दिली.

➢ आयोगाने, आदेशामध्ये मान्यता दिलेल्या वार्षिक स्थिर आकारातील फरकाची आणि महानिर्मिती कंपनीने डिसेंबर, २०१७ पर्यंत आकारलेल्या तात्पुरत्या वार्षिक स्थिर आकारांच्या देयकांची वसुली/समायोजन जानेवारी, २०१८ पासून पुढील ३ मासिक हप्त्यांमध्ये करण्याचे महानिर्मिती कंपनीस निर्देश दिले.

➢ आयोगाने महानिर्मिती कंपनीला परळी औष्णिक विद्युत केंद्राला पाण्याचा पुरवठा करण्याची किफायतशीर पर्यायी व्यवस्था प्राधान्याने करण्याचे निर्देश दिले. अशा पर्यायी व्यवस्थेची परिणती त्यापासून कोणताही लाभ न होता महानिर्मिती कंपनीवर खर्चाचे दायित्व होण्यात होऊ नये याची खबरदारी महानिर्मिती कंपनीने घ्यावी असेही निर्देश देण्यात आले.

➢ आयोगाने महानिर्मिती कंपनीला असेही निर्देश दिले की, त्यांनी ब्रिज लिंकेजचा कालावधी न वाढवण्यात आल्यास कोळसा प्राप्त करण्याचा अन्य पर्यायी स्त्रोत अशा पर्यायी स्त्रोतातून कोळसा प्राप्त करण्यासाठी कोळशाची किंमत, एकूण कॅलरीफिक मूल्य आणि ऊर्जा आकार यांच्या सविस्तर तपशीलासह, सादर करावेत.

➢ आयोगाने महानिर्मिती कंपनीला निर्देश दिले की, त्यांनी कोळशाच्या गुणवत्तेसंबंधीचे सर्व प्रश्न लवकरात लवकर सोडवावेत आणि खाण विकासक नि परिचालक (एमडीओ) नियुक्तीसाठी बोली प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी विद्युत प्रकल्पावर अवाजवी ओझे न येता कोळसा खाणी किफायतशीर होण्यासाठी उपाययोजना सुचविणारी सविस्तर कृती योजना सादर करावी.

## विजेचे पारेषण

**अदानी ट्रान्समिशन (इंडिया) लि. ची विलंब भरणा अधिभाराच्या वसुलीसाठी आणि आयोगाने दिलेल्या निर्देशांचे राज्य पारेषण कंपनीने पालन न करण्यासंबंधीची याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. १६२)**

आयोगाने २० मार्च, २०१८ रोजी दिलेल्या आपल्या आदेशात निर्देश दिले की,

अ) राज्य पारेषण कंपनी सध्या थकीत असलेले पारेषण आकार तसेच विलंब भरणा अधिभाराच्या (एलपीएस) किमतीइतकी त्यांच्याकडील वैध पत-पत्रे ३० दिवसांच्या आत वटवील आणि संबंधित पारेषण परवानाधारकांचे प्रदान करील.

ब) राज्य पारेषण कंपनी प्रदान सुरक्षितता कार्यपध्दती (पीएसएम), पारेषण आकार आणि विलंब भरणा अधिभाराच्या प्रदाना संबंधातील ठोक वीज पारेषण करारातील (बीपीटीए) कलम ७.५ (कलम ७.५.३ वगळून) आणि ७.७ आणि बहु-वर्षीय वीज दर विनियम आणि पारेषण मुक्त प्रवेश विनियमांमधील तरतुदींची अंमलबजावणी काटेकोरपणे करील, जेणेकरुन अशी परिस्थिती पुन्हा उद्‌भवणार नाही.

क) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण कंपनी) एक महिन्याच्या आत आवश्यक असणारी पत-पत्रे पुरविल, आणि सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्ते ठोक वीज पारेषण करार आणि विनियमांतर्गत आवश्यक असल्याप्रमाणे, त्यांच्या पतपत्रांचे वेळोवेळी नूतनीकरण करतील किंवा त्यामध्ये सुधारणा करतील.

ड) भविष्यात पारेषण आकार किंवा विलंब भरणा अधिभाराचे एकाच कंपन्यांमध्ये समायोजन केले जाणार नाही.

इ) महावितरण कंपनी आणि अन्य पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांना सममूल्य किंमतीसाठी राज्य पारेषण कंपनीला एस्क्रो खाते पुरविता येईल, ज्याचा वापर पारेषण यंत्रणा उपयोगकर्ते पत-पत्र म्हणून त्याच पध्दतीने आणि तशा परिस्थितीत करु शकतील.

**टाटा पॉवर कंपनी लि. (वितरण) ची सन २०१६ च्या प्रकरण क्र. ९१ मध्ये दि. २२ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा वीज दर आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. १४२)**

आयोगाला दि. २ फेब्रुवारी, २०१८ च्या आपल्या आदेशात टीपीसी-वितरणने उपस्थित केलेल्या आक्षेपित आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी कोणतीही त्रुटी आढळली नाही. तथापि, आयोगाने पुढे नमूद केले की, पारेषण आकारांमध्ये सुधारणा करण्यासंबंधातील टीपीसी-वितरणच्या सूचना मध्यावधी आढाव्याच्या वेळी विचारात घेण्यात येतील.

**रत्तन इंडिया नाशिक पॉवर लि.ची ( आरएनपीएल ) त्यांच्या सिन्नर औष्णिक विद्युत संयत्राकरिता ९५० मेगावॅट विजेसाठी ठोक वीज पारेषण करार टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्यासाठी याचिका ( सन २०१६ चे प्रकरण क्र. १५३ )**

आयोगाने दि. २० डिसेंबर, २०१७ च्या आपल्या आदेशात, आरएनपीएलला अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी सिन्नर पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि.च्या (एसपीटीसीएल) पारेषण जाळयाचा वापर करु देण्यास, जो ४०० मेगावॅटपर्यंत मर्यादित असणे आवश्यक नाही, खालील अटींच्या अधीन राहून, परवानगी दिली :

अ) ही व्यवस्था, संबंधित मुक्त प्रवेश विनियमांच्या अधीन राहून, केवळ अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी आहे आणि आरएनपीएल व एसपीटीसीएलच्या जोखीम व खर्चावर राहील;

ब) एसपीटीसीएल जेव्हा कधी एकूण महसुली गरजेचा दावा करील तेव्हा त्यांच्या दावा करण्यासाठीच्या पात्रतेच्या दिनांका रोजी असलेल्या एकूण स्थिर मत्तेच्या घटीत मूल्याच्या आधारावर एकूण महसुली गरज निश्चित करण्यात येईल (म्हणजेच, जेव्हा दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून दीर्घ-कालीन खरेदीदार आणि विजेचा पुरवठा यांचे अंतिम स्वरुप विचारात घेऊन ठोक वीज पारेषण करार कार्यान्वित होईल तेव्हा);

क) पारेषण जाळयाच्या संरुपणामध्ये (कॉन्फ्युगरेशन) कोणताही बदल झाल्यास आवश्यकता असेल तेव्हा राज्य पारेषण कंपनीकडून या व्यवस्थेचा आढावा घेण्यात येईल, ज्यामध्ये विद्यमान पारेषण जाळयाचा समावेश असेल;

ड) आरएनपीएल ज्यावेळी निर्धारित केलेल्या दीर्घ-कालिन खरेदीदारांसाठी वीज अंत:क्षेपित करण्यास सुरुवात करील तेव्हा करारांतर्गत असलेल्या एकूण विजेसाठी ठोक वीज पारेषण करार पूर्णपणे कार्यान्वित करण्यात येईल (म्हणजेच ९५० मेगावॅट);

इ) अल्प-कालिन मुक्त प्रवेशाच्या कालावधी दरम्यान, एसपीटीसीएल सिन्नर टीपीपी ते महापारेषण कंपनीच्या ४०० केव्ही बाभळेश्वर उप-केंद्रापर्यंतच्या ४०० केव्ही पारेषण वाहिनीच्या देखभालीसाठी जबाबदार राहील.

**टाटा पॉवर कंपनी लि. ( पारेषण ) ची सन २०१६ च्या प्रकरण क्र. २२ मध्ये दि. ३०.६.२०१७ रोजी दिलेल्या बहु-वर्षीय वीज दर आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका ( सन २०१६ चे प्रकरण क्र. ११० )**

आयोगाने दि. १९ जुलै, २०१७ च्या आपल्या आदेशात, आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी बेजच्या संख्येच्या सुरुवातीच्या शिलकीत इक्सोरा बेजचा समावेश करुन सुधारणा केली. आयोगाने टीपीसी-पारेषणला सुधारित प्रमाणकानुसार संचालन व देखभाल खर्चापोटी नक्त कार्यक्षमता लाभ म्हणून रु.१.५३ कोटीची अतिरिक्त रक्कम मंजूर केली. आयोगाने पुढे असे नमूद केले की, टीपीसी-पारेषणने आपल्या आगामी मध्यावधी आढाव्याच्या याचिकेमध्ये ही अतिरिक्त रक्कम दाखवावी.

## विजेचे वितरण

**गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. ची बहु-वर्षीय वीज दर याचिका ( सन २०१६ चे प्रकरण क्र.१४९ )**

गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. (जीईपीएल)च्या बहु-वर्षीय वीज दर याचिकेवर जनतेचे अभिप्राय मागविण्यात आले आणि दि. २ फेब्रुवारी, २०१७ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. जीईपीएलसाठी पहिला वीज दर आदेश दि. १२ मार्च, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला. आयोगाने वर्गवारी-निहाय वीज दर अशा रीतीने निश्चित केले की मान्यता दिलेल्या वीज दरामधून संपूर्ण महसुली तूट वसुल करता येईल. जीईपीएलचे क्षेत्र व त्यांच्या ग्राहकांची रुपरेखा आणि माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून असलेले त्याचे स्वरुप विचारात घेता, क्रॉस-सबसिडी मागणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण क्षुल्लक होते. त्यामुळे, जीईपीएलच्या वीज दराच्या संरचनेमध्ये क्रॉस सबसिडीचा समावेश नव्हता.

त्याशिवाय, परवानाधारकाने स्थिर आकारातून त्यांच्या स्थिर खर्चाची वसुली शक्य तितक्या प्रमाणात करण्याचा प्रयत्न करावयास हवा हे यामागील तत्त्व विचारात घेऊन, आयोगाने, स्थिर आकार/मागणी आकारांपासून सुमारे ५० टक्के स्थिर खर्चाची वसुली करणे शक्य होण्यासाठी आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी स्थिर आकार/मागणी आकारांना मान्यता दिली.

**टीपीसी-वितरण ( सन २०१७ चे प्रकरण क्र. ५३ ) आणि आरइन्फ्रा-वितरण ( सन २०१६ चे प्रकरण क्र. ७२ ) ची मुंबईचे वितरण क्षेत्र आणि संबंधित बाबींसाठी महावितरण कंपनीशी स्टॅण्ड-बाय व्यवस्था करण्यासंबंधातील याचिका**

टीपीसी–वितरण आणि आरइन्फ्रा–वितरण यांनी त्यांच्या याचिकांमध्ये मुंबईतील वितरण यंत्रणेसाठी महावितरण कंपनीशी राखीव वीज व्यवस्था करण्यासंबंधात प्रश्न उपस्थित केले. आयोगाने दि. १६ आणि २३ मार्च, २०१७ रोजीच्या त्यांच्या आदेशात राखीव (स्टॅण्ड–बाय) व्यवस्थेच्या सबंधात खालील बाबी स्पष्ट केल्या:

- महावितरण कंपनीकडून स्टॅण्ड बाय सहाय्य घेण्यामागे मुंबईतील वितरण परवानाधारकांच्या करारांतर्गत निर्मिती क्षमतेमध्ये उद्‌भवू शकणाऱ्या कोणत्याही संभाव्य घटनेतून निर्माण होणारी गरज भागविण्याचा उद्देश आणि अपेक्षा आहे, आणि त्यामध्ये केवळ अंत:स्थापित निर्मिती संयंत्रे दुरुस्ती व देखभालीसाठी बंद ठेवण्याच्या (आऊटेज) किंवा बंद पडण्याच्या कालावधीपुरते सहाय्य घेण्यापुरता उद्देश मर्यादित नाही.
- स्टॅण्ड–बाय आकारांमधील परवानाधारकांचा संबंधित हिस्सा सध्या एकाच वेळी असलेल्या सर्वोच्च मागणीच्या (सीपीडी) आणि एकाच वेळी नसलेल्या सर्वोच्च मागणीच्या (एनसीपीडी) सरासरीवर आधारीत असून, त्याच्याच आधारे एकूण पारेषण यंत्रणा आकारांची विभागणी केली जाते.
- मुंबईतील प्रत्येक कार्यरत वितरण परवानाधारक (रेल्वेसह) महावितरण कंपनीला देय असलेल्या स्टॅण्ड–बाय आकारांमधील आपला हिस्सा अदा करील.

**टीपीसी-वितरण ( सन २०१७ चे प्रकरण क्र. ८२ ) आणि बेस्ट उपक्रम ( सन २०१७ चे प्रकरण क्र. ८६ ) ची सेवा जोडणी आकारांच्या सुधारणेसाठी याचिका**

टीपीसी–वितरण आणि बेस्ट उपक्रम यांनी त्यांच्या याचिकेमध्ये असे नमूद केले की, मुंबईतील समांतर वितरण परवानाधारकांनी आकारावयासाठी मान्यता दिलेल्या सेवा जोडणी आकारांमध्ये (एससीसी) लक्षणीय फरक असून त्याचा विपरित परिणाम स्पर्धात्मक स्थितीवर होतो. त्याविाय, महाराष्ट्र शासनाने 'भारतात व्यवसाय करा– वीज घ्या' या राष्ट्रीय मोहिमेंतर्गत घेतलेल्या पुढाकारामध्ये मुंबईतील वितरण परवानाधारकांना नवीन वीज जोडणी देण्यासाठीच्या आकारांत (१५० केडब्ल्यु पर्यंतच्या भारासाठी) राज्याच्या दरडोई उत्पन्नाच्या २५ टक्के पर्यंत कपात करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार, टीपीसी–वितरण आणि बेस्ट उपक्रमाने त्यांच्या याचिकेत सेवा जोडणी आकारांमध्ये सुधारणा प्रस्तावित केली.

आयोगाने दि. ९ आणि १६ फेब्रुवारी, २०१७ च्या आपल्या आदेशात नमूद केले की, सेवा जोडणी आकारांमधील सध्याची भिन्नता समांतर वितरण परवानाधारकांच्या समान पुरवठा क्षेत्रातील लघु–दाब ग्राहकांसाठी प्रतिकूल आहे. अशा ग्राहकांना समांतर परवानाधारकाकडून वीज पुरवठा घेण्याचे पर्याय स्वीकारण्यामध्ये देखील ही भिन्नता अडचणी उत्पन्न करणारी आहे, त्यामुळे त्यांच्या स्पर्धात्मक स्थितीवर आणि समान संधी मिळण्याच्या उद्दिष्टावर देखील त्याचा विपरीत परिणाम होतो. त्यानुसार, आयोगाने टीपीसी–वितरण आणि बेस्ट उपक्रमाने प्रस्तावित केलेल्या सेवा जोडणी आकारांमध्ये सुधारणेला परवानगी दिली.

**मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा. लि. ची मुक्त प्रवेश वापरावरील पॉवर फॅक्टर प्रोत्साहन–अधिदान लागू करण्यासंबंधात स्पष्टीकरणासाठी याचिका ( सन २०१७ चे प्रकरण क्र. ११० )**

आयोगाने दि. २८ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या आपल्या आदेशात स्पष्ट केले की, जरी मुक्त प्रवेश ग्राहक त्यांची विजेची अंशत: किंवा पूर्णत: गरज त्यांच्या वितरण परवानाधारकांऐवजी अन्य स्त्रोतांद्वारे भागवत असले तरी ते या विजेच्या वहनासाठी परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर करतात आणि त्यामुळे ते यंत्रणा हानिमध्ये भर घालतात (जोवर ते स्वतंत्रपणे जनित्राशी जोडलेले नसतात आणि परवानाधारकाच्या विद्युत जाळ्यापासून भौतिकरित्या अलग नसतात). जर त्यांना उच्च पॉवर फॅक्टर राखण्यासाठी प्रोत्साहन–अधिदान दिले नाही तर अशा ग्राहकांच्या पॉवर फॅक्टरमधील तफावतीच्या भरपाईसाठी सुधारात्मक उपाययोजना करण्याची वितरण परवानाधारकाची जबाबदारी तद्नुरुप जास्त राहील. त्याशिवाय, ग्राहक पातळीवर असे उपाय योजले तर पॉवर फॅक्टर उत्तमरित्या गाठता येऊ शकतो. या तत्त्वावर, आयोगाने असा निर्णय दिला की, वितरण परवानाधारकाकडून वीज घेणाऱ्या ग्राहकांसाठी वीज दर आदेशामध्ये देण्यात आलेल्या पॉवर फॅक्टर प्रोत्साहन–अधिदान/दंडाप्रमाणेच अशा ग्राहकांनी मुक्त प्रवेशामधून घेतलेल्या विजेवर पॉवर फॅक्टर प्रोत्साहन–अधिदान/दंड लागू राहील.

**महावितरण कंपनीची सप्टेंबर आणि डिसेंबर, २०१६ मधील काही कालावधीसाठी मान्यता दिलेल्या भार नियमन कार्यपध्दतीमध्ये फेरबदल करण्यासाठी याचिका ( सन २०१६ चे प्रकरण क्र. १२० )**

महाराष्ट्र शासनाने उभ्या पिकांचे रक्षण करण्यासाठी दिलेल्या सूचनांवर, महावितरण कंपनीने मर्यादित कालावधीसाठी भार नियमन कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका सादर केली आणि कृषी पंपांना दिवसाच्या कालावधीत १२ तास आणि रात्रीच्या कालावधीत १२ आा चक्राकार पध्दतीने ३-फेज वीज उपलब्ध करुन देण्यासंदर्भात सुधारणा करण्यास मान्यता मागितली.

आयोगाने आपल्या आदेशात मान्यता दिलेल्या भार नियमन कार्यपध्दतीपासून मर्यादित कालावधीसाठी फारकत घेण्यास मान्यता दिली. तथापि, आयोगाने स्पष्ट केले की, महाराष्ट्र शासनाने यापूर्वी मान्य केल्याप्रमाणे या फारकतीचे आर्थिक परिणाम सबसिडीच्या रुपात देणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करण्याचे निर्देश महावितरण कंपनीला देण्यात आले.

## परवाना देणे

**राज्यांतर्गत वीज व्यापार परवानाधारकांकडून केल्या जाणाऱ्या व्यापार परवाना अटींच्या पालनाचे पुनर्विलोकन ( सन २०१७ चे प्रकरण क्र. १४२ )**

आयोगाने इंडियाबुल्स पॉवर जनरेशन लि., एनटीएस पॉवर, नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टम्स प्रा. लि., २१ सेन्चुरी इन्फ्रास्ट्रक्चर (इंडिया) प्रा. लि. आणि डी. एम. कॉर्पोरेशन प्रा. लि. या ५ राज्यांतर्गत वीज व्यापार परवान्यांना मंजुरी दिली होती.

वीज व्यापार परवानाधारक विजेचा व्यवहार करीत नसल्याचे आणि त्यांच्या परवाना अटींचे पालन करीत नसल्याचे दिसून आल्याने, आयोगाने सन २०१५ च्या परवाना क्र. ८९ द्वारा त्यांच्याविरुध्द कारवाई सुरु केली. इंडियाबुल्स पॉवर जनरेशन लि. ने वीज व्यापार करणे अशक्य असल्याचे उद्धृत करीत आपला परवाना प्रत्यापित करण्याची परवानगी मागितली आणि आयोगाने परवाना प्रत्यार्पणाची त्यांची विनंती मान्य केली. आयोगाने, सन २०१५ च्या प्रकरण क्र. ८९ मध्ये दि. ८ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या आदेशान्वये अन्य चार वीज व्यापार परवानाधारकांना, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १९ (३) अंतर्गत, त्यांचा परवाना का रद्द करु नये याबाबत कारणे दाखवा नोटीसा निर्गमित केल्या.

या नोटीशीच्या प्रत्युत्तरादाखल, एनटीएस पॉवरने आयोगाला विनंती केली की, त्यांनी वीज व्यापार सुरु केलेला असल्याने त्यांचा परवाना रद्द करु नये. नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टम्स प्रा. लि. ने त्यांचा वीज व्यापार परवाना प्रत्यापित करण्यास परवानगी मागितली. अन्य दोन कंपन्या, म्हणजेच - २१ सेन्चुरी इन्फ्रास्ट्रक्चर (इंडिया) प्रा. लि. आणि डी. एम. कार्पोरेशन प्रा.लि. यांनी कारणे दाखवा नोटीशीवर प्रतिक्रिया दिली नाही. शिवाय, या परवानाधारकांचा प्रतिनिधी देखील दि. ६ डिसेंबर, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या जाहीर सुनावणीला हजर राहिला नाही.

आयोगाने, दि. १२ डिसेंबर, २०१७ रोजीच्या आपल्या आदेशात २१ सेन्चुरी इन्फ्रास्ट्रक्चर (इंडिया) प्रा. लि. आणि डी. एम. कार्पोरेशन प्रा. लि. चा परवाना रद्द केला आणि नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टम्स प्रा. लि. ची परवाना प्रत्यापित करण्याची विनंती मान्य केली. एनटीएस पॉवरने वीज व्यापारास प्रारंभ केलेला असल्याने आणि वीज व्यवहार सुरु केल्याने त्यांचा वीज व्यापार परवाना पुढे सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात आली.

**न्युफाऊण्ड प्रॉपर्टीज् ॲण्ड लिजिंग प्रा. लि. ची, एमआयडीसी ट्रान्स-ठाणे क्रीक इण्डस्ट्रीयल एरिया, जिल्हा - ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी त्यांचा मानीव वितरण परवानाधारकाचा दर्जा पटलावर घेण्यासाठी आणि त्यांच्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करण्यासाठी याचिका ( सन २०१७ प्रकरण क्र. ८० )**

विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ३ अंतर्गत, न्युफाऊण्ड प्रॉपर्टीज ॲण्ड लिजिंग प्रा.लि. (एनपीएल) एमआयडीसी ट्रान्स-ठाणे क्रीक इण्डस्ट्रीयल एरिया, जिल्हा - ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी क्षेत्र-विशिष्ट एसईझेडची उभारणी करीत आहे.

भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाने दि. २१ ऑगस्ट, २००६ च्या पत्रान्वये सदर एसईझेडच्या विकास, संचालन आणि देखभालीसाठी न्युफाऊण्ड प्रॉपर्टीज ॲण्ड लिजिंग प्रा.लि. (एनपीएल) यांना परवानगी दिलेली आहे. दि. २२ ऑगस्ट, २००८ च्या अधिसूचना क्र. एस.ओ. २०९४(इ) अन्वये मंत्रालयाकडून एनपीएलला या क्षेत्राचे विकसक म्हणून देखील अधिसूचित करण्यात आले आहे.

एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम ४९(१)(बी) अंतर्गत दि. ३ मार्च, २०१० च्या अधिसूचनेन्वये विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (बी) ला एक परंतुक जोडण्यात आले, ज्याद्वारे एसईझेडच्या विकासकाला वितरण परवानाधारक असल्याचे मानण्यात आले आहे. त्यामुळे, एनपीएल त्यांच्या एसईझेड क्षेत्रासाठी मानीव वितरण परवानाधारक आहेत. त्यानुसार, एनपीएलने वरील एसईझेड क्षेत्राचा विकासक म्हणून त्यांचा मानीव वितरण परवानाधारकाचा दर्जा पटलावर घेण्यासाठी आणि त्यांना लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी निर्गमित करण्यासाठी एक याचिका दाखल केली.

आयोगाने असे निरीक्षण नोंदवले की, एनपीएल एसईझेडचे विकासक असल्यामुळे, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ अंतर्गत मानीव वितरण परवानाधारक आहेत. एनपीएलने त्यांच्यावरील बंधनांची पूर्तता करण्यासाठी ठोस योजना देखील सादर केली होती. त्यानुसार, आयोगाने दि. २ फेब्रुवारी, २०१८ च्या आपल्या आदेशान्वये या एसईझेड क्षेत्रासाठी मानीव वितरण परवानाधारक म्हणून एनपीएलचा दर्जा कायम केला.

एनपीएलला त्यांची ग्राहक गाऱ्हाणे निवारण यंत्रणा स्थापन करण्याचे आणि सहा महिन्यांच्या आत अन्य आवश्यकतांची पूर्तता करण्याचे निर्देश देण्यात आले. आयोगाने एनपीएलला असे निर्देश दिले की, त्यांनी त्यांच्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी निर्गमित झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत कमाल वीज दराच्या मान्यतेसाठीची याचिका दाखल करावी.

आयोगाने आपल्या आदेशात असे नमूद केले की, एनपीएलच्या विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करणारे विनियम स्वतंत्रपणे अधिसूचित करण्यात येतील.

**टाटा पॉवर कंपनी लि. ( वितरण )ची सन २०१४ च्या प्रकरण क्र. ९० मध्ये दि. १४ ऑगस्ट, २०१४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने विद्युत जाळे उभारणीच्या सुधारित आराखड्याच्या मान्यतेसाठी याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. १८२ )**
**आणि**
**टाटा पॉवर कंपनी लि. ( वितरण )ची विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाच्या दि. २८ नोव्हेंबर, २०१४ च्या ( २०१५ चा ४० ) विद्युत निवाड्याच्या अनुषंगाने मुंबईतील समांतर परवाना क्षेत्रातील स्थानांतरित ग्राहकांसाठीच्या कार्यपध्दती संबंधात याचिका ( सन २०१५ चे प्रकरण क्र. ४० )**

आयोगाने सन २०१४ च्या प्रकरण क्र. ९० मध्ये दि. १४ ऑगस्ट, २०१४ रोजी दिलेल्या आदेशान्वये टीपीसीला मुंबई शहर, मुंबई उपनगरातील काही भाग आणि चेने–वेसावे गावांसह मिरा–भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी दि. १६ ऑगस्ट, २०१४ पासून २५ वर्षांसाठी वितरण परवाना क्र. २०१४ चा १ मंजुर केला होता. यावेळी काही त्रुटी विचारात घेऊन, टीपीसी–वितरणला स्वतंत्रपणे विद्युत जाळे उभारणीचा सुधारीत आराखडा स्वतंत्रपणे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

त्यानुसार, टीपीसी–वितरणने विद्युत जाळे उभारणीचा सुधारीत आराखडा प्रस्तावित करणारी याचिका (सन २०१४ चे प्र.क्र. १८२) दाखल केली. तथापि, विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाने पूर्वीच्या प्रकरणातील अपील क्र. २०१२ चे २२९ आणि २४६ दि. २८ नोव्हेंबर, २०१२ रोजी निकालात काढले, आणि टीपीसी–वितरणचा विद्युत जाळे उभारणीचा आराखडा ज्या तत्त्वावर आधारित असावयास हवा त्या संबंधात आणि आरइन्फा–वितरणच्या आणि त्यांच्या समान परवाना क्षेत्रातील अर्जदारांना वीज पुरवठा करण्याच्या निरीक्षणाबाबत काही निर्देश दिले. विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाचा निकाल विचारात घेऊन, टीपीसीने दि. १२ फेब्रुवारी, २०१५ रोजी सन २०१४ च्या प्रकरण क्र. १८२ अंतर्गत विद्युत जाळे उभारणीचा पुढील सुधारित आराखडा आयोगाकडे सादर केला.

एटीईने आयोगाला देखील सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून एका वितरण यंत्रणेकडून आणि/किंवा परवानाधारकाकडून अन्य वितरण यंत्रणा आणि/किंवा परवानाधारकाकडे स्थानांतरण करणाऱ्या ग्राहकांसाठी (म्हणजेच स्वीचओव्हर आणि चेंज–ओव्हर) प्रक्रिया आणि कार्यपध्दती ठरविण्याबाबत निर्देश दिले. या निर्देशांच्या अनुषंगाने टीपीसी–वितरणने २०१५ च्या प्रकरण क्र. ४० मध्ये ग्राहकांसाठी (विशेषत्वाने, स्वीचओव्हर ग्राहकांसाठी) त्यांच्या पसंतीच्या वितरण जाळयाच्या निवडीसाठी स्थानांतरणाची कार्यपध्दती प्रस्तावित करणारी याचिका दाखल केली.

एटीईच्या निवाडानुसार, मुंबईतील अन्य वितरण परवानाधारकांना या दोन्ही प्रकरणांमध्ये पक्षकार बनविण्यात आले आणि ही बाब संलग्न असल्यामुळे, या प्रकरणांची सुनावणी एकत्रित घेण्यात आली.

आयोगाने २०१४ च्या प्रकरण क्र. १८२ मध्ये दि. ९ नोव्हेंबर, २०१५ रोजी एक अंतरिम आदेश पारित करुन पुढील मुद्यांवर, जसे की –

नवीन वीज जोडण्यांसाठी कार्यपध्दती आणि प्रक्रिया, समान कार्यक्षेत्रातील एका परवानाधारकाकडून दुसऱ्या परवानाधारकाकडे ग्राहकांचे स्थानांतरण, ही प्रक्रिया कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असणारी संस्थात्मक यंत्रणा, परवानाधारकांच्या वितरण जाळ्याची पर्याप्तता निश्चित करण्यासाठीची पध्दती आणि बेस्ट उपक्रमाच्या पुरवठा क्षेत्रासाठी गुंतवणूक (इनपुट्स) इ. बाबत शिफारशी करण्यासाठी समिती गठीत केली.

या समितीने दि. २८ मार्च २०१६ रोजी त्यांचा अहवाल सादर केला. समितीचा अहवाल टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण, बेस्ट उपक्रम, महावितरण कंपनी आणि प्राधिकृत संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधींकडे त्यांच्या प्रतिक्रियांसाठी पाठविण्यात आला. टीपीसी-वितरणच्या विद्युत जाळे उभारणीच्या प्रस्तावित आराखड्यावर आणि समितीच्या शिफारशींवर अभिप्राय, सूचना किंवा हरकती मागविण्यासाठी दि. २० मे, २०१६ रोजी एक जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. दि. २१ जून, २०१६ रोजी यावर जाहीर सुनावणी घेण्यात आली.

पटलावर ठेवण्यात आलेल्या सर्व दस्ताऐवजांच्या आधारावर आणि प्राप्त झालेल्या विविध हरकती/सूचना विचारात घेऊन, आयोगाने या दोन्ही प्रकरणांवर दि. १२ जून, २०१७ रोजी सामाईक आदेश पारित केला.

या आदेशात, आयोगाने, क्षेत्रातील वितरण परवानाधारकाच्या उपस्थितीच्या व्याप्तीच्या व्याख्या, जसे की, 'संपूर्णपणे व्याप्त', 'उपस्थित' आणि 'अस्तित्वात नसणे', नवीन ग्राहकाची व्याख्या, जोडणी कायमची खंडीत केलेल्या ग्राहकांचा विचार, पुनर्विकासाची प्रकरणे आणि नवीन ग्राहक किंवा अन्यथा म्हणून तात्पुरत्या जोडणीचे रुपांतर कायमच्या जोडणीत करणे, वितरण जाळे (वायर/वाहणावळ) आणि वितरण परवानाधारकाची निवड करण्याचा ग्राहकाचा पर्याय, स्वीचओव्हर करण्यास परवानगी देण्याचे निकष, रुपरेखा ५३(डी) अंतर्गत वितरण जाळ्याचा विस्तार आणि वाढीमुळे येणाऱ्या खर्चाचे व लाभाचे मूल्यांकन करण्याचे निकष, रुपरेखा ५३(डी) मधील अर्जांच्या छाननीसाठी कार्यपध्दती आणि बेस्टाी सामाईक असलेल्या परवाना क्षेत्रात टीपीसी-डीचे वितरण जाळे उभारणीचा आराखडा यासारख्या बाबी निश्चित करुन त्यांचे विश्लेषण केले.

एटीईच्या निवाड्यामध्ये घालून देण्यात आलेली तत्त्वे विचारात घेऊन, आयोगाने खालीलप्रमाणे निर्णय दिला -

एक) नवीन जोडणी जेथे द्यावयाची आहे त्या ठिकाणी परवानाधारकाने वितरणाच्या मुख्य वाहिन्यांचा (मेन्स) विस्तार किंवा वाढ न करता त्याच्या विद्यमान वितरण मुख्य वाहिन्यांमधून जोडणी दिली तर ते ठिकाण परवानाधारकाने संपूर्णपणे व्याप्त केल्याचे मानण्यात येईल.

दोन) जोडणी कायमची खंडीत झालेली प्रकरणे नवीन ग्राहक म्हणून पात्र ठरु शकणार नाहीत.

तीन) ग्राहक वीज पुरवठा करणाऱ्या परवानाधारकाची निवड करु शक्तात परंतु वितरण जाळ्याची नाही. परंतु जेथे समर्पित वितरण सुविधेंतर्गत स्वत:च्या जागेत वीज जोडणी घेण्यासाठी वितरण यंत्रणेच्या उभारणीचा खर्च करण्यास ग्राहक तयार असतो अशा ग्राहकाला वितरण परवानाधारक तसेच वितरण जाळे निवडण्याचा हक्क राहील.

चार) जर अन्य वितरण परवानाधारकाच्या वितरणाच्या मुख्य वाहिन्या देखील तेथेच असल्यास आणि केवळ सेवा वाहिनी टाकून ग्राहकाला वीज जोडणी देता येऊ शकत असल्यास, वितरण परवानाधारकाचा विद्यमान ग्राहक अन्य वितरण परवानाधारकाकडे स्वीचओव्हर करु शकेल.

पाच) जर दोन्ही परवानाधारकांच्या वितरणाच्या मुख्य वाहिन्या त्या क्षेत्रात असतील आणि केवळ सेवा वाहिनी टाकून ग्राहकाला वीज जोडणी देता येऊ शकत असेल तर, दोन्ही वितरण परवानाधारक क्षेत्रात 'संपूर्णपणे व्याप्त' असल्यामुळे ग्राहकाला वितरण जाळे आणि वीज पुरवठा करणारा परवानाधारक दोहोंची निवड करण्याचा पर्याय राहील.

सहा) आदेशात देण्यात आलेली वितरण जाळे उभारणीच्या संबंधातील सर्वसाधारण तत्त्वे चेने आणि वर्सोवा गावांसाठी समानरित्या लागू राहतील.

सात) अशा पुनर्विकासित जागेला वीज पुरवठा करण्यासाठीचा प्रत्येक अर्ज नवीन ग्राहकाकडून आलेला अर्ज म्हणून अर्हताप्राप्त राहील.

आठ) वीज जोडणी कायमची खंडीत झालेला ग्राहक नवीन ग्राहक म्हणून पात्र राहणार नाही.

नऊ) काही क्षेत्रांत (रुपरेखा ५३(डी) मध्ये असलेल्या), असा विद्युत पुरवठा करण्यासाठी वितरण परवानाधारकाने उभारावयाच्या वितरण यंत्रणेसंबंधातील निर्णय संस्थात्मक यंत्रणेकडून आवश्यक वितरण यंत्रणा उभारण्याच्या तुलनात्मक खर्चाच्या आधारावर घेण्यात येईल.

बेस्टच्या वीज पुरवठा क्षेत्राशी सामाईक क्षेत्रा संबंधात, टीपीसी-डी ला असे निर्देश देण्यात आले की, त्यांनी पहिल्या टप्प्यात विद्यमान वितरण यंत्रणेचा विकास करुन आणि दुसऱ्या टप्प्यात डाऊनस्ट्रीम वितरण यंत्रणेसह नवीन वितरण उप-केंद्राचा (डीएसएस) विकास करुन ७ वर्षांच्या आत टप्प्याटप्प्याने त्यांचे वितरण जाळे उभारावे. या टप्प्यांच्या आधारे, टीपीसी-डी ला त्यांच्या भांडवली खर्चाचा प्रस्ताव आयोगाच्या तत्त्वत: मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

आयोगाने, अंतरिम आदेशाच्या रुपरेखा ५३(डी) अंतर्गत वितरण परवानाधारकाकडे पाठविण्यात आलेल्या नवीन जोडणीसाठीच्या अर्जांचे मूल्यमापन करण्यासाठी आणि त्यावर निर्णय देण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा स्थापन केली. तसेच आयोगाने एका वितरण परवानाधारकाकडून दुसऱ्या परवानाधारकाकडे स्थलांतरित करण्यासाठीची आणि नवीन जोडणी देण्यासाठीची कार्यपध्दती देखील विनिर्दिष्ट केली.

**आरइन्फ्रा- पारेषण ची पारेषण परवाना क्र. २०११ चा १ मध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका ( सन २०१६ चे प्रकरण क्र. ९४ )**

आरइन्फ्रा-पारेषणला दि. ११ ऑगस्ट, २०११ रोजी पारेषण परवाना क्र. २०११ चा १ मंजूर करण्यात आला. हा वाहिनी-विशिष्ट परवाना असून त्यामध्ये आरइन्फ्रा-पारेषणचे पारेषण जाळे आणि त्याची डहाणू औष्णिक विद्युत केंद्राशी आणि टीपीसी-पारेषण व महापारेषण कंपनीच्या पारेषण जाळ्याशी आंतरजोडणी समाविष्ट आहे.

मुंबईतील पारेषण जाळ्याच्या बळकटीकरणासाठी आरइन्फ्रा-पारेषण आणि टीपीसी-पारेषण च्या पारेषण जाळ्यांमध्ये २२० केव्ही आंतरजोडणी वाहिनी स्थापित करण्याच्या उद्देशाने, आरइन्फ्रा-पारेषणने २२० केव्ही वर्सोवा अति-उच्च दाब केंद्राच्या ठिकाणी २२० केव्ही जीआयएस बेजचा विस्तार करण्याचे प्रस्तावित केले होते आणि राज्य पारेषण कंपनीने भांडवली खर्चाच्या योजनेसाठी आरइन्फ्रा-पारेषणच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (डीपीआर) मान्यता दिली होती.

अतिरिक्त जीआयएस बेज आरइन्फा-पारेषणच्या पारेषण परवान्याचा भाग नसल्यामुळे, आरइन्फ्रा-पारेषणने या प्रस्तावित बेजचा समावेश करण्यासाठी त्यांच्या पारेषण परवान्यात सुधारणा करण्याकरिता दि. ५ जुलै, २०१६ रोजी अर्ज केला.

आरइन्फ्रा-पारेषणने त्यांच्या सुधारीत याचिकेमध्ये, वर दिलेल्या बाबींव्यतिरिक्त, पारेषण परवाना मंजूर करण्यात आल्यानंतर कार्यान्वित झालेल्या पारेषण वाहिन्या व बेजची अद्ययावत स्थिती समाविष्ट करण्यासाठी आणि त्यावेळी प्रस्तावित करण्यात आलेल्या परंतु आता त्यांची आवयकता नसलेल्या काही वाहिन्या व बेज रद्द करण्यासाठी, पारेषण परवान्यात सुधारणा करण्याची देखील मागणी केली.

राज्य पारेषण कंपनीने पुष्टी दिली की, आरइन्फ्रा-पारेषणच्या वर्सोवा येथील अति-उच्च दाब उप-केंद्र येथे ६ अतिरिक्त २२ केव्ही बेज स्थापित करण्याच्या योजनेला त्यांच्याकडून मान्यता देण्यात आली होती आणि राज्य पारेषण कंपनीच्या आर्थिक वर्ष २०१७-२२ साठीच्या पंचवार्षिक योजनेचा तो एक भाग होता. आरइन्फ्रा-पारेषणने पारेषण वाहिन्या आणि बेजच्या अद्ययावत स्थितीसंबंधात सादर केलेल्या निवेदनांना देखील राज्य पारेषण कंपनीने पुष्टी दिली.

राज्य पारेषण कंपनीने दिलेली पुष्टी विचारात घेऊन, आयोगाने दि. १८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या आपल्या आदेशान्वये आरइन्फ्रा-पारेषणने पारेषण परवान्यात प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारणा केली. आयोगाने आरइन्फ्रा-पारेषणला निर्देश दिले की, त्यांनी मान्यताप्राप्त विक्रेत्यांच्या पुलच्या बाहेर त्यांच्या पारेषण योजना कार्यान्वित करताना स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया व्यापक आणि अधिक पारदर्शक असण्याची खातरजमा करावी.

## विजेची खरेदी

महावितरण आणि अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड (एपीएमएल) या दोहोंमध्ये झालेल्या वीज खरेदी कराराच्या उर्वरित कालावधीसाठी, स्किम फॉर हार्नेसिंग अॅण्ड अॅलोकेटिंग कोयला ट्रान्सपरन्सी इन इंडिया (SHAKTI) नुसार, वीज दरामध्ये सवलत देण्यासाठी पूरक वीज खरेदी कराराच्या मान्यतेसाठी एपीएमएलची याचिका (सन २०१८ चे कलम ७०)

आयोगाने दि. २० मार्च, २०१८ च्या आपल्या आदेशान्वये एपीएमएल आणि महावितरण कंपनीमध्ये दि. २४ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या पूरक वीज खरेदी करारास मान्यता दिली. पूरक वीज खरेदी करारानुसार, विक्रेता (एपीएमएल) दि. २२.०५.२०१७ च्या 'SHAKTI' धोरणामध्ये विहित केलेल्या अटींनुसार वीज खरेदी कराराच्या उर्वरित कालावधीसाठी मासिक विद्युत देयकांतील वीज दरात दरवर्षी सवलत देईल. आयोगाने एपीएमएल आणि महावितरण कंपनीला निर्देश दिले की, कोल इंडिया लिमिटेडच्या खाणींतून आलेल्या कोळशाच्या स्त्रोतावर अवलंबून वीज दरात देऊ केलेली सवलत १ ते ३ पैसे प्रति युनिट अशी बदलत असल्यामुळे, करारबध्द क्षमतेच्या तुलनेत वीज दरामध्ये दिलेली उचित सवलत प्राप्त करण्यासाठी स्त्रोत-निहाय कोळशाचा हिशोब ठेवण्याकरिता एपीएमएल आणि महावितरण कंपनी या दोहोंनी मिळून कार्यपध्दती विकसित करावी.

**टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (वितरण व्यवसाय) ची आर्थिक वर्ष २०१८-१९ ते २०२४-२५ करिता वीज प्राप्तीच्या योजनेस मान्यतेसाठी याचिका (सन २०१७ चे प्रकरण क्र. ३९)**

आयोगाने दि. २७ मार्च, २०१८ च्या आपल्या आदेशान्वये टीपीसी-निर्मिती आणि टीपीसी-वितरण या दोहोंतील एकूण ६७२ मेगावॅट क्षमतेसाठीच्या वीज खरेदी कराराच्या मुदतीत १ एप्रिल, २०१८ ते ३१ मार्च, २०१९ पर्यंतच्या एक वर्षाच्या वाढीस मान्यता दिली तसेच प्रारुप पूरक वीज खरेदी करारास मान्यता दिली आणि पूरक वीज खरेदी व्यवस्था कार्यान्वित झाल्याची प्रत १० दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश दिले. आयोगाने आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता मान्यता दिलेली केंद्र-निहाय आणि संच-निहाय करारबध्द क्षमता खालीलप्रमाणे आहे:-

| तपशील | स्थापित क्षमता (मेगावॅट) | आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता करारबध्द क्षमता (मेगावॅट) | |
|---|---|---|---|
| | | एकूण क्षमता | सहाय्यकारी वापरानंतर नक्त क्षमता |
| संच # ५ | ५०० | २४४ | २२९ |
| संच # ७ | १८० | ८८ | ८५ |
| संच # ८ | २५० | १२२ | ११२ |
| एकूण औष्णिक | ९३० | ४५४ | ४२६ |
| जल-विद्युत | ४४७ | २१८ | २१५ |
| **एकूण** | **१३७७** | **६७२** | **६४१** |

आर्थिक वर्ष २०१७-१८ पर्यंतची आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या पहिल्या सहा महिन्यांमधील प्रत्यक्ष विक्री आणि मागणी, स्पर्धात्मक बोलीद्वारे ७५० मेगावॅट मध्यम-कालिन वीज प्राप्त करण्यासाठी बेस्ट उपक्रमाने मागविलेल्या स्पर्धात्मक बोलीचे फलित आणि वेगवेगळ्या पारेषण योजनांची सुधारीत स्थिती विचारात घेऊन आर्थिक वर्ष २०१९-२० पासून उपलब्ध होणारी वर्ष-निहाय पारेषण क्षमता विचारात घेऊन, आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२४-२५ करिता दि. ३० नोव्हेंबर, २०१८ रोजीपर्यंत सुधारीत वीज खरेदी करार सादर करण्याचे निर्देश आयोगाने टीपीसी-वितरणला दिले.

**महावितरण कंपनीची सन २०१६ च्या प्रकरण क्र. ४८ मध्ये आयोगाने मान्यता दिलेल्या कमाल मर्यादा दरापेक्षा जास्त दराने अल्प-कालिन वीज खरेदी करण्यासाठी याचिका. (सन २०१७ चे प्रकरण क्र. १८१)**

आयोगाने दि. ५ जानेवारी, २०१८ च्या आदेशान्वये, विजेच्या संभाव्य तुटवड्याची गरज भागविण्यासाठी आणि भारनियमन टाळण्यासाठी

मे, २०१८ पर्यंत बहु-वर्षीय वीज आदेशामध्ये निश्चित केलेल्या प्रति युनिट रु. ४/- या कमाल मर्यादा दरापेक्षा जास्त दराने अल्प-कालिन विजेची खरेदी करण्यास महावितरण कंपनीला परवानगी दिली आणि जेव्हा आवश्यकता राहील तेव्हा, वीज दर स्पर्धात्मकतेमधून प्राप्त झालेला असणे, सर्वात कमी दराने उपलब्ध असलेल्या विजेची खरेदी करणे इ. काही अटींच्या अधीन राहून, अल्प-कालिन स्पर्धात्मक बोली मार्गदर्शक सूचनांनुसार ई-बोली पोर्टलवरुन आणि/किंवा पॉवर एक्स्चेंजमधून मे, २०१८ च्या अखेरपर्यंत अतिरिक्त वीज प्राप्त करण्यास परवानगी दिली.

**आरइन्फ्रा-वितरण आणि आरइन्फ्रा-निर्मिती यांची २३ फेब्रुवारी, २०१८ ते १५ ऑगस्ट, २०३६ पर्यंतच्या कालावधीसाठीच्या वीज खरेदी कराराच्या मान्यतेसाठी याचिका ( सन २०१७ चे प्रकरण क्र. ५ )**

आरइन्फ्रा-वितरण आणि आरइन्फ्रा-निर्मिती यांच्यामधील डहाणू औष्णिक विद्युत केंद्रातून वीज प्राप्त करण्यासाठीच्या मागील वीज खरेदी करारास आयोगाने जेव्हा २००९ साली मान्यता दिली होती त्यावेळच्या स्थितीपेक्षा सध्याच्या गतिमान विद्युत बाजारपेठेतील स्थिती, खास करुन नूतनशील ऊर्जा निर्मितीची क्षमता, दर आणि तंत्रज्ञानामध्ये त्वरेने होणारे बदल विचारात घेऊन, आयोगाने दि. ८ फेब्रुवारी, २०१८ च्या आदेशान्वये, आरइन्फ्रा-निर्मितीकडून ५०० मेगावॅट विजेच्या प्राप्तीसाठी प्रस्तावित केलेल्या वीज खरेदी कराराच्या मुदतवाढीस १८ वर्षांऐवजी प्रथमच ५ वर्षांच्या अल्प कालावधीसाठी मान्यता दिली.

आयोगाने असे नमूद केले की, या कालावधीच्या अखेरपर्यंत सर्वाधिक स्पर्धात्मक वीज दराने ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी, विजेच्या स्त्रोतांचे उपलब्ध पर्याय आणि उपलब्ध पारेषण क्षमतेच्या अपेक्षित विस्तारावर अवलंबून असणारे, अधिक माहितीपूर्ण निर्णय घेण्यात येतील.

आयोगाने आरइन्फ्राला आवश्यक त्या फेरबदलांसह विस्तारीत वीज खरेदी कराराची स्वाक्षांकित प्रत १० दिवसात सादर करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, आरइन्फ्राने वीज खरेदी कराराची प्रत सादर केली आणि आयोगाच्या संकेत-स्थळावर ही प्रत प्रकाशित करण्यात आली.

**गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. ची दि. १९ एप्रिल, २०१७ ते ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंतच्या कालावधीसाठी दिवसाच्या २४ तासांकरिता ( आरटीसी ) २ मेगावॅट वीज आणि सर्वोच्च मागणीच्या काळातील १ मेगावॅट वीज प्राप्त करण्यासाठीच्या वीज खरेदी कराराला आणि वीज दराच्या स्वीकृतीला मान्यता मिळविण्यासाठी याचिका ( सन २०१७ चे प्रकरण क्र. ४८ )**

आयोगाने दि. २१ जून, २०१७ च्या आपल्या आदेशान्वये १९ एप्रिल ते ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंतच्या कालावधीसाठीच्या वीज खरेदी करारास आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ च्या तरतुदींतर्गत अल्प-कालिन स्पर्धात्मक बोली मार्गदर्शक सूचनांनुसार निश्चित करण्यात आलेल्या वीज दराच्या स्वीकृतीस खालीलप्रमाणे मान्यता दिली :-

| विक्रेता | वेळ | पोहोचवणीच्या ठिकाणचे विजेचे परिमाण ( मेगावॅट ) | दर/वीज दर ( रु. प्रति युनिट ) |
|---|---|---|---|
| मे. ग्लोबल एनर्जी प्रा. लि., मुंबई (विजेचा स्त्रोत: डी. बी. पॉवर लि. छत्तीसगड) | ००.०० तास ते २४.०० तास (आठवड्याचे सर्व वार म्हणजेच सोमवार ते रविवार) | २ मेगावॅट | ३.४९ |
| | ०८.०० तास ते २३.०० तास (आठवड्याचे दिवस म्हणजेच सोमवार ते शुक्रवार, आणि राष्ट्रीय सुट्टया वगळून) | १ मेगावॅट | ३.७४ |

**जीईपीएलची ऑक्टोबर, २०१७ पासून ६ महिन्यांकरिता दिवसाच्या २४ तासांकरिता २ मेगावॅट वीज ( आरटीसी पॉवर ) प्राप्त करण्यासाठी वीज खरेदी कराराला आणि वीज दराच्या स्वीकृतीला मान्यता मिळविण्यासाठी याचिका ( सन २०१७ चे प्रकरण क्र. १३८ )**

आयोगाने दि. २९ सप्टेंबर, २०१७ च्या आदेशान्वये जीईपीएल आणि महावितरण कंपनी यांच्यामध्ये दि. १८ सप्टेंबर, २०१७ रोजी

१ सप्टेंबर, २०१७ ते ३१ मार्च, २०१८ पर्यंतच्या ६ महिन्यांच्या कालावधीसाठी झालेल्या वीज खरेदी कराराला मान्यता दिली आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ मधील तरतुदीनुसार ४ मेगावॅट आरटीसी रु. ४.१६ प्रति युनिट दरास स्वीकृती दिली.

**वीज निर्मिती केंद्र सुरु करण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या प्रारंभीच्या विजेला ( स्टार्ट-अप पॉवर ) लागू असलेला वीज दर, आणि दिनांक २२.०४.२०१० आणि ५.०६.२०१० रोजी झालेल्या वीज खरेदी करारांतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडला पुरवठा केलेल्या विजेतून पुरविण्यात आलेल्या प्रारंभीच्या विजेची परतफेड ( नेटींग ) करण्यासाठी रत्तन इंडिया पॉवर लि.ची ( आरपीएल ) याचिका ( सन २०१५ चे प्रकरण क्र. १४१ )**

आयोगाने दि. ३१ जुलै, २०१७ रोजीच्या आदेशान्वये, वाणिज्यिक वापरासाठी तयार राहण्याकरिता वीज संयत्र आणि त्याची सहाय्यकारी उपकरणे सुरु करण्यासाठी प्रारंभी लागणारी वीज, विद्युत संयत्र दुरुस्ती/देखभालीसाठी किंवा अन्य कारणासाठी बंद केल्यानंतर पुन्हा सुरु करण्यासाठीची प्रारंभीची वीज, किंवा ग्रीडचे कामकाज कोलमडल्यावर विद्युत संयत्र पुन्हा सुरु करण्यासाठी लागणाऱ्या प्रारंभीच्या विजेसाठी औद्योगिक वीज दर वर्गवारीची प्रयोज्यता स्पष्ट केली.

आरपीएलने मागणी केलेल्या विजेच्या परतफेडीच्या (नेटींग-ऑफ) व्यवस्थेच्या संबंधात, आयोगाने निर्णय दिला की, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६२ आणि ६३ अंतर्गत करण्यात आलेल्या वीज खरेदी करारांचे स्वरुप वेगळे आहे, आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत स्पर्धात्मक बोली मार्गदर्शक सूचनांतर्गत करण्यात आलेल्या वीज खरेदी करारांच्या बाबतीत कलम ६२ अंतर्गत मान्य केलेली योजना (त्या वीज निर्मात्यांच्या प्रकरणाप्रमाणे) स्वीकारण्याची आवश्यकता नाही.

**बृहन्मुंबई विद्युत वितरण अणि परिवहन उपक्रम ( बेस्ट ) यांची आर्थिक वर्ष २०१८-१९ ते आर्थिक वर्ष २०२७-२८ या कालावधीत वीज प्राप्तीच्या योजनेस मान्यता मिळण्याकरिता याचिका. ( सन २०१७ चे प्रकरण क्र. २५ ).**

आयोगाने आपल्या २३ सप्टेंबर, २०१७ च्या आदेशात, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत स्पर्धात्मक बोली मार्गदर्शक सुचनांनुसार, बेस्टच्या आर्थिक वर्ष २०१८-१९ पासून पुढील ५ वर्षांकरिता दिवसातील ३ निर्धारित वेळांसाठी ७५० मेगावॅट वीज खरेदी करण्यासाठी मध्यम-कालिन स्पर्धात्मक बोली मागविण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली. आयोगाने बेस्टला खालील निर्धारित वेळांसाठी एकाच वेळी पण तीन स्वतंत्र बोली प्रक्रियेच्या माध्यमातून ही वीज खरेदी करण्याचे निर्देश दिले:

(१) दिवसाच्या २४ तासांकरिता (आरटीसी) ३०० मेगावॅट वीज;
(२) ०७०० तास ते २४०० वाजेपर्यंत २०० मेगावॅट वीज आणि,
(३) ०९०० तास ते १९०० वाजेपर्यंत २५० मेगावॅट वीज.

**महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडची वीज खरेदी कराराच्या मान्यतेसाठी आणि १ सप्टेंबर, २०१७ ते ३१ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत ४-९ मेगावॅट अल्प-कालिन वीज खरेदी करण्यासाठी वीज दर स्वीकारण्याकरिता याचिका. ( सन २०१७ चे प्रकरण क्र. १२५ ).**

आयोगाने आपल्या ३० ऑगस्ट, २०१७ च्या आदेशात, अल्प-कालीन वीज खरेदीस (दिनांक २३.०८.२०१७ चा विद्युत खरेदी करार (पीपीए)) मान्यता दिली आणि कलम ६३ च्या तरतुदींनुसार निश्चित केलेले खालील वीज दर स्वीकारले:

| अनु. क्र. | कालावधी | वीज पुरवठा | निर्धारित वेळ ( तासात ) | परिमाण ( मेगावॅट ) | दर ( रु./ किलोवॅट तास ) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १.९.२०१८ ते ३१.८.२०१८ | नागपूर जिल्ह्यातील खारीखूर्द हिंगणा येथील २२० केव्ही एएमएनईपीएल (बस) आणि महावितरण कंपनीच्या पारेषण जाळयाच्या आंतरजोडणीचे ठिकाण | ००-२४ | ४ | ४.०१ |
| ०२ | | | ००-०६ | २ | ४.०१ |
| ०३ | | | ०६-०९ | ३ | ४.०१ |
| ०४ | | | ०९-१२ | ४ | ४.०१ |
| ०५ | | | १२-१७ | ५ | ४.०१ |
| ०६ | | | १७-२२ | ३ | ४.०१ |
| ०७ | | | २२-२४ | २ | ४.०१ |

संपूर्ण दिवसासाठी (००.०० ते २४.०० तास) ४ मेगावॅट आधारभूत विद्युत भाराची आवश्यकता आहे, आणि त्यानंतरच्या निर्धारित वेळेसाठी आवश्यक असलेली वीज या ४ मेगावॅट आधारभूत विद्युत भाराच्या व्यतिरिक्त लागते.

**महावितरण कंपनीसोबत केलेल्या चार वीज खरेदी करारातील ( पीपीए ) वीज दरामध्ये 'कायद्यातील बदलां'च्या घडामोडीमुळे समायोजन करण्यासाठी अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड ( ए पी एम एल )ची याचिका. ( सन २०१६ चे प्रकरण क्र. ३८ )**

आयोगाने दि. १८ ऑक्टोबर, २०१७ च्या आदेशात, कायद्यातील बदल म्हणून खालील घडामोडींना मान्यता दिली आहे.

१. छत्तीसगढ विकास आणि पर्यावरण उप-कराच्या दरामधील वाढ कायद्यातील बदलाची घटना होत नाही.

२. स्वामीत्वधनावरील डीएमएफ आणि एनएमइटीची वसुली, ही घटना कायद्यातील बदलामध्ये येते.

३. रेल्वे वाहतुकीवरील स्वच्छ भारत उप-कर कायद्यातील बदलाची घटना आहे.

४. बंदर अतिभार अधिभार ही घटना कायद्यातील बदलामध्ये येते, तथापि, आयोगाने असे नमूद केले की, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने अशाच घटनांचा समावेश असणाऱ्या प्रकरणामध्ये दिलेल्या आदेशाविरुध्द जीएमआर वरोरा एनर्जी लिमिटेडने विद्युत अपिलीय न्यायाधिकरणासमोर २०१७ चे अपील क्रमांक १११ दाखल केलेले आहे. विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाच्या या मुद्यावरील निर्णयानुसार, आयोगाने, कायद्यातील बदलाची घटना म्हणून बंदर अतिभार अधिभाराच्या वसुलीवर अंतिम निर्णयासाठी या आयोगासमोर दाद मागण्याची परवानगी दिली.

५. पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ मधील सुधारणेच्या संबंधात आयोगाने एपीएमएलला केंद्रीय विद्युत प्राधिकरणाची संबंधित मान्यता मिळाल्यानंतर संपर्क साधण्याचे निर्देश दिले आणि या नियमांतील आवयकतांची पूर्तता करण्यासाठीच्या अंतिम मुदतीस कमी अवधी उरला असल्याने आणि आतापर्यंत त्यांनी कोणतीही परिणामकारक पावले उचलल्याचे न दिसल्याने तसेच यामधून काही निष्पन्न न झाल्याने नियमांतील आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी वाढीव कालावधी मिळण्यासाठी केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाशी संपर्क साधण्याचे देखील आयोगाने निर्देश दिले.

६. सेवा करावरील स्वच्छ भारत उप-कर, ही घटना कायद्यातील बदलामध्ये येते.

७. सेवा करावरील कृषी कल्याण कर, ही घटना कायद्यातील बदलामध्ये येते.

८. रेल्वे वाहतुकीवरील कृषी कल्याण कर, ही घटना कायद्यातील बदलामध्ये येते.

९. कोल आणि कोक टर्मिनल अधिभाराची झालेली सुरुवात, ही घटना कायद्यातील बदलामध्ये येते.

१०. उडत्या राखेचा वापर करण्याच्या अधिसूचनेतील सुधारणे संदर्भात, आयोगाने असे नमूद केले की, सविस्तर तपशील नसताना कायद्याच्या तरतुदींमध्ये बदलांतर्गत हा प्रश्न हाताळणे अप्रस्तुत ठरेल. आयोगाने एपीएमएलला व्यापक माहितीसह स्वतंत्रपणे आयोगाशी संपर्क साधण्याचे निर्देश दिले.

**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत वीज खरेदी कराराच्या ( पीपीए ) विलंब भरणा अधिभार तरतुदींच्या संबंधात कायद्यातील बदलांच्या घडामोडींबाबत, महावितरण कंपनीची याचिका. ( सन २०१७ चे प्रकरण क्र. २४ )**

महावितरण कंपनीने वीज खरेदी करारातील विलंबाने प्रदाने करण्यावर विलंब भरणा अधिभार लावण्याच्या तरतुदीमध्ये सुधारणा करण्यात यावी किंवा विलंब भरणा अधिभार, एसबीआयच्या जुलै, २०१० पासून एक वर्षासाठीच्या कर्जावरील आधारभूत व्याज दराच्या (पीएलआर) आणि एसबीआयच्या एप्रिल, २०१६ पासून निधीवर आधारित व्याज दराने कर्जावर एक वर्षात होणाऱ्या सिमान्तिक खर्चाच्या (एमसीएलआर) आधारावर आकारण्यासाठी (जो वीज खरेदी करारात उल्लेख केलेल्या एसबीआरपेक्षा कमी आहे) परवानगी मागितली.

या संदर्भात, आयोगाने आपल्या १६ नोव्हेंबर, २०१७ च्या आदेशात नमूद केले की, स्टेट बँक ऑफ इंडियाने कर्जावरील आधारभूत व्याज दर अधिसूचित करणे चालू ठेवल्याने, ज्याद्वारे विलंब भरणा अधिभार निश्चित केला जातो, वीज खरेदी करारातील तरतुदींबाबत सहाय्य घेतले जाऊ शकत नाही. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये परस्पर सहमती असणे आवश्यक आहे. तसेच, महावितरण कंपनीने मागणी केलेल्या विलंब भरणा अधिभाराच्या (एलपीएस) तरतुदीमधील बदलास कोणत्याही प्रतिवादीने (वीज निर्माते) देखील सहमती दर्शविलेली नाही.

**अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेडची दि. ०८.०९.२००८, ३१.०३.२०१०, ०९.०८.२०१० आणि १६.०२.२०१३ रोजीच्या वीज खरेदी करारांमध्ये 'कायद्यातील बदलां'मुळे वीज दरात नुकसानभरपाई मिळण्यासाठी याचिका. ( सन २०१३ चे प्रकरण क्रमांक १८९ आणि सन २०१४ चे प्रकरण क्र. १४० )**

सन २०१६ च्या अपील क्रमांक ९८ मध्ये दि. ४ मे, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाने एपीएमएल ला हानिपूरक इंधन आकारांना मान्यता दिलेल्या सन २०१३ चे प्रकरण क्रमांक १८९ आणि सन २०१४ चे प्रकरण क्रमांक १४० मधील आदेशास बाजूस ठेवले. सर्वोच्च न्यायालयाने विद्युत क्षेत्रातील वॉचडॉग निकालामध्ये घालून दिलेली तत्त्वे विचारात घेऊन यावर पुन्हा अभिनिर्णय देण्याचे निर्देश विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाने आयोगाला दिले.

या प्रकरणी पुन्हा कार्यवाही केल्यानंतर, आयोग दि. ७ मार्च, २०१८ रोजीच्या आदेशात या निष्कर्षाप्रत आले की, नवीन कोळसा वितरण धोरणाच्या (एनसीडीपी) संबंधातील कायद्यातील बदलाच्या तरतुदी वीज खरेदी करारांतर्गत संच १ आणि २ (११८० मेगावॅट) तसेच संच ४ आणि ५ (१३२० मेगावॅट) मधील करारबध्द केलेल्या निर्मिती क्षमतेला लागु राहतील. या आदेशामध्ये मान्यता दिल्याप्रमाणे कायद्यातील बदलाच्या परिणामस्वरुप वीज दरात वाढ अंमलात आणण्याचा दिनांक - (१) डिलिव्हरीचा निर्धारित दिनांक, (२) नवीन कोळसा वितरण धोरण (एनसीडीपी), २०१३ (२६ जुलै,२०१३), आणि (३) संबंधित वीज खरेदी करारांतर्गत वीज पुरवठ्यास प्रारंभ होण्याचा प्रत्यक्ष दिनांक - या दिनांकानंतरचा राहील. कायद्यातील बदलाचा परिणाम आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या अखेरपर्यंतच विचारात घेण्यात येईल, म्हणजेच वित्तीय प्रकरणांवरील सल्लागार समिती (सीसीईए) च्या निर्णयात उल्लेख केलेले १२ व्या योजनेचे अंतिम वर्ष आणि नवीन कोळसा वितरण धोरण, २०१३.

आयोगाने पुढे असे निर्देश दिले की, एनसीपीडी २०१३ च्या अनुषंगाने कोल इंडिया लि.च्या आश्वासित कोळशाच्या पुरवठ्यात घट झाल्यामुळे कायद्यातील बदलाच्या परिणामाची परिगणना, एपीएमएलने त्यांच्या बोलीमध्ये सादर केलेल्या कार्यात्मक मापदंड किंवा प्रमाणकानुसार कार्यात्मक मापदंड, यापैकी जो श्रेष्ठ असेल त्याच्या संदर्भात करावयास हवी. आयोगाने या आदेशात मान्यता दिलेल्या कायद्यातील बदलाच्या परिणामांच्या परिगणनेसाठीच्या कार्यपध्दतीस देखील मान्यता दिली.

**आयोगाने सन २०१५ च्या प्रकरण क्रमांक ६५ मध्ये दि. ६.११.२०१५ रोजी दिलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्याबाबत पीटीसी इंडियाची याचिका. ( टाटा पॉवर कंपनी लिमिटेड ( टीपीसी-वितरण ) आणि आयडियल एनर्जी प्रा.लि.( आयईपीएल ) यांच्यातील वीज खरेदी करार ) ( सन २०१६ चे प्रकरण क्र. ८ )**

आयोगाने सन २०१५ च्या प्रकरण क्र. ६५ मध्ये दि. ६.११.२०१५ रोजी दिलेल्या आदेशात, आयडियल एनर्जी प्रा.लि.च्या कोळशावर आधरित विद्युत निर्मिती प्रकल्पातून टीपीसी-वितरणला १७० मेगावॅट वीज खरेदी करण्यास परवानगी दिली. टीपीसी-वितरण आणि आयईपीएल यांनी आयईपीएल च्या सन २०१५ च्या प्रकरण क्र. ६५ ची संपुर्ण वस्तुस्थिती मांडलेली नाही आणि आयईपीएल पीटीसी इंडिया लि. सोबत यापूर्वीच करारबध्द होते ज्यासाठी आयोगाने टीपीसी-डी आणि आयईपीएल यांना वीज खरेदी करण्यास मान्यता दिलेली आहे, या आधारकारणावर पीटीसी इंडिया लिमिटेडने आयोगाकडे या आदेशाच्या पुनर्विलोकनाची मागणी केली.

आयोगाने सन २०१६ च्या प्रकरण क्र. ८ मध्ये दि. १५.०६.२०१७ रोजी दिलेल्या आदेशात नमूद केले की, जर आणखी एक वीज खरेदी करार केलेला असेल तर, तो करार किंवा त्याचा दर्जा परस्पर संमतीने संपुष्टात आला नसेल किंवा संबंधित अभिनिर्णय प्राधिकाऱ्याने कोणत्याही वादावर निर्णय दिला असेल, किंवा कोणताही संबंधित प्रश्न असेल तर, त्याबाबतची वस्तुस्थिती आयोगास कळविणे टीपीसी-वितरण आणि आयइपीएल यांचे कर्तव्य होते. आयोगाने टीपीसी-वितरणच्या वर्तणुकीवर नाराजी व्यक्त केली. टीपीसी-वितरण आपल्या वर्तनाचे आत्मपरीक्षण करील आणि दीर्घकाळ वाटचाल करणारे एक अग्रगण्य वितरण परवानाधारक म्हणून असलेले आपले स्थान विचारात घेऊन भविष्यात काम करील या अपक्षेने आयोगाने याबाबतीत पुढील कारवाई न करण्याचे ठरविले.

याच आदेशात, पीटीसीने टीपीसी-वितरणला आपल्या माध्यमातून १७० मेगावॅट विजेची विक्री करण्यासाठी निर्देश देण्यासंबंधी केलेल्या विनंतीस आयोगाने नकार दिला. ही विनंती आयोगाच्या आक्षेपित आदेशाच्या पुनर्विलोकनाच्या व्याप्तीच्या पूर्णत: बाहेरील असल्याने आयोगाने हा नकार दिला.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. सोबत दि. २३.२.२०१० रोजीच्या वीज खरेदी करारांतर्गत 'कायद्यातील बदलां'मुळे वीज दरामध्ये सुधारणा करण्यासाठी जेएसडब्ल्यु एनर्जी लि.ची याचिका.**

आयोगाने सन २०१६ चे प्रकरण क्रमांक ११७ मधील दिनांक २३.०८.२०१७ च्या आदेशात कायद्यातील बदल म्हणून खालील घडामोडींना मान्यता दिली आहे:

१. सेवा कर दरातील वाढ
२. स्वच्छ भारत उप-कराची वसुली
३. कृषी कल्याण उप-कराची वसुली
४. मालवाहू जहाजाने भारता बाहेरुन माल आणताना भारतातील पहिल्या जकात केंद्रावर माल उतरवताना वाहतुकीवरील सेवा कर, स्वच्छ भारत उप-कर आणि कृषी कल्याण उप-कराची वसुली.
५. महाराष्ट्र मूल्यवर्धित कराच्या दरात वाढ.

संचालन आणि देखभाल खर्चामध्ये कायद्यातील बदलांमुळे झालेल्या वाढीच्या भरपाईच्या प्रयोज्यतेसंबंधात आयोगाने निर्णय दिला की, कायद्यातील बदलाच्या घटनांमुळे निर्मिती संचाच्या संचालन व देखभाल खर्चाच्या परिणामांसाठी सेवा कर, स्वच्छ भारत उप-कर, कृषी कल्याण उप-कर आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कराची वसुली आणि/किंवा वाढ करण्याचा जेएसडब्ल्युईएलचा दावा करारानुसार नाही.

## नूतनशील ऊर्जा

**आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये कार्यन्वित होणाऱ्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पांकरिता व्यापक वीज दर आदेश ( सन २०१७ चे प्रकरण क्र. ३३ )**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती विनियम),२०१५ च्या विनियम ९.१ नुसार, आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये कार्यन्वित व्हावयाच्या खालील प्रकारच्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पांकरिता आयोगाने दि. २८ एप्रिल, २०१७ रोजी व्यापक वीज दर आदेश पारित केला.

अ. पवन ऊर्जा प्रकल्प
ब. बायोमासवर आधारित ऊर्जा प्रकल्प
क. अ-खनिज इंधनावर आधारित सह-निर्मिती प्रकल्प.
ड. मिनी/मायक्रो आणि अन्य लघु जल-विद्युत प्रकल्प.
इ. सौर फोटो व्होल्टॅक (पीव्ही) आणि सौर औष्णिक ऊर्जा प्रकल्प.
ई. सौर रुफ-टॉप पीव्ही यंत्रणा ऊर्जा प्रकल्प.

**महावितरण कंपनी विरुध्द विंडमिल ओनर्स वेल्फेअर असोसिएशन ऑफ इंडियाची याचिका ( सन २०१६ चे प्रकरण क्रमांक १५७ ) आणि**
**महावितरण कंपनी विरुध्द राजलक्ष्मी मिनरल्सची याचिका ( सन २०१६ चे प्रकरण क्र. १६६ ) आणि**
**महावितरण कंपनी विरुध्द धानजी डेव्हलपर्सची याचिका ( सन २०१७ चे प्रकरण क्र. १८ )**

या आदेशांतर्गत, आयोगाने पवन ऊर्जा विक्रीचे येणे बाकी असलेल्या रकमा आणि विलंबाने भरणा केलेल्या रकमांच्या प्रश्नांवर कार्यवाही केली. आयोगाने महावितरण कंपनीला पुढील निर्देश दिले - (१) मुद्दलाची देय रक्कम अदा करणे. (२) विलंब भरणा अधिभार ३० दिवसांच्या आत अदा करणे (३) हा कालावधी संपल्यानंतर, शिल्लक विलंब भरणा अधिभाराच्या रकमेवर प्रति महिना १.२५ टक्के दराने व्याज देणे (४) ज्या याचिकाकर्त्यांनी आणि विंडमिल ओनर्स वेल्फेअर असोसिएशन ऑफ इंडियाच्या संबंधित सदस्यांनी देय रकमांच्या समायोजनाची मागणी केली आहे त्यांच्याबाबतीत महावितरण कंपनी त्यांच्या ग्राहक ऊर्जा देयकात ह्या रकमा समायोजित करण्याचा पर्याय देखील स्वीकारु शकेल.

सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीच्या हिशोबपूर्तीकरिता मार्गदर्शक सूचनांसाठी महावितरण कंपनीने केलेली याचिका. (सन २०१७ चे प्रकरण क्रमांक ८७)

महाराष्ट्रातील अनिश्चित सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीमध्ये अपेक्षित असलेल्या वाढीतून उद्‌भवणारे प्रश्न, एफओआर मॉडल विनियम आणि इतर राज्यातील राबवले जाणारे उपक्रम याबाबत आपणांस जाणीव असल्याचे निरीक्षण आयोगाने या प्रकरणी नोंदवले. या बाबी विचारात घेऊन आयोगाने सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण(शेड्युलिंग) आणि तफावतीच्या हिशोबपूर्तीकरिता प्रारुप विनियम तयार केले जात असल्याचे आणि जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता त्यावरील चर्चेच्या कागदपत्रासह लवकरच हे विनियम प्रसिध्द करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

**ऊर्जा खरेदी कराराच्या समाप्तीनंतर, स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून आणि पवन ऊर्जा निर्मिती कंपन्यांकडून अल्प-कालिन सौर आणि पवन ऊर्जा खरेदीस मान्यता मिळविण्यासाठी महावितरण कंपनीने केलेली याचिका. ( सन २०१७ चे प्रकरण क्र. १५५ )**

या प्रकरणी आयोगाने अल्प-कालिन तत्त्वावर ५६.४ मेगावॅट पवन ऊर्जेच्या खरेदीसाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून आलेला वीज दर स्वीकारण्याच्या आणि या प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या विजेच्या परिमाणाची गणना त्यांच्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनांच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेमध्ये करण्याबाबतच्या प्रश्नांचा परामर्श घेतला.

त्यानुसार, आयोगाने खालीलप्रमाणे वीज खरेदी आणि दरांना मान्यता दिली आहे.

| पुरवठादार | वीज खरेदीचे मान्यताप्राप्त परिमाण ( मेगावॅट ) | कालावधी | वेळ | दर ( रु./किलोवॅट तास ) |
|---|---|---|---|---|
| एनटीपीसी विद्युत व्यापार निगम लि. | ५०.४ | वीज खरेदी कराराच्या स्वाक्षरीच्या दिनांकापासून दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत | ००.०० तास ते २४.०० तास | ३.३९ |
| सरला परफॉर्मन्स फायबर्स लि. | ६ | | | ३.४४ |

**मविनिआ ( नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती ) विनियम, २०१५ च्या विनियम ५ अंतर्गत स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून दीर्घ/मध्यम/अल्प-कालिन नूतनशील ऊर्जा खरेदीच्या मान्यतेसाठी महावितरण कंपनीने केलेली याचिका. ( सन २०१७ चे प्रकरण क्र. १५७ )**

या प्रकरणी, आयोगाने स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून दीर्घ/मध्यम/अल्प-कालिन नूतनशील ऊर्जा खरेदीस मान्यता मिळविण्यासाठी आणि या प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या विजेच्या परिमाणाची गणना संबंधित कालावधीकरिता नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनांच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेमध्ये करण्याबाबतच्या प्रश्नांचा परामर्श घेतला.

आयोगाने महावितरण कंपनीला निर्देश दिले की, वीज दराच्या स्वीकृतीसाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत वीज दर स्वीकारण्यासाठी प्रमाण बोली दस्तावेजांसह बोली प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांनी खरेदी करावयाच्या विजेचे परिमाण आणि त्यासाठीचा कालावधी विनिर्दिष्ट करुन आयोगाशी संपर्क साधावा आणि प्रमाण बोली दस्तावेजांमध्ये तफावत आल्यास बोली प्रक्रियेपूर्वी संपर्क साधावा.

**महावितरण कंपनीने त्यांच्या विद्यमान उप-केंद्राच्या जागेत उभारावयाच्या प्रस्तावित रुफटॉप/जमिनीवरील सौर ऊर्जा प्रकल्पातून दीर्घ-कालिन तत्वावर २०० मेगावॅट सौर ऊर्जा खरेदीसाठी आणि ही खरेदी केलेली सौर ऊर्जा नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनांच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेसाठी विचारात घेण्यासाठी मान्यता मिळण्याबाबत केलेली याचिका. ( सन २०१७ चे प्रकरण क्र. १६४ )**

या प्रकरणी, आयोगाने महावितरण कंपनीने हाती घेतलेल्या प्रस्तावित प्रकल्पाचे स्वरुप आणि हेतू ध्यानात घेऊन ग्राहकांच्या हिताचा विचार करुन रु. ३.०० प्रति युनिट दराने दीर्घ-कालिन तत्त्वावर २०० मेगावॅट सौर वीज प्राप्त करण्यास मान्यता दिली आणि संबंधित कालावधीकरिता नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनांच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेमध्ये याद्वारे प्राप्त झालेल्या विजेच्या परिमाणाची गणना करण्यास देखील मान्यता दिली. आयोगाने वीज खरेदी कराराच्या मसुद्यास देखील काही फारकतीसह मान्यता दिली.

**बिगर-सौर नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनांची पूर्तता करण्यासाठी दीर्घ-कालावधीसाठी ऊसाच्या चिपाडांवर आधारित सह-निर्मिती प्रकल्पातून ऊर्जा खरेदीसाठी प्रमाण बोली दस्ताऐवजातील तफावतीस परवानगी मागण्यासाठी महावितरण कंपनीने केलेली याचिका. ( सन २०१७ चे प्रकरण क्र. १८३ )**

या प्रकरणी, आयोगाने स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून ऊसाच्या चिपाडांवर आधारित सह-निर्मिती प्रकल्पातून ऊर्जा खरेदीस मान्यता दिली आणि या प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या विजेच्या परिमाणाची गणना संबंधित कालावधीकरिता बिगर-सौर नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनांच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेसाठी करण्यास देखील मान्यता दिली. आयोगाने वीज खरेदी कराराच्या मुसद्यास देखील काही फारकतीसह मान्यता दिली आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत बंधनकारक असल्यानुसार वीज दराच्या स्वीकृतीसाठी आयोगाशी संपर्क साधण्याचे महावितरण कंपनीला निर्देश दिले.

**वितरण परवानाधारकांसाठी आयोगाने स्वत:हून दिलेले नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन आदेश.**

आपल्या स्वतंत्र आदेशाच्या माध्यमातून, आयोगाने स्वत:हून पुढाकार घेऊन, मविनिआ (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम,२०१० मधील तरतुदींनुसार, आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता महावितरण कंपनी, बेस्ट उपक्रम, टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (वितरण), रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर (वितरण), माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रा.लि., भारतीय रेल्वे यांच्या नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेची पडताळणी केली.

## मुक्त प्रवेश

**मुक्त प्रवेश देण्यापूर्वी प्रदानाची सुरक्षितता म्हणून स्व-वापरासाठी विजेची निर्मिती करणाऱ्या निर्मात्यांकडून क्रॉस-सबसिडी अधिभार अणि अतिरिक्त अधिभाराच्या सममूल्य बँक हमी / पतपत्र घेण्याबाबत प्रस्तावित करण्याकरिता महावितरण कंपनीची याचिका. ( सन २०१७ चे प्रकरण क्र. २३ )**

महावितरण कंपनीने, मुक्त प्रवेश देण्यापूर्वी प्रदानाची सुरक्षितता म्हणून स्व-वापरासाठी वीज निर्मिती करणारा वीजनिर्माता किंवा स्व-वापराकरिता वीज निर्मिती करणाऱ्या निर्मात्यांच्या समुहाकडून (सीपीपी/जीसीपीपी) क्रॉस-सबसिडी अधिभार अणि अतिरिक्त अधिभार इ. च्या सममूल्य बँक हमी / पतपत्र घेण्याचे प्रस्तावित करण्यासाठी याचिका दाखल केली. जर हे वीजनिर्माते सीपीपी निकषांची पूर्तता अंतिमत: न करु शकल्याचे आढळून आल्यास मुक्त प्रवेशास मान्यता देण्यासाठीची पूर्व-अट म्हणून ही पतपत्रे देय राहतील.

महावितरण कंपनीने आपल्या याचिकेत विविध प्रश्नांचा, जसे की, स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पांना पूर्ण कराव्या लागणाऱ्या निकषांच्या निश्चितीकरणाबाबतचे पूर्वीचे वाद, क्रॉस-सबसिडी अधिभार आणि अतिरिक्त अधिभाराच्या वसुलीतील विलंब आणि महावितरण कंपनीच्या ग्राहकांवरील त्याचा आर्थिक बोझाचा उल्लेख केला. महावितरण कंपनीने असाही दावा केला की, स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पांच्या समुहातील स्व-वापरासाठी वीजनिर्माता ग्राहकांच्या भागीदारी पध्दतीमध्ये वरचेवर बदल होत असतो. त्यामुळे, आर्थिक वर्षाच्या अखेरीस वीज निर्मात्यांची सीपीपी स्थिती निर्धारित केली जाते तेव्हा, वीज नियम, २००५ मधील सीपीपी निकष पूर्ण करण्यात जर ते अयशस्वी ठरले तर, महावितरण कंपनीला क्रॉस-सबसिडी अधिभाराच्या वसुलीसाठी त्यांच्या प्रत्येक ग्राहकाचा पाठपुरवठा करावा लागतो. महावितरण कंपनीने वीज नियमांत विहित केलेल्या निकषांची पूर्तता केल्याचे दाखविताना करण्यात येणारे कथित हातचलाखीचे प्रश्न, यातून उद्‌भवणारे अनावश्यक खटले आणि महावितरण कंपनीला सोसावे लागणारे अन्याय्य नुकसान यासारखे प्रश्न देखील उपस्थित केले.

मे. कॅप्टीव्ह पॉवर प्रोड्युसर् असोसिएशन, साई वर्धा पॉवर जनरेशन लिमिटेड, ओपीजीएस पॉवर गुजरात प्रा. लि. आणि जेएसडब्ल्यु एनर्जी लिमिटेड यांच्याकडून हस्तक्षेप अर्ज प्राप्त झाले. ह्या अर्जदारांनी महावितरण कंपनीच्या याचिकेचा विरोध करताना स्व-वापरासाठीच्या

वीज निर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या विद्युत अधिनियम, २००३ च्या मुख्य उद्दिष्टांच्या विरुध्द ही बाब असल्याचे नमूद केले.

आयोगाने असे निरीक्षण नोंदवले की, स्व-वापरासाठीचा निर्मिती प्रकल्प म्हणून निर्मिती प्रकल्पांना पूर्ण कराव्या लागणाऱ्या निकषांचे निश्चितीकरण वर्षाच्या सुरुवातीला न करता ते फक्त वर्ष संपल्यानंतरच केले जाऊ शकते. तसेच, बँक हमी किंवा पतपत्राच्या स्वरुपात देयक सुरक्षा उपलब्ध करुन देताना त्यासाठी बराच निधी गुंतून रहात असल्यामुळे त्यावरील व्याजाला मुकावे लागते.

दि. १७ जानेवारी, २०१८ च्या आदेशानुसार आयोगाने, महावितरण कंपनीची विनंती स्वीकारण्यास नकार दिला. तथापि, आयोगाने या आदेशामध्ये वितरण परवानाधारक आणि स्व-वापरासाठीचे वीजनिर्माते या दोघांनाही अधिक स्पष्टता आणि दिलासा मिळावा आणि निर्मिती प्रकल्पांना पूर्ण कराव्या लागणाऱ्या निकषांचे निश्चितीकरण सुव्यवस्थित होण्यासाठी त्यांची कामे आणि जबाबदाऱ्यांसह वेळेची चौकट ठरवून दिली.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. ने वितरण मुक्त प्रवेश विनियम, २०१६ चे पालन न केल्याबाबत आणि चुकीची मासिक देयक पध्दती स्वीकारल्याबाबत अल्ट्रा टेक सिमेंटची याचिका. ( सन २०१६चे प्रकरण क्र. १३९ )**

आयोगाने आपल्या दिनांक ११ ऑगस्ट,२०१७ रोजीच्या आदेशात नमूद केले की, वितरण मुक्त प्रवेश विनियम, २०१६ पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांसाठी नसून केवळ नूतनशील ऊर्जा स्त्रोतांच्या बँकिंगसाठी लागू आहे. त्याशिवाय, या प्रकरणात ग्राहक हा स्व-वापरासाठीचा वीज निर्मितीचा ग्राहक आहे. स्व-वापरासाठीचे वीज निर्मिती प्रकल्प (सीपीपी) स्थापन करण्याचा मुख्य उद्देश हा प्रामुख्याने स्व-वापरासाठी वीज निर्मिती करण्याचा आहे. याबाबतीत, स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पामधून निर्माण होणारी वीज प्रथम कॅप्टिव्ह ग्राहकांच्या एकूण वापरासाठी आणि नंतर उर्वरित स्त्रोतांसाठी समयोजित करणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त, या प्रकरणात स्व-वापरासाठीची वीज स्थिर पारंपरिक वीज असल्यामुळे ती नियोजन करण्यायोग्य आहे, तर नूतनशील ऊर्जा अ-निश्चित असल्याने ती 'मस्ट रन' आहे. त्यामुळे, जर ही पारंपारिक ऊर्जा प्रथम समायोजित केली गेली नाही तर ती 'बॅन्क्ड' न करता आल्याने फुकट जाऊ शकते. या बाबींचा विचार करुन, आयोगाने विजेचे युनिट्स समायोजित करण्याबाबतच्या संदिग्धतेचे निरसन करण्यासाठी, वितरण मुक्त प्रवेश, २०१६ च्या मूळ हेतुनुसार देयक आकारणीच्या पध्दतीमध्ये सुधारणा करुन, ही पध्दती मुक्त प्रवेशाच्या कार्यवाहीमध्ये समाविष्ट करुन, एका महिन्याच्या आत त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याचे महावितरण कंपनीला निर्देश दिले. आयोगाने महावितरण कंपनीला दोन महिन्यांच्या आत अशा सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांच्या देयकांमध्ये त्यानुसार सुधारणा करण्याचे आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाकडे सोपवण्याचे देखील निर्देश दिले.

**स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पातून स्व-वापरासाठीच्या उपयोगकर्त्यांसाठी वीज पुरवठा करण्याच्या प्रयोजनासाठी आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या मध्यावधीत महावितरण कंपनीने विद्युत अधिनियम २००३च्या कलम १० नुसार मुक्त प्रवेशाच्या मंजुरीबाबत केलेल्या चुकीच्या कार्यवाहीबद्दल ओपीजीएस पॉवर गुजरात प्रायव्हेट लिमिटेड यांची याचिका. ( सन २०१८ चे प्रकरण क्र. २७ )**

आयोगाने आपल्या दि. १२ जानेवारी, २०१८ रोजीच्या आदेशात नमूद केले की, जर वीज निर्मिती कंपनीकडे एकापेक्षा जास्त राज्यात वीज निर्मिती आणि विक्रीसाठी संयुक्त योजना असेल तर अशा वीज निर्मिती कंपन्यांच्या नियमनाचे अधिकार विद्युत अधिनियम, २००३च्या कलम ७९ अन्वये केंद्रीय विद्युत नियामक आयोगाला (सीईआरसी) आहेत. आयोगाने आणखी असेही नमूद केले की, एकापेक्षा अधिक राज्य यामध्ये समाविष्ट असल्यामुळे या विद्यमान प्रकरणातील व्यवस्था एक संयुक्त योजना आहे. हे विचारात घेऊन आयोगाने ओपीजीसला या प्रकरणी केंद्रीय विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागण्याचे आणि उचित दिलासा मागण्याचे निर्देश दिले.

**ग्राहकांच्या वीज देयकांमध्ये 'बँन्क' युनिट्सच्या समायोजनासाठी मे. कृष्णा व्हॅली पॉवर लिमिटेड आणि सह्याद्री रिन्युएबल एनर्जी प्रा.लिमिटेड यांची याचिका.( सन २०१७ चे प्रकरण क्र. १३७ )**

आयोगाने आपल्या दि. १५ जानेवारी, २०१८ रोजीच्या आदेशात असे नमूद केले की, आयोगाने विजेच्या बँन्कींग सुविधा भरपाईसंबंधात हितसंबंधित, मुक्त प्रवेश ग्राहक आणि वितरण परवानाधारक यांच्या दृष्टीकोनांचा समतोल साधला आहे, ज्याचे अधिक स्पष्टीकरण वितरण मुक्त प्रवेश विनियम, २०१६ च्या कारणांसाठीच्या निवेदनांमध्ये देण्यात आले आहे. आयोगाने आणखी असे नमूद केले की, मुक्त प्रवेश ग्राहकांना बँकिंग सवलत मिळवण्याकरिता संपूर्ण आर्थिक वर्षात अखंडीत मुक्त प्रवेश मिळविणे अनिवार्य नाही. याचा अर्थ, इतर

बाबींबरोबर, असा की, विजेच्या बँकिंगसाठी ग्राहकांना आर्थिक वर्षात अखंडीतपणे मुक्त प्रवेश प्राप्त करण्याची आवश्यकता नाही. आयोगाने महावितरण कंपनीला निर्देश दिले की, जर त्याच ग्राहकाने त्याच वीज निर्मात्याकडून मुक्त प्रवेशासाठी मागणी केली असेल तर जानेवारी, २०१७ पासून ग्राहकांच्या वीज देयकांमध्ये याचिकाकर्त्यांच्या बँक ऊर्जेचे समायोजन करावे.

**त्रिपक्षीय वीज खरेदी कराराच्या अनुषंगाने साई वर्धा पॉवर लिमिटेड यांना अदा केलेले रु. ५०.४४ कोटी आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी क्रॉस-सबसिडी अधिभारापोटीच्या उर्वरीत रु. ८.७९ कोटींचा परतावा मिळण्याबाबत महावितरण कंपनीची याचिका. ( सन २०१४ चे प्रकरण क्र. २०६ )**

आयोगाने आपल्या दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ च्या आदेशात नमूद केले की, वीज खरेदी करार हा सामान्यपणे वीज खरेदीदार (वितरण परवानाधारक) आणि वीज विक्रेता (वीज निर्माता) यांच्यातील द्विपक्षीय करार आहे. तथापि, विद्यमान वीज खरेदी करार हा त्रिपक्षीय करार आहे ज्यामध्ये ग्राहकांचा समावेश असून तो स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पाच्या मॅट्रिक्सवर अवलंबून आहेत. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(१) (एफ) अंतर्गत आयोगाचे अधिकारक्षेत्र आणि वीज खरेदी कराराच्या तरतुदी आणि संदर्भ विचारात घेता, साई वर्धा पॉवर लिमिटेडने उल्लेख केलेला निर्णयविधी या परिस्थितीमध्ये लागू होत नाही. आयोगाने असेही नमूद केले की, वर उल्लेखलेला विशिष्ट संदर्भ आणि परिस्थिती नसती तर महावितरण कंपनीने अशा बदलत्या आणि अनिश्चित परिमाणात शिल्लक वीज खरेदी करण्यासाठी ऊर्जा खरेदी करार केला नसता. या बाबींचा विचार करुन, आयोगाने निर्णय दिला की, आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये स्व-वापरासाठीचा वीज निर्मिती प्रकल्प निकषांची पूर्तता करीत नसल्यामुळे, साई वर्धा पॉवर लिमिटेडने वीज खरेदी करारांतर्गत ज्यादा अंत:क्षेपण केलेल्या युनिट्सकरिता महावितरण कंपनीने अदा केलेल्या रकमेचा परतावा, दावा केल्याच्या पहिल्या महिन्यापासून असा परतावा देण्याच्या तारखेपर्यंत परताव्याच्या रकमेवरील व्याजासह, महावितरण कंपनीला करावा.

**पवन ऊर्जेचे समायोजन टीओडी स्लॉटमध्ये करण्याबाबत वितरण मुक्त प्रवेश विनियम, २०१६ मधील निर्देशांचे पालन न केल्याबद्दल अरविंद कॉटसिन ( इंडिया ) लिमिटेड, अरविंद डाईंग आणि ब्लिचिंग मिल्स प्रा.लि. आणि अरविंद फिनलीज प्रा.लि. यांची याचिका. ( सन २०१६ चे प्रकरण क्र. ८० )**

आयोगाने आपल्या दि. २७ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या आदेशात असे नमूद केले की, वितरण मुक्त प्रवेश विनियम, २०१६ च्या विनियम २०.४ च्या साधारण वाचनाप्रमाणे हे स्पष्ट होते की, जरी बँन्क ऊर्जेसाठीच्या क्रेडीटला ठरवून दिल्यानुसार चार महिन्यांमध्ये परवानगी देण्यात येत नसली तरी ऊर्जेच्या बँकिंगची कल्पना वार्षिक तत्त्वावर आहे. विजेचा वापर आणि अंत:क्षेपण यामध्ये वेगवेगळी परिस्थिती निर्माण होऊ शकते. या प्रत्येक परिस्थितीची हाताळणी करत असताना, प्रथम एखाद्या विशिष्ट महिन्याच्या वीज वापरास त्याच महिन्यात केलेल्या अंत:क्षेपणाबरोबर समयोजित करण्यात यावयास हवे. जर वीज वापराचे काही समायोजन करणे बाकी राहिल्यास, ते मागील महिन्यातील उपलब्ध बँक ऊर्जेमधून, असल्यास, समायोजित करण्यात यावयास हवे. या तत्त्वाचे अनुसरण संपूर्ण आर्थिक वर्षांतील वेगवेगळ्या परिस्थितीत करण्यात यावयास हवे. या बाबींचा विचार करुन, आयोगाने वितरण मुक्त प्रवेश, २०१६ च्या मूळ हेतुनुसार वीज देयक आकारणीच्या पध्दतीमध्ये सुधारणा करण्याचे आणि युनिट्स समायोजित करण्याबाबतच्या संदिग्धतेचे निरसन करण्याचे महावितरण कंपनीला निर्देश दिले.

**टाटा पॉवर कंपनी लि. ( वितरण ) ने वसुल केलेले चुकीचे वहन आकार आणि वहन हानि यांचा परतावा मिळण्याबाबत हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडची याचिका. ( सन २०१७ चे प्रकरण क्र. ५८ )**

आयोगाने आपल्या दि. १२ मार्च, २०१८ च्या आदेशात नमूद केले की, विद्युत अधिनियम, २००३ मध्ये पारेषण आणि वितरण मत्तांच्या वापराच्या संबंधात पारेषण आणि वहन ही अनुक्रमे दोन भिन्न कार्ये म्हणून मान्यता दिली आहे. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे (सीइए) तांत्रिक मानके विनियम आणि नियोजन निकष नियमावलीमध्ये देखील पारेषण आणि वितरणाच्या विद्युत दाब पातळीत फरक करण्यात आला आहे. आयोगाचे मुक्त प्रवेश विनियम देखील पारेषण आणि वितरण दोन्हींसाठी भिन्न आहेत. हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. सध्या टाटा पॉवर कंपनी लि. (पारेषण व्यवसाय)च्या पारेषण परवान्याचा भाग असलेल्या विद्युत वाहिन्यांद्वारे जोडलेले आहे आणि त्यामुळे ते राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा एक भाग आहेत. या प्रकरणी हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने टाटा पॉवर कंपनी लि. (वितरण व्यवसाय)ला वहन आकार आणि वहन तोटा यांचा परतावा करणे देय नाही. हे विचारात घेऊन, आयोगाने असा निर्णय दिला की, हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.ला पुरवठा केलेल्या विजेसाठी वहन आकार वसुल करण्याचा किंवा साई वर्धा पॉवर जनरेशन

कं.लि कडून मुक्त प्रवेशाद्वारे घेतलेल्या विजेवर वहन आकार आणि वहन हानि यांची आकारणी करण्याचा टीपीसी-वितरणला अधिकार नाही. त्यानुसार, आयोगाने टीपीसी-वितरणला निर्देश दिले की, हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.कडून या कारणास्तव जमा केलेल्या रकमेचा परतावा, लागू होणाऱ्या व्याजासह, एक महिन्याच्या आत थेट किंवा हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. च्या त्यानंतरच्या देयक चक्राच्या वीज देयकामध्ये समायोजित करुन, देण्यात यावा.

**भारतीय रेल्वेने खेचलेल्या ज्यादा विजेच्या आकारांच्या वसुलीसाठीच्या कार्यपध्दतीकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.ची याचिका. (सन २०१६ चे प्रकरण क्र. ११४)**

आयोगाने आपल्या दि. १९ मार्च, २०१८ च्या आदेशात निर्णय दिला की, रत्नागिरी गॅस आणि पॉवर प्रा.लि (आरजीपीपीएलएस) च्या करारबध्द केलेल्या संचामधून वीजनिर्मिती खंडीत झाल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे भारतीय रेल्वेने आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये राज्य ग्रीडमूधन खेचलेल्या ज्यादा विजेसाठी राज्य पारेषण कंपनीने पारेषण आकार आणि तोटा, लागू असलेल्या व्याजासह, वसुल करावा. आयोगाने आणखी असेही नमूद केले की, आर्थिकदृष्टया अधिक फायदेशीर ठरेल अशा वेगळया व्यवस्थेद्वारे अन्य कोणताही वीज निर्माता किंवा कंपनीकडून राखीव (स्टॅण्ड-बाय) वीज घेण्याचे भारतीय रेल्वेला स्वातंत्र्य आहे. आयोगाने आणखी असे नमूद केले की, महावितरण कंपनी किंवा इतर कंपनीसोबतच्या अशा राखीव वीज व्यवस्थेच्या अनुपस्थितीत, महावितरण कंपनी भारतीय रेल्वेच्या वीज खेचण्यामध्ये कपात करण्यासाठी उचित पावले उचलेल आणि त्यांनी करारबध्द केलेल्या वीज निर्मांत्यांकडून उपलब्ध असलेल्या विजेइतकी वीज खेचणे मर्यादित करील. आयोगाने असेही नमूद केले की, महावितरण कंपनीने मागणी केलेल्या स्वतंत्र कार्यपध्दतीची आवश्यकता नाही. भारतीय रेल्वे राज्य पूलचा एक भाग असल्याने ग्रिडचे स्थैर्य राखण्यासंबंधी त्यांच्यावर असलेल्या दायित्वाची पूर्तता भारतीय रेल्वे करील.

**आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता त्यांच्या संच ३ आणि ४ ला स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती संयंत्रांचा दर्जा घोषित करण्यासाठी साई वर्धा पॉवर जनरेशन लिमिटेडची याचिका. (सन २०१६ चे प्रकरण क्र. १५९ )**

आयोगाने आपल्या दि. १९ मार्च, २०१८ च्या आदेशात असा निर्णय दिला की, साई वर्धा पॉवर जनरेशन लि. आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये त्यांच्या संच ३ आणि ४ बाबतीत ते स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती संयत्रांचा (सीजीपी) समुह म्हणून पात्र ठरले आहेत आणि त्यानुसार, त्यांच्या स्व-वापरासाठीच्या निर्मितीच्या उपयोगकर्त्यांना परिणामकारक वितरणासह क्रॉस-सबसिडी अधिभाराच्या देयकात सूट मिळण्याचा हक्क आहे.

**मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून घेतल्या विजेवर टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (वितरण)ने केलेल्या नियामक मत्ता आकारांच्या चुकीच्या वसुलीसंबंधात हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडची याचिका. (सन २०१७ चे प्रकरण क्र. ४५)**

आयोगाने आपल्या दि. २१ मार्च, २०१८ च्या आदेशात हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, स्व-वापरासाठीच्या वीज निर्मात्यांच्या समुह व्यवस्थेच्या माध्यमातून साई वर्धा पॉवर जनरेशन लिमिटेडकडून अंशतः वीज घेणारा मुक्त प्रवेश ग्राहक असल्याचे नमूद केले. (सन २०१६ चे प्रकरण क्र. १५९ च्या अलीकडील आदेशात आयोगाने नमूद केले की, आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये साई वर्धा पॉवर जनरेशन लिमिटेड च्या संच ३ आणि ४ ला स्व:वापरासाठीच्या वीज निर्मिती केंद्राच्या समुह दर्जास आयोगाने मान्यता दिली आहे.) त्यामुळे, हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड क्रॉस-सबसिडी अधिभार अदा करण्यास जबाबदार नाही. त्याशिवाय हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड अति-उच्च दाबाच्या पारेषण जाळयाशी जोडलेला ग्राहक असल्याने टीपीसी-वितरणला वहन आकार देण्यास जबाबदार नाही. अशा रीतीने, जरी नियामक मत्ता आकार स्वतंत्रपणे काढण्यात आलेले नसले आणि वहन आकारात त्याचा एक भाग दाखवण्यात आलेला असला तरीही सदर आकार टीपीसी-वितरणला अदा करण्यास एचपीसीएल जबाबदार नाही. या बाबींचा विचार करुन आयोगाने असे नमूद केले की, साई वर्धा पॉवर जनरेशन लिमिटेडकडून मुक्त प्रवेशाद्वारे घेण्यात आलेल्या विजेवर नियामक मत्ता आकार देण्यास एचपीसीएल जबाबदार नाही. टीपीसी-वितरण नियामक मत्ता आकाराचा परतावा एचपीसीएलला, लागू होणाऱ्या व्याजासह, एका महिन्याच्या आत थेट किंवा हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. च्या आगामी देयक चक्राच्या वीज देयकात समायोजनाच्या माध्यमातून करील.

## ७. तत्वत: मंजुरी दिलेली महत्वाची भांडवली गुंतवणूक

वीज दरावरील परिणामाचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने, आयोगाने भांडवली गुंतवणूक मार्गदर्शक सूचना २००५ विनिर्दिष्ट केल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांनुसार, महाराष्ट्रातील नियमन करण्यात आलेल्या कंपन्या, म्हणजेच वीजनिर्मिती कंपन्या, पारेषण आणि वितरण परवानाधारकाला रु.१० कोटींपेक्षा जास्त भांडवली गुंतवणूक असलेली कोणतीही भांडवली योजना हाती घेण्याआधी आयोगाकडून तत्वत: मंजुरी मिळविणे आवश्यक राहील. खालील तक्त्यात आयोगाने आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये मान्यता दिलेल्या प्रस्तावांचा/सविस्तर प्रकलप अहवाल (डीपीआर) यांचा गोषवारा/सारांश देण्यात आला आहे.

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये आयोगाने तत्वत: मान्यता दिलेल्या भांडवली खर्चाच्या योजनांचा गोषवारा:

| अनु.क्र. | | विद्युत कंपन्या | भांडवली खर्चाच्या योजनांच्या प्रस्तावांची संख्या | रक्कम रु. कोटीत |
|---|---|---|---|---|
| १ | | विद्युत निर्मिती | | |
| | एक | महानिर्मिती कंपनी | ३५ | १८२२.३७ |
| | दोन | आरइन्फ्रा-निर्मिती | १ | २५.०९ |
| | तीन | टीपीसी-निर्मिती | १ | ७.३५ |
| | | **एकूण ( निर्मिती )-निर्मिती** | **३७** | **१८५४.८१** |
| २ | | पारेषण | | |
| | एक | महापारेषण कंपनी | ६० | ५५२८.४५ |
| | दोन | राज्य भार प्रेषण केंद्र | २ | ४७.४१ |
| | तीन | टीपीसी-पारेषण | ९ | १३१८.४५ |
| | | **एकूण ( पारेषण )-पारेषण** | **७१** | **६८९४.३१** |
| ३ | | वितरण | | |
| | एक | महावितरण कंपनी | ६ | २८५.२४ |
| | दोन | बेस्ट उपक्रम | ६ | ४५०.४४ |
| | तीन | आरइन्फ्रा-वितरण | १० | ९२८.६९ |
| | चार | टीपीसी-वितरण | ४ | १२०.५६ |
| | पाच | गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. (विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) मानीव वितरण परवानाधारक) | १ | ६०.०५ |
| | सहा | निदार युटीलिटीज पनवेल प्रा. लि. (विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) मानीव वितरण परवानाधारक) | १ | ८७.४९ |
| | | **एकूण ( वितरण )-वितरण** | **२८** | **१९३२.४७** |
| | | **एकूण ( निर्मिती + पारेषण + वितरण )** | **१३६** | **१०६८१.५९** |

## ८ विनियम

आयोगाने सर्व नवीन विनियम आणि विद्यमान विनियमांमधील सुधारणा, जनतेकडून सूचना/हरकती मागविल्यानंतर, महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत राजपत्रात अधिसूचित केल्या आहेत. आयोगाने आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये खालील विनियम/विनियमांमध्ये सुधारणा अधिसूचित केल्या आहेत.

**मविनिआ ( वीज व्यापार परवाना अटी ) ( दुसरी सुधारणा ) विनियम, २०१७ ( दि. २४ एप्रिल, २०१७ रोजी अधिसूचित ) आणि**

**मविनिआ ( पारेषण परवाना अटी ) ( दुसरी सुधारणा ) विनियम, २०१७ ( २४ एप्रिल, २०१७ रोजी अधिसूचित )**

आयोगाने दि. १० जून, २००४ रोजी मविनिआ (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ आणि मविनिआ (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ अधिसूचित केले होते, ज्यामध्ये त्यानंतर दि. २१ डिसेंबर, २००६ रोजी 'पात्रता अटी/अयोग्यता' संबंधित विनियम ४अ समाविष्ट करण्यासाठी सुधारणा करण्यात आली. या विनियमांनुसार, अर्जदाराविरुध्द कायदेशीर कार्यवाही प्रलंबित असल्यास, वीज व्यापार आणि पारेषण परवान्याच्या मान्यतेसाठीचा अर्ज फेटाळला जाऊ शकतो.

सर्वोच्च न्यायालयाने सन २००९ च्या दिवाणी अपील क्रमांक ३४५७-३४५८ मध्ये दिलेला निर्णय विचारात घेऊन या विनियमांमध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. विनियमांत नमूद करण्यात आलेल्या 'पात्रतेच्या अटी/अपात्रता' मधील 'प्रलंबित न्यायालयीन खटले' हा वाक्यांश काढून टाकून आयोगाने या विनियमांमध्ये सुधारणा केली.

**मविनिआ ( वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण ) ( पहिली सुधारणा ) विनियम २०१७ ( दि. १९ सप्टेंबर, २०१७ रोजी अधिसूचित )**

विशेषत्वाने शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील वाढत्या जागेच्या मर्यादा आणि अन्य घटक विचारात घेऊन, आयोगाने महानगपालिका क्षेत्र वगळून सर्व क्षेत्रात वीज जोडण्या देण्यासाठीच्या भार मर्यादेचे (८० केडब्ल्यू /१०० केव्हीए) पुन:परीक्षण केले आणि त्यामध्ये १५० केडब्ल्यू /१८७ केव्हीए पर्यंत वाढ केली. या विनियमांद्वारा आयोगाने महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील लघु-दाब जोडण्यांसाठी एकसमान भार मर्यादा प्रदान केली.

**मविनिआ ( बहु-वर्षीय वीज दर ) ( पहिली सुधारणा ) विनियम, २०१७ ( दि. २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी अधिसूचित )**

तिसऱ्या नियंत्रण कालवधीकरिता (आर्थिक वर्ष २०१६-१४ ते आर्थिक वर्ष २०१९-२०) दि. ८ डिसेंबर, २०१५ रोजी मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ अधिसूचित करण्यात आले. बहु-वर्षीय वीज दर, २०१५ च्या अनुषंगाने, आयोगाने वीज निर्मिती कंपन्या, पारेषण आणि वितरण परवानाधारक तसेच महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसइडीसीएल) यांच्यासाठी बहु-वर्षीय वीज दर आदेश निर्गमित केले आहेत.

बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०१५ च्या अधिसूचनेनंतर, काही अशा घडामोडी झाल्या ज्यांचा त्यामधील तरतुदींवर परिणाम झाला. अनेक विद्युत कंपन्या आणि इतरांनी वीज दराच्या निश्चितीकरणाची कार्यवाही चालू असताना आणि याचिकेद्वारा काही प्रश्न उपस्थित केले होते. यात विशेषत: संचालन आणि देखभाल खर्चाच्या तरतुदींवर काही हरकती घेण्यात आल्या आणि विनिर्दिष्ट केलेले निकष शिथिल करण्याची किंवा त्यात सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली. आयोगाने या प्रश्नांवर आणि अलीकडील घडामोडींवर अभ्यास सुरु केला. या अभ्यासाच्या आधारे, आयोगाने संचालन व देखभाल खर्चाच्या संबंधातील आपल्या विनियमांमध्ये सुधारणा केली आहे.

त्याशिवाय, भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) दिनांक ३ मार्च, २०१६ (२९ मार्च, २०१६ रोजी अद्ययावत) रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, फक्त निधीच्या सीमान्तिक खर्चावर आधारित कर्ज दराने (एमसीएलआर) नवीन कर्जे मंजूर करण्यात येत आहेत. बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०१५ मध्ये अल्प-मुदतीच्या आणि दीर्घ-मुदतीच्या कर्जाचे प्रमाणकानुसार व्याज दर स्टेट बँक ऑफ इंडियाच्या आधारभूत दराशी जोडले होते. स्टेट बँक ऑफ इंडियाने जरी त्यांचा आधारभूत दर अधिसूचित करण्याचे चालू ठेवले तरी तो केवळ विद्यमान मंजूर केलेल्या कर्जांनाच लागू राहणार आहे आणि सर्व नवीन कर्जे 'एमसीएलआर'च्या आधारे मंजूर करण्यात येत आहेत.

बहु-वर्षीय वीज दर विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे किमान लक्ष्यांक (बेंचमार्क) संदर्भ दराच्या (आधारभूत दर) निश्चितीकरणामुळे, खेळत्या भांडवलावरील व्याज, येणे असलेले व्याज/देणे असलेले व्याज, सुरक्षा अमानतीवरील व्याज आणि प्रमाणकानुसार दीर्घ मुदतीच्या कर्जासाठीच्या संदर्भ व्याज दरावर, परिणाम होतो, कारण या बाबी किमान लक्ष्यांक संदर्भ दराशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे, आयोगाने, बहु-वर्षीय वीज दराच्या विनियमांमध्ये 'एमसीएलआर'शी किमान लक्ष्यांक संदर्भ दर (आधारभूत दर) जोडण्यासाठी, आपल्या विनियमांमध्ये सुधारणा केली आहे.

# ९ ग्राहक गाऱ्हाणे निवारण यंत्रणा

विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(५) व (६) तसेच आयोगाचे विद्युत लोकपाल आणि ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच (सीजीआरएफ) विनियम, २००६ (जे विनियम विद्युत अधिनियम २००३ अंमलात आल्यानंतर थोड्याच दिवसांत २००३ मध्ये बदलण्यात आले होते)च्या अनुषंगाने, वितरण परवानाधारकांकडून अध्यक्ष आणि दोन सदस्य असलेले ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच (सीजीआरएफ), स्थापन करण्यात आले आहेत आणि दोन विद्युत लोकपाल (मुंबई आणि नागपूर) यांची नियुक्ती आयोगाकडून करण्यात आली आहे. या यंत्रणेंतर्गत ग्राहकांना त्यांच्या गाऱ्हाण्यांचे निवारण आणि काही प्रकरणांत नुकसानभरपाई न्यायालयात न जाता प्राप्त करुन घेणे शक्य झाले आहे.

## ९.१ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाराष्ट्रात २१ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच कार्यरत होते. त्यापैकी १६ मंच हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने स्थापन केले आहेत आणि उर्वरित मंच बेस्ट, आरइन्फ्रा-वितरण आणि टाटा पॉवर कंपनी-वितरण, माईंडस्पेस बिझनेस पार्क प्रा.लि.(एमबीपीपीएल) आणि गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. (जीईपीएल) या अन्य वितरण परवानाधारकांनी स्थापन केले आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम २००६ अंतर्गत, या मंचाचा एक सदस्य, जो ग्राहक संस्थांचे प्रतिनिधित्व करतो, आयोगाकडून नामनिर्देशित करण्यात येतो. परवानाधारकाने नेमावयाच्या अध्यक्षांचे पात्रता निकष ठरवून देण्यात आले आहेत. तिसरा सदस्य परवानाधारकाचे प्रतिनिधित्व करतो.

आर्थिक वर्ष २०१७-१८ मधील ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांच्या कामगिरीची थोडक्यात माहिती खालील अ ते ड या तक्त्यांमध्ये देण्यात आली आहे:-

### तक्ता अ

**महावितरण कंपनीच्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांकडे प्राप्त झालेली गाऱ्हाणी**

| अक्र. | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे नाव (परिमंडळ) | सुरुवातीच्या दिनांकास प्रलंबित असलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | त्या वर्षात प्राप्त झालेल्या झालेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | दाखल न करुन घेतलेल्या किंवा मागे घेतलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | कार्यवाही योग्य गाऱ्हाण्यांची संख्या | निवारण केलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | | | २०१७-१८ च्या अखेरीस प्रलंबित गाऱ्हाण्यांची संख्या | ग्राहकांच्या बाजूने निर्णय दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | परवानाधारकाच्या बाजूने निकाल दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ६० दिवसांच्या आत | ६० दिवसांच्या नंतर | एकूण | | | |
| १ | अमरावती | १ | ३० | ५ | २६ | ८ | ४ | १२ | १४ | ५ | ७ |
| २ | औरंगाबाद | १० | ४९ | २ | ५७ | २२ | २६ | ४८ | ९ | २८ | २० |
| ३ | भांडूप | २१ | ८९ | १ | १०९ | २६ | ५४ | ८० | २९ | ३४ | ४६ |
| ४ | कल्याण | १८० | १५६ | ० | ३३६ | ७६ | २३९ | ३१५ | २१ | २७६ | ३९ |
| ५ | कोल्हापूर | २२ | ७३ | ३ | ९२ | ३१ | ४५ | ७६ | १६ | ६२ | १४ |
| ६ | कोकण | ३ | २० | ० | २३ | ९ | १३ | २२ | १ | १६ | ६ |
| ७ | लातूर | ८ | १६ | ० | २४ | २ | १८ | २० | ४ | ११ | ९ |
| ८ | नागपूर(शहरी) | २४ | १०१ | ० | १२५ | ७७ | २५ | १०२ | २३ | ४१ | ६१ |
| ९ | नाशिक | १५ | ५८ | ० | ७३ | २९ | १८ | ४७ | २६ | ३० | १७ |
| १० | पुणे | ४ | ४४ | १ | ४७ | ४० | २ | ४२ | ५ | १३ | २९ |
| ११ | नांदेड | ४ | ५ | १ | ८ | ० | ७ | ७ | १ | ३ | ४ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | जळगांव | ८ | ६ | ० | १४ | १२ | १ | १३ | १ | १० | ३ |
| १३ | बारामती | ८ | १८ | २ | २४ | ४ | १८ | २२ | २ | १३ | ९ |
| १४ | गोंदिया | ० | १० | ० | १० | ६ | १ | ७ | ३ | ५ | २ |
| १५ | चंद्रपूर | २ | २ | १ | ३ | ३ | ० | ३ | ० | ० | ३ |
| १६ | अकोला | ९ | ३७ | ० | ४६ | ३२ | १ | ३३ | १३ | ३१ | २ |
| | एकूण | ३१९ | ७१४ | १६ | १०१७ | ३७७ | ४७२ | ८४९ | १६८ | ५७८ | २७१ |
| | | | | | | | | ८३.४८% | | ६८.०८% | ३१.९२% |

## तक्ता ब

### अन्य परवानाधारकांच्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांकडे प्राप्त झालेली गाऱ्हाणी

| अक्र. | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे नाव (परिमंडल) | सुरुवातीच्या दिनांकास प्रलंबित असलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | त्या वर्षात प्राप्त झालेल्या झालेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | दाखल न करुन घेतलेल्या किंवा मागे घेतलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | कार्यवाही योग्य गाऱ्हाण्यांची संख्या | निवारण केलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | | | २०१७-१८ च्या अखेरीस प्रलंबित गाऱ्हाण्यांची संख्या | ग्राहकांच्या बाजूने निर्णय दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | परवानाधारकाच्या बाजूने निकाल दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ६० दिवसांच्या आत | ६० दिवसांच्या नंतर | एकूण | | | |
| १ | आर-इन्फ्रा-वितरण | २ | ११ | ३ | १० | ५ | ५ | १० | ० | १ | ९ |
| २ | टीपीसी - वितरण | ० | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | १ |
| ३ | बेस्ट | ५ | ३४ | १ | ३८ | ३३ | १ | ३४ | ४ | ११ | २३ |
| ४ | एमबीपीपीएल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | जीईपीएल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | ७ | ४६ | ४ | ४९ | ३९ | ६ | ४५ | ४ | १२ | ३३ |
| | | | | | | | | ९१.८४% | | २६.६७% | ७३.३३% |

## तक्ता क

### ग्राहक वर्गवारीनुसार निवारण करण्यात आलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या

| गाऱ्हाण्यांची वर्गवारी/ प्रकार | महावितरण | आर-इन्फ्रा वितरण | टीपीसी वितरण | बेस्ट | एमबीपीपीएल | जीईपीएल | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| निवासी | २६५ | ८ | १ | १५ | ० | ० | २८९ |
| वाणिज्यिक | ९७ | २ | ० | १९ | ० | ० | ११८ |
| कृषी | ९८ | ० | ० | ० | ० | ० | ९८ |
| औद्योगिक | ३७८ | ० | ० | ० | ० | ० | ३७८ |
| अन्य | ११ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ८४९ | १० | १ | ३४ | ० | ० | ८९४ |

### तक्ता ड

**विषयानुसार निवारण करण्यात आलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या**

| गाऱ्हाण्यांची वर्गवारी/ प्रकार | महावितरण | आर-इन्फ्रा वितरण | टीपीसी वितरण | बेस्ट | एमबीपीपीएल | जीईपीएल | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| देयकाशी संबंधित | ६४३ | ५ | १ | २३ | ० | ० | ६७२ |
| सदोष मीटर | ३ | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| तांत्रिक | ३४ | ० | ० | ० | ० | ० | ३४ |
| नवीन जोडणी | १०१ | ४ | ० | ३ | ० | ० | १०८ |
| पुरवठाचा दर्जा | ३ | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| सेवेशी संबंधित | १९ | ० | ० | ० | ० | ० | १९ |
| अन्य | ४६ | १ | ० | ८ | ० | ० | ५५ |
| **एकूण** | **८४९** | **१०** | **१** | **३४** | **०** | **०** | **८९४** |

## ९.२ विद्युत लोकपाल

पहिल्या विद्युत लोकपाल यांच्या कार्यालयाची स्थापना २७ डिसेंबर, २००४ रोजी करण्यात आली. ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाच्या निर्णयाने बाधित झालेले ग्राहक विद्युत लोकपाल यांच्याकडे दाद मागू शकतात. राज्यात मुंबई आणि नागपूर येथे दोन विद्युत लोकपाल कार्यरत आहेत.

### विद्युत लोकपाल ( मुंबई )

श्री आर. डी. संखे हे विद्युत लोकपाल, मुंबई, म्हणून ७ एप्रिल, २०१४ पासून कार्यरत आहेत. विद्युत लोकपाल, मुंबई, यांच्या कार्यकक्षेत कोकण, पुणे व नाशिक हे महसुली विभाग येतात.

### विद्युत लोकपाल ( नागपूर )

न्यायमूर्ती (निवृत्त) श्री के. जे. रोही हे ५ जानेवारी, २०१७ रोजी निवृत्त होईपर्यंत विद्युत लोकपाल, नागपूर, म्हणून कार्यरत होते. त्यानंतर श्रीमती चित्कला झुत्सी या विद्युत लोकपाल, नागपूर, म्हणून १७ फेब्रुवारी, २०१७ पासून कार्यरत आहेत. विद्युत लोकपाल, नागपूर, यांच्या कार्यकक्षेत अमरावती, औरंगाबाद आणि नागपूर, हे महसुली विभाग येतात.

खालील तक्ता-इ मध्ये विद्युत लोकपाल यांनी आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये हाताळलेल्या अभिवेदनांची संख्या दाखविण्यात आली आहे.

### तक्ता-इ

| अ.क्र | विद्युत लोकपाल | सुरुवातीच्या दिनांकास प्रलंबित असलेल्या अभिवेदनांची | त्या वर्षात प्राप्त झालेल्या अभिवेदनांची संख्या | दाखल न करुन घेतलेल्या किंवा मागे घेतलेल्या अभिवेदनांची | कारवाई योग्य अभिवेदनांची संख्या | निवारण केलेल्या अभिवेदनांची संख्या | | | सन २०१७-१८ अखेर एकूण प्रलंबित अभिवेदनांची संख्या | ग्राहकांच्या बाजूने दिलेल्या निकालांची संख्या | परवानाधारकांच्या बाजूने दिलेल्या निकालांचा संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ६० दिवसांच्या आत | ६० दिवसांच्या आत | एकूण | | | |
| १ | नागपूर | ४३ | ६३ | ० | १०६ | १२ | ६६ | ७८ | २८ | ६० | १८ |
| २ | मुंबई | १० | १४६ | ० | १५६ | १२२ | १३ | १३५ | २१ | ८९ | ४६ |
| | **एकूण** | **५३** | **२०९** | **०** | **२६२** | **१३४** | **७९** | **२१३** | **४९** | **१४९** | **६४** |

## १०. माहितीचा अधिकार कायदा

विद्युत क्षेत्रात निष्पक्षता, वस्तुनिष्ठता आणि पारदर्शकतेच्या माध्यमातून स्पर्धात्मक वातावरणाची निर्मिती करण्यास आयोग बांधिल आहे. विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत येणाऱ्या जबाबदाऱ्यांशिवाय, आयोग कोणत्याही नागरिकास माहितीचा अधिकार, २००५ अंतर्गत माहिती देते. आयोगाचे श्री पी. डी. मोहरे, कक्ष अधिकारी आणि श्री अनिलकुमार उके, उप-संचालक (विधी) हे माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत अनुक्रमे जन माहिती अधिकारी (पीआयओ) आणि प्रथम अपील प्राधिकारी (एफएए) आहेत.

माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्राप्त झालेले आणि निकालात काढलेले अर्ज/अपील यांचा तपशील खालील तक्त्यात देण्यात आला आहे:

| अनु.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | माहितीच्या अधिकारांतर्गत जन माहिती अधिकाऱ्यास प्राप्त झालेले अर्ज | ११० |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडून माहिती देण्यात आलेल्या अर्जांची संख्या | ११० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेले अर्ज | ०० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याच्या आदेशाविरुध्द प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडे दाखल झालेल्या अपिलांची संख्या | १० |
| ५ | प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडून निकालात काढण्यात आलेल्या अपिलांची संख्या | १० |
| ६ | प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेल्या अपिलांची संख्या | ० |
| ७ | विहित कालमर्यादेत निकालात न काढण्यात आलेल्या अर्ज/अपिलांची संख्या | ० |

## १०. वार्षिक लेखे - एक दृष्टीक्षेप (आर्थिक वर्ष २०१७-१८)

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग हे राज्यातील विद्युत क्षेत्राच्या कामकाजाचे नियमन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले एक अर्ध-न्यायिक प्राधिकरण आहे. आयोगास महाराष्ट्र शासनाकडून दरवर्षी रुपये १ लाखांची लाक्षणिक मदत मिळते. आयोगाचे खर्च मुख्यत: मविनिआ (शुल्क आणि आकार) विनियम, २०१७ अंतर्गत वार्षिक परवाना शुल्क आणि याचिकांवरील शुल्क यापासून प्राप्त झालेल्या जमा रकमा आणि राष्ट्रीयकृत बँकांकडे ठेवलेल्या मुदत ठेवींवर मिळणाऱ्या व्याजातून भागविण्यात येतो.

आयोगास आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये मिळालेल्या एकूण जमा रकमेत वार्षिक परवाना शुल्काचा ५७.७४ टक्के (आ.व. २०१६-१७ मध्ये ६९.८४ टक्के) सर्वात मोठा वाटा आहे तर दुसरा सर्वात मोठा वाटा मुदत ठेवींवर मिळाणाऱ्या व्याजाचा ३२.९६ टक्के (आ.व. २०१६-१७ मध्ये २६.५२ टक्के) आहे. आयोगास मिळणाऱ्या वार्षिक जमा रकमेतून वेतन, कार्यालयीन भाडे, कार्यालयीन खर्च, सल्लागारांचे शुल्क, प्रशिक्षण खर्च इ. दैनंदिन बाबींवरील खर्च भागविण्यात येतो आणि उरलेली शिल्लक रक्कम दरवर्षी राष्ट्रीयकृत बँकांमधील मुदत ठेवींमध्ये गुंतविण्यात येते.

आयोगाकडून होणाऱ्या खर्चापैकी सर्वात मोठी खर्चाची बाब म्हणजे भाडे, दर व करांवरील खर्चाची रक्कम असून, त्यात मुख्यत्वेकरुन जागतिक व्यापार केंद्र येथील कार्यालयीन जागेच्या भाड्यासाठी द्याव्या लागणाऱ्या रकमेचा समावेश आहे. ही रक्कम आयोगाच्या एकूण खर्चाच्या ३३.६४ टक्के (आ.व. २०१६-१७ मध्ये ३२.०७ टक्के) आहे. दुसऱ्या क्रमांकावरील खर्चाची सर्वात मोठी बाब म्हणजे वेतनावरील खर्चाची बाब असून ती एकूण खर्चाच्या २७.६७ टक्के (आ.व. २०१६-१७ मध्ये २३.६३ टक्के) आहे. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर खर्चाची सर्वात मोठी बाब म्हणजे आयोगाला नियामक कार्यासंबंधी मदत व सल्ला देणाऱ्या तांत्रिक, कायदेशीर आणि वित्तीय सल्लागारांना द्याव्या लागणाऱ्या शुल्कावरील खर्चाची रक्कम असून ही एकूण खर्चाच्या २१.२३ टक्के (आ.व. २०१६-१७ मध्ये २६.२७ टक्के) आहे.

आयोगाची मुंबई व नागपूर येथे विद्युत लोकपाल यांची कार्यालये देखील आहेत. या कार्यालयांचे वेतन आणि अन्य सर्व दैनंदिन खर्च हा आयोगाकडून करण्यात येतो आणि तो आयोगाच्या एकूण खर्चाच्या ८.८४ टक्के (आ.व. २०१६-१७ मध्ये ८.४५ टक्के) इतका दरवर्षी होत आहे. कंसात दाखविलेली आकडेवारी मागील आर्थिक वर्षात तत्सम शीर्षासाठीची आकडेवारी आहे.

आयोगाची ३१ मार्च, २०१८ अखेरची राष्ट्रीयकृत बँकांमधील मुदत ठेवीमधील एकूण संचयी गुंतवणूक रु. १६५.६७ कोटी आहे.

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये एकूण जमा रक्कम रु. २६.८३ कोटी होती व एकूण खर्च रु. १९.०१ कोटी होता व उरलेली एकूण नक्त शिल्लक रु. ७.८२ कोटी राष्ट्रीयकृत बँकांमधील मुदत ठेवींमध्ये गुंतविण्यात आली आहे.

## आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्राप्त झालेल्या रकमा टक्केवारीत दाखविणारा तक्ता




## आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये झालेला खर्च टक्केवारीत दाखविणारा तक्ता



## परिशिष्ट १ – ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी आय–व्यय लेखा

| आय | चालू वर्ष २०१७–१८ | मागील वर्ष २०१६–१७ |
|---|---|---|
| **१ ) सुरुवातीची शिल्लक** | १,७२७,७२१,१०५.३३ | १,५३०,८७८,०४६.०२ |
| (अ) रोख शिल्लक | ३४,८३३.०० | ११,५७८.०० |
| (ब) बँकेतील शिल्लक (एसबीआय ) | | |
| (१) चालू खात्यात | ३८४,४३९.१० | – |
| (२) ठेव खात्यात | १,६८५,३७०,२३३.०० | १,५२१,०७८,३६८.०० |
| (३) बचत खात्यात | ४१,९३१,६००.२३ | ९,७८८,१००.०२ |
| **२ ) प्राप्त अनुदान** | **१६०,०००.००** | **९०,०००.००** |
| (अ)महाराष्ट्र शासनाचे अनुदान | १६०,०००.०० | ९०,०००.०० |
| (ब)अन्य स्रोतांकडून (तपशील) | | |
| भांडवली खर्चासाठी अनुदान | – | – |
| महसुली खर्चासाठी अनुदान | – | – |
| **३ ) खालील गुंतवणुकींपासून मिळालेले उत्पन्न** | | |
| (अ) राखून ठेवलेले /एंडोमेंटचे निधी | – | – |
| (ब) स्व–निधी (अन्य गुंतवणुका) | – | – |
| **४ ) आयोगाकडील जमा रकमा** | | |
| (अ)आयोगाने आकारलेले शुल्क | **२१०,५५२,५२१.००** | **३७७,१६८,८५५.००** |
| (१) सुरुवातीच्या परवान्यासाठी शुल्क | – | – |
| (२) वार्षिक परवाना शुल्क | १८३,५२९,९२४.०० | ३५१,४३२,३९३.०० |
| (३) व्यापारी परवान्यासाठी शुल्क | – | – |
| (४) माहितीच्या अधिकारासाठी शुल्क | ३७०.०० | २,१८८.०० |
| (५) दस्तवेजांसाठी शुल्क | ५,८३२.०० | १७,०३८.०० |
| (६) वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठी शुल्क | – | – |
| (७) तपासणीसाठी शुल्क | – | – |
| (८) अर्ज दाखल करण्यासाठी शुल्क | २७,०१०,३१०.०० | १८,००५,८९६.०० |
| (९) नोकरीसाठीच्या अर्जाचे शुल्क | – | – |
| (१०)वार्षिक वीज दराच्या आढाव्यासाठी शुल्क | – | – |
| (११)वीज दराच्या निश्चितीकरणासाठी शुल्क | – | – |
| (१२)वार्षिक परवाना शुल्क विलंबाने भरण्यासासाठीचा दंड | ६,०८५.०० | ७,७११,३४०.०० |
| **( ब ) प्राप्त व्याज** | **२१,५२०,७९२.००** | **१६६,१५९,०८३.००** |
| (१) बँकेतील ठेवींवर | २१,५१७,८०६.०० | १६६,१५९,०८३.०० |
| (२) कर्मचारी इ.ना दिलेल्या कर्जांवर व अग्रिमांवर | २,९८६.०० | – |
| **( क ) अन्य उत्पन्न** | **७४,९११.००** | **५४०,२८१.००** |
| (१) संकीर्ण जमा | ७४,९११.०० | ५४०,२८१.०० |
| **शिल्लक पुढील पानावर** | **१,९६०,०२९,३२९.३३** | **२,०७४,८३६,२६५.०२** |

| व्यय | चालू वर्ष २०१७–१८ | मागील वर्ष २०१६–१७ |
|---|---|---|
| **१ ) खर्च** | | |
| **( अ ) आस्थापना खर्च** | **५९,५०३,९२९.००** | **४०,६२७,४८८.००** |
| (१) आयोगाचे अध्यक्ष, सदस्य व सचिव यांचे वेतन व भत्ते | ९,५८६,३०१.०० | ३,२२५,१०२.०० |
| (२) अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते | ४७,५४१,६६८.०० | ३५,३३९,४००.०० |
| (३) बोनस व मानधन | – | – |
| (४) अतिकालिक भत्ता | १९०,४१४.०० | २७९,८७६.०० |
| (५) वैद्यकीय व आरोग्य सेवा सुविधा | १,५८२,६६७.०० | १,४२१,९७१.०० |
| (६) अन्य कोणतीही बाब | | |
| सदस्यांचे निवास भाडे | – | – |
| बेस्ट कर्मचाऱ्यांच्या वेतनाची प्रतिपूर्ती | – | – |
| रजा प्रवास सवलत | २०३,८८०.०० | – |
| प्रोत्साहने | – | – |
| अन्य भत्ते (दूरध्वनी आणि नियतकालिके) | – | – |
| (७) भ.नि. निधीची वर्गणी | – | – |
| (८) अन्य कोणत्याही निधीला वर्गणी | – | – |
| (९) कर्मचारी कल्याण निधी | ३९८,९९९.०० | ३६१,१३९.०० |
| (१०)कर्मचाऱ्यांना निवृत्तीविषयक मिळणाऱ्या लाभांवरील खर्च | – | – |
| (११)विद्यावेतनधारी नियामक विश्लेषकांवरील खर्च | – | – |
| **( ब ) अन्य प्रशासकीय खर्च** | **१४१,८३१,१३३.२३** | **१३४,७४९,४८५.७९** |
| (१) खरेदी | – | – |
| (२) वाहणावळ खर्च | – | – |
| (३) विद्युत आणि वीज | १,२०५,९३९.०० | १,२१४,०३६.०० |
| (४) पाणी आकार | – | – |
| (५) विमा | – | – |
| (६) दुरुस्ती,देखभाल व नूतनीकरण | ४४३,९७३.०० | ३४४,२८४.०० |
| (७) भाडे, दर व कर | ६९,२८१,७६८.०० | ६२,०५५,९८७.०० |
| (८) वाहने चालविण्याचा व देखभालीचा खर्च | ३,२८९,७५०.५० | ३,०७४,९८५.०० |
| (९) टपाल, दूरध्वनी आणि दूरसंचार | ५५४,६८८.०० | ३५०,४६५.०० |
| (१०)छपाई व लेखनसामग्री | ५४२,२५४.०० | ७२२,०४६.०० |
| (११)प्रवास व वाहन खर्च | | |
| परदेश प्रवास | १९०,२५८.०० | ३७२,९५३.०० |
| देशांतर्गत प्रवास | ५९५,३३१.०० | १,३५८,८६१.०० |
| वाहन खर्च | १५,५४५.०० | ३७,२५७.०० |
| (१२) चर्चासत्रे/कार्यशाळांवरील खर्च | – | – |
| (१३) प्रशिक्षण सत्रांवरील खर्च | ३७८,५६९.०० | २०१,०३३.०० |
| (१४) वर्गण्यांवरील खर्च | १,५०२,४९४.०० | १,३५१,०३२.०० |
| (१५) शुल्कांवरील खर्च | – | – |
| (१६) लेखापरीक्षकांचा मोबदला | २७५,७८७.०० | २८५,८३६.०० |
| (१७) आदरातिथ्यावरील खर्च | – | – |
| **शिल्लक पुढील पानावर** | **२०१,३३५,०६२.२३** | **१७५,३७६,९७३.७९** |

| आय | चालू वर्ष २०१७-१८ | मागील वर्ष २०१६-१७ |
|---|---|---|
| **मागील पानावरुन** | **१,९६०,०२९,३२९.३३** | **२,०७४,८३६,२६५.०२** |
| **( ड ) गुंतवणुका** | – | – |
| (१) रोखीकृत केलेल्या गुंतवणुकींचे दर्शनी मूल्य | – | – |
| (२) गुंतवणुकींवरील व्याज | – | – |
| **५ ) कर्मचाऱ्यांकडून अग्रिमांची वसूली** | **३,७४७,२४२.००** | **३,९४८,३५०.००** |
| (१) गृहबांधणी अग्रिम | ३,०७२,१६२.०० | १,२१२,११४.०० |
| (२) मोटर कार/ वैयक्तिक संगणक अग्रिम/ स्कुटर/मोटर सायकल अग्रिम | ८८,९२६.०० | ४३,४०२.०० |
| (३) अन्य अग्रिम | – | – |
| कर्ज हप्ता | – | – |
| खर्चासाठी अग्रिम | ४२२,१५४.०० | २,४९२,८३४.०० |
| वेतनापोटी अग्रिम | – | – |
| (४) उत्सवासाठी अग्रिम | १६४,०००.०० | २००,०००.०० |
| **६ ) आकस्मिक अग्रिमांची वसुली** | **–** | **–** |
| (१) सार्वजनिक बांधकाम विभागाला अग्रिम | – | – |
| (२) पुरवठादारांना अग्रिम | – | – |
| (३) अन्य अग्रिम | – | – |
| **७ ) अन्य ठेवी** | **१,०४८,७३४,५९२.००** | **४,५६२,३७१,३९०.००** |
| (१) सुरक्षा अनामत | ९६,०२०.०० | ३११,९९०.०० |
| (२) इसारा अनामत रक्कम | ९८३,०००.०० | ३२०,०००.०० |
| (३) अन्य कोणत्याही ठेवी | | |
| दूरध्वनी ठेवी | – | – |
| अन्य ठेवी | ३५६,७०५,५७२.०० | ३,९२२,०००,०००.०० |
| लघु मुदतीच्या ठेवी | ६९०,९५०,०००.०० | ६३९,७३९,४००.०० |
| **८ ) प्रदाने जमा रकमा** | **१७,५६९,०८०.००** | **१७,४३३,८४९.००** |
| (अ) प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांकडून वसुली | – | – |
| (ब) परवाना शुल्क | – | – |
| (क) प्राप्ति-कर (टीडीएस) | १३,०६२,३७४.०० | १३,८२८,६५७.०० |
| (ड) अधिभार | – | – |
| (इ) जीएसटी | ७२०,७४१.०० | – |
| (फ) केंद्र सरकारी आरोग्य योजना | १,५६०.०० | २,०००.०० |
| (ग) पोस्टल विमा योजना | – | – |
| (ह) अन्य कोणतेही | | |
| सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी | ५२०,४८४.०० | ६९३,०००.०० |
| गट विमा योजना | ४७,११८.०० | १४,८०४.०० |
| व्यावसायिक कर | १९,९५०.०० | १०५,४००.०० |
| मविनिआ कर्मचारी पी एफ मधील हिस्सा | २,९६४,३५४.०० | २,६८८,३१६.०० |
| निवासी भाडे | – | १०,५६५.०० |
| घरभाडे भत्ता | ९,२२४.०० | १३,८३६.०० |
| केंद्रीय भविष्य निर्वाह निधी | १३५,७८०.०० | ३३,९४५.०० |
| गृहनिर्माण परवाना शुल्क | ८७,४९५.०० | ४५,३२६.०० |
| **शिल्लक पुढील पानावर** | **३,०३०,०८०,२४३.३३** | **६,६५८,५८९,८५४.०२** |

| व्यय | चालू वर्ष २०१७-१८ | मागील वर्ष २०१६-१७ |
|---|---|---|
| **मागील पानावरुन** | **२०१,३३५,०६२.२३** | **१७५,३७६,९७३.७९** |
| (१८) व्यावसायिकांचे आकार | ३९,२५९,७०३.०० | ५२,९९२,४०१.०० |
| (१९) वर्तमानपत्रे/नियतकालिके | ३२,६७८.०० | ३७,३६८.०० |
| (२०) निर्लेखित केलेली बुडीत रक्कम | – | – |
| (२१) जाहिरात व प्रसिध्दी | ४,५०९,७४६.०० | ४,०२०,६६९.०० |
| (२२) अन्य | | |
| बँक आकार | १४,५८३.७३ | ७,३८५.७९ |
| कार्यालयीन खर्च | ३,१६७,५२४.०० | १,९५९,४३५.०० |
| उपकरणांचे भाडे | २१७,९२७.०० | ३६६,२९८.०० |
| वापरुन संपणारी कार्यालयीन सामग्री | – | – |
| जाहीर सुनावण्यांवरील खर्च | ४५,३१४.०० | २,२७६,६१२.०० |
| बैठकांवरील खर्च | ३१६,२९७.०० | ८५,८७६.०० |
| संगणकांवरील खर्च | ८३६,९०१.०० | १,२९५,३३५.०० |
| संकीर्ण खर्च | १५,१५४,१०३.०० | ३३९,३३१.०० |
| (२३)ताळमेळ समायोजन लेखा | – | – |
| **२ ) शुल्काचा परतावा** | | |
| **३ ) केलेल्या गुंतवणुका व ठेवी** | **१,०३७,१७८,८५८.००** | **४,५८८,६४८,५६१.००** |
| (अ)गुंतवणुका | | |
| (१) राखून ठेवलेल्या/एंडोमेंट निधीतून केलेल्या गुंतवणुका | – | – |
| (२) स्व-निधीतून केलेल्या गुंतवणुका | – | – |
| (ब) ठेवी | – | ६६६,२६६,८११.०० |
| (१) सुरक्षा अनामत | ३५,०००.०० | १२६,७५०.०० |
| (२) इसारा अनामत रक्कम | ८७०,०००.०० | २५५,०००.०० |
| (३) लघु मुदतीच्या ठेवी | १,०३६,२७३,८५८.०० | ३,९२२,०००,०००.०० |
| (क)पुरवठादारांना अग्रिम | – | – |
| **४ ) कर्मचाऱ्यांना अग्रिम** | **१०,७६०,८८०.००** | **२,८९१,१८१.००** |
| (१) गृह निर्माण अग्रिम | ९,७७२,८५०.०० | – |
| (२) मोटर कार/वैयक्तिक संगणक अग्रिम/ स्कुटर/मोटर सायकल अग्रिम | ४९,०००.०० | ६०,०००.०० |
| (३) उत्सव अग्रिम | १५०,०००.०० | १७१,०००.०० |
| (४) अन्य अग्रिम | – | – |
| कर्ज हप्ता | – | – |
| खर्चासाठी अग्रिम | ७८९,०३०.०० | २,६६०,१८१.०० |
| स्थिर मत्तांपोटी अग्रिम | – | – |
| **५ ) आकस्मिक अग्रिमांची वसुली** | **५,५४५,६८८.००** | **२८,५००.००** |
| (१) सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेला अग्रिम | ८९२,८७५.०० | – |
| (२) पुरवठादारांना दिलेले अग्रिम | – | – |
| (३) अन्य अग्रिम | | |
| शुल्काचा परतावा | ४,६५२,८१३.०० | २८,५००.०० |
| **६ ) अन्य प्रदाने** | **८९,३५५,०९९.००** | **१४५,८३३,८३६.००** |
| (अ) जीपीएफ/सीपीएफ | ७१२,२०९.०० | ७२२,०००.०० |
| **शिल्लक पुढील पानावर** | **१,३४४,१७५,५८७.२३** | **४,९१२,७७९,०५१.७९** |

| आय | चालू वर्ष २०१७-१८ | मागील वर्ष २०१६-१७ |
|---|---|---|
| मागील पानावरुन | ३,०३०,०८०,२४३.३३ | ६,६५८,५८९,८५४.०२ |
| **९ ) खर्चाची प्रतिपूर्ती आणि परतावा** | ३,६५६,४६६.०० | ७२३,४२९.०० |
| (१) व्यावसायिक खर्च | ९३,२६८.०० | ३७५,६४४.०० |
| (२) कार्यालयीन खर्च | ६,१६५.०० | १५३,०००.०० |
| (३) दौरे व प्रवास | ९,१०९.०० | २,६३३.०० |
| (४) भाडे, दर व कर | - | - |
| (५) अन्य खर्च | १,५३९,१३१.०० | ५६,८०६.०० |
| (६) पगार आणि वेतन | २,००८,७९३.०० | १३५,३४६.०० |
| **१० ) स्थिर मत्तांची वसुली** | **३,४१०.००** | **४५०.००** |
| (अ) जमीन | - | - |
| (ब) इमारत | - | - |
| (क) फर्निचर | - | - |
| (ड) यंत्रसामग्री आणि उपकरणे | - | - |
| (इ) मोटर वाहन | - | - |
| (फ) पुस्तके आणि नियतकालिके | ९१०.०० | ४५०.०० |
| (ग) चालू भांडवली कामे | - | - |
| (ह) अन्य कोणतीही बाब | | |
| कार्यालयीन उपकरणे | - | - |
| अंतर्गत नूतनीकरण | - | - |
| संगणक | २,५००.०० | - |
| दूरध्वनी उपकरणे | - | - |
| इपीबीएक्स यंत्रणा | - | - |
| विद्युत संच मांडणी | - | - |
| **एकूण ( रुपये )** | **३,०३३,७४०,११९.३३** | **६,६५९,३१३,७३३.०२** |

| व्यय | चालू वर्ष २०१७-१८ | मागील वर्ष २०१६-१७ |
|---|---|---|
| मागील पानावरुन | १,३४४,१७५,५८७.२३ | ४,९१२,७७९,०५१.७९ |
| (ब) जीएसटी | ५३२,९८५.०० | - |
| (क) प्राप्ति-कर (टीडीएस) | ८४,४०९,०१५.०० | १४२,२५९,५३५.०० |
| (ड) केंद्र सरकारी आरोग्य योजना | - | २,०००.०० |
| (इ) पोस्टल विमा योजना | - | - |
| (फ) गट विमा योजना | ४९,०३८.०० | ८,०२४.०० |
| (ग) अन्य कोणतीही वसुली | | |
| सर्वसाधारण निर्वाह निधी | - | - |
| कर्ज वसुली प्रदान | - | - |
| व्यावसायिक कर | १२७,५५०.०० | १५९,४००.०० |
| मविनिआ कर्मचारी | | |
| भनिनि वर्गणी | ३,४३७,५२३.०० | २,६२६,९८६.०० |
| निवासी भाडे | - | १०,५६५.०० |
| घरभाडे भत्ता | - | - |
| अदत्त दायित्वे | - | - |
| गृह बांधणी अग्रिम | - | - |
| गृहनिर्माण परवाना शुल्क | ८६,७७९.०० | ४५,३२६.०० |
| **७ ) वर्गणी** | **१२,०२५,५००.००** | **१५,८२७,८०९.७०** |
| (अ) निवृत्तीवेतन व उपदान निधी | - | - |
| (ब) रजा वेतन व निवृत्तीवेतन वर्गणी | - | - |
| (क) अन्य वर्गणी | | |
| विद्युत लोकपालांना अनुदान | १२,०२५,५००.०० | १५,८२७,८०९.७० |
| **८ ) स्थिर मत्तांवरील खर्च** | **२,०२२,८८७.००** | **२,९८५,७६५.००** |
| (अ) जमीन | - | - |
| (ब) इमारत | - | - |
| (क) फर्निचर व फिक्स्चर्स | ६२,४९३.०० | - |
| (ड) यंत्रसामग्री आणि उपकरणे | - | - |
| (इ) मोटर वाहने | - | - |
| (फ) पुस्तके व नियतकालिके | २६,४७७.०० | १०,२३४.०० |
| (ग) चालू भांडवली कामे | १९७,९८६.०० | २,२४८,७४०.०० |
| (ह) अन्य कोणतीही बाब | | |
| कार्यालयीन साधनसामग्री | १४०,६९९.०० | ४९९.०० |
| अंतर्गत नुतनीकरण | - | ३११,४०१.०० |
| संगणक आणि सॉफ्टवेअर | १,५९५,२३२.०० | २८८,८९३.०० |
| दूरध्वनी उपकरणे | - | १२५,९९८.०० |
| इपीबीएक्स यंत्रणा | - | - |
| विद्युत संच मांडणी | - | - |
| **९ ) अखेरची शिल्लक** | **१,६७५,५१६,१४५.१०** | **१,७२७,७२१,१०६.५३** |
| (अ) रोख शिल्लक | ४८,२२६.०० | ३४,८३३.०० |
| (ब) बँक बॅलन्स (एसबीआय) | | |
| (१) चालू खात्यात | ३३१,९५३.६५ | ३८४,४४०.३० |
| (२) ठेव खात्यात | १,६५६,६७०,२३३.०० | १,६८५,३७०,२३३.०० |
| (३) बचत खात्यात | १८,४६५,७३२.४५ | ४१,९३१,६००.२३ |
| **एकूण ( रुपये )** | **३,०३३,७४०,११९.३३** | **६,६५९,३१३,७३३.०२** |

ठिकाण : मुंबई,

दिनांक : ११/०९/२०१८

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग करिता**

| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|
| सचिव | सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

## परिशिष्ट - २ : आयोगाने आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये पारित केलेले आदेश

| अ.क्र. | प्रकरण क्र. | विषय | आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २०१५ चा २७ | तिरोडा औष्णिक विद्युत केंद्रातून वीज पुरवठ्यासाठीच्या २०१४ च्या प्रकरण क्र. ६३ मध्ये दि. ०५.०५.२०१४ रोजी दिलेल्या आदेशामधील केंद्रातील उष्मांक दराच्या निकषांपासून फारकत घेतल्यामुळे वीज दरामध्ये समायोजन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड यांच्याशी झालेल्या वादाच्या संबंधात अदानी पॉवर महाराष्ट्र लि. यांची याचिका | ०७.०४.२०१७ |
| २ | २०१४ चा १९९ | मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जाला चुकीचा आणि विलंबाने दिलेला नकार किंवा प्रतिसाद न दिल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या ग्रीडमध्ये अंत:क्षेपित केलेल्या पवन ऊर्जेच्या प्रदानाकरिता साई सर्व्हिस प्रा. लि.ची याचिका | ११.०४.२०१७ |
| ३ | २०१६ चा ११३ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांनी अपिलीय प्राधिकरण, मुंबई यांच्या दिनांक २९.०५.२०१३ रोजीच्या आदेशाचे पालन न केल्यासंबंधात व्हीव्हीसी फार्मा ॲण्ड स्पेशालिटी केमिकल्स प्रा. लि. यांची याचिका | ११.०४.२०१७ |
| ४ | २०१७ चा ३३ | आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता नूतनशील ऊर्जेसाठीच्या सामान्य वीज दराचे निश्चितीकरण | २८.०४.२०१७ |
| ५ | २०१५ चा ३० | पुणे जिल्ह्यातील हिंजेवाडी येथील ब्ल्यु रिड्ज आयटी पार्ककरिता मानीव वितरण परवानाधारकाचा दर्जा पटलावर घेण्यासाठी आणि त्यांच्या वितरण परवान्याच्या अटी विनिर्दिष्ट करण्यासाठी फ्लॅगशिप डेव्हलेपमेंट प्रा. लि. ची याचिका | ०२.०५.२०१७ |
| ६ | २०१६ चा १४८ | विद्युत लोकपाल, मुंबई यांच्या दि. ०२.०८.२०१६ रोजीच्या आदेशाचे पालन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांनी न केल्यासंबंधात गुरेरा सिंथेटिक्स प्रा. लि. ची याचिका | ०३.०५.२०१७ |
| ७ | २०१७ चा २० | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. च्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण परिमंडल, यांनी २०१५ च्या प्र. क्र. ५९ मध्ये दि. ०३.०६.२०१६ च्या आदेशाचे पालन न केल्यासंबंधात लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लि. यांची याचिका | ०९.०५.२०१७ |
| ८ | २०१७ चा १८ | पवन ऊर्जा करारांतर्गत केलेल्या पवन ऊर्जेच्या विक्रीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. कडून येणे बाकी असलेली प्रदाने आणि विलंबित प्रदानावरील व्याजासंबंधात धानजी डेव्हलेपर्सची याचिका | १६.०५.२०१७ |
| ९ | २०१६ चा १६६ | पवन ऊर्जा करारांतर्गत केलेल्या पवन ऊर्जेच्या विक्रीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. कडून येणे बाकी असलेली प्रदाने आणि विलंबित प्रदानावरील व्याजासंबंधात राजलक्ष्मी मिनरल्सची याचिका | १६.०५.२०१७ |
| १० | २०१६ चा १५७ | पवन ऊर्जा करारांतर्गत केलेल्या पवन ऊर्जेच्या विक्रीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. कडून येणे बाकी असलेली प्रदाने आणि विलंबित प्रदानावरील व्याजासंबंधात विन्डमिल ओनर्स वेल्फअर्स असोसिएशनची याचिका | १६.०५.२०१७ |
| ११ | २०१६ चा ११८ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२ चा भंग केल्याबाबत श्री संजय ए. गावडे यांची याचिका | २६.०५.२०१७ |
| १२ | २०१६ चा १७० | बेस्ट उपक्रमाने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी केलेल्या नूतनशील उर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेची पडताळणी | ३०.०५.२०१७ |
| १३ | २०१५ चा ४० | अपिलीय न्यायाधिकरणाने दि. २८.११.२०१४ रोजी दिलेल्या विद्युत निवाड्याच्या अनुषंगाने मुंबई समांतर परवाना क्षेत्रात ग्राहकांच्या स्थलांतरासाठीच्या कार्यपध्दतीसंबंधात टाटा पॉवर कंपनी लि. (वितरण) ची याचिका | १२.०६.२०१७ |
| १४ | २०१४ चा १८२ | आयोगाने २०१४ च्या प्रकरण क्र. ९० मध्ये दि. १४.८.२०१४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने विद्युत जाळे उभारणीच्या सुधारीत आराखड्याच्या मान्यतेसाठी टाटा पॉवर कंपनी लि. (वितरण)ची याचिका | १२.०६.२०१७ |
| १५ | २०१६ चा ८ | २०१५ च्या प्रकरण क्र. ६५ मध्ये दि. ६.११.२०१५ रोजी दिलेल्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी पीटीसी इंडिया लि. ची याचिका | १५.०६.२०१७ |
| १६ | २०१६ चा १७२ | बेस्ट उपक्रमाने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी केलेल्या नूतनशील उर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेची पडताळणी | १६.०६.२०१७ |

| अ.क्र. | प्रकरण क्र. | विषय | आदेशाचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १७ | २०१६ चा १७१ | टाटा पॉवर कंपनी लि. (वितरण)ने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी केलेल्या नूतनशील उर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्याकांच्या पूर्ततेची पडताळणी | १६.०६.२०१७ |
| १८ | २०१६ चा १७४ | माइन्डस्पेस बिझनेस पार्क्स प्रा. लि. ने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी केलेल्या नूतनशील उर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्याकांच्या पूर्ततेची पडताळणी | २०.०६.२०१७ |
| १९ | २०१६ चा १२० आणि २०१६ चा संकीर्ण अर्ज क्र. १६ | सप्टेंबर आणि डिसेंबर, २०१६ मध्ये काही कालावधीसाठी मान्यता दिलेल्या भार नियमनाच्या कार्यपध्दतीमध्ये फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.ची याचिका<br>आणि<br>२०१६ च्या प्रकरण क्र. १२० मध्ये हस्तक्षेप करण्यासाठी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचा अर्ज | २०.०६.२०१७ |
| २० | २०१६ चा ८१ आणि २०१६ चा संकीर्ण अर्ज क्र.११ | वितरण परवानाधारकांकडून वसूल केल्या जाणाऱ्या इंधन समायोजन आकाराच्या कमाल मर्यादेत घट आणि त्याच्या पध्दतीमध्ये अन्य सुधारणा करण्यासाठी चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रिकल्चरची याचिका<br>आणि<br>२०१६ च्या प्रकरण क्र. ८१ मध्ये हस्तक्षेप करण्यासाठी बालाजी इलेक्ट्रो स्मेल्टर्स लि. चा अर्ज | २१.०६.२०१७ |
| २१ | २०१७ चा ४८ | गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि.ची वीज खरेदी कराराच्या मान्यतेसाठी आणि १९.४.२०१७ ते ३०.९.२०१७ पर्यंतच्या कालावधीसाठी दिवसाच्या २४ तासांकरिता (आरटीसी) २ मेगावॅट वीज आणि सर्वोच्च मागणीच्या कालावधीत १ मेगावॅट वीज प्राप्त करण्यासाठी वीज दराच्या स्वीकृतीकरिता याचिका | २१.०६.२०१७ |
| २२ | २०१६ चा ९२ | स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती संयत्राचे वाणिज्यिक तत्वावर कामकाज सुरु करण्याच्या दिनांकात वाढ करण्यासाठी आणि नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी येथील त्यांच्या स्वत:च्या औद्योगिक युनिटमध्ये मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून विजेचे वहन करण्यास परवानगी देण्यासाठी ग्रेस इंडस्ट्रीज लि.ची याचिका | २३.०६.२०१७ |
| २३ | २०१६ चा १३८ | २०१६ च्या प्रकरण क्र. ४६ मध्ये दिनांक ३०.८.२०१६ रोजी दिलेल्या बहु-वर्षीय वीज दर आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि.ची याचिका | ०३.०७.२०१७ |
| २४ | २०१६ चा १४६ | २०१५ च्या प्रकरण क्र. ७४ मध्ये दिनांक १६.०९.२०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.ची याचिका | ०३.०७.२०१७ |
| २५ | २०१६ चा १७३ | इंडियन रेल्वेने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी केलेल्या नूतनशील उर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्याकांच्या पूर्ततेची पडताळणी | ०४.०७.२०१७ |
| २६ | २०१६ चा १०१ आणि २०१७ चा संकीर्ण अर्ज क्र. ३ | १.१.२०१६ नंतर प्राप्त झालेल्या अर्जांसाठी अतिरिक्त पुरवठा आकारांचा परतावा देणे थांबवण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ची याचिका<br>आणि<br>२०१६ च्या प्रकरण क्र. १०१ मध्ये हस्तक्षेप करण्यासाठी श्री सुरेश संचेती यांचा अर्ज | ०७.०७.२०१७ |
| २७ | २०१५ चा ३२ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परीमंडल यांच्या दि. २८.११.२०१३ च्या आदेशाचे पालन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांनी न केल्यासंबंधात एम. आर. सिकॉन ॲग्रो प्रोसेसर्स प्रा. लि. ची याचिका | ०७.०७.२०१७ |
| २८ | २०१६ चा १७७ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ने अपिलीय प्राधिकरणाने दिलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत महिन्द्रा लाईफस्पेस डेव्हलपर्स लि.ची याचिका | ११.०७.२०१७ |
| २९ | २०१६ चा १५८ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परीमंडल यांच्या दि. ०५.०८.२०१६ रोजीच्या आदेशाचे पालन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांनी न केल्यासंबंधात श्री सुरेश शिवराम सावंत यांची याचिका | ११.०७.२०१७ |
| ३० | २०१६ चा ९८ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परीमंडल, यांच्या दि. २०.०५.२०१६ च्या आदेशाचे पालन न महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांनी न केल्यासंबंधात हरमन फिनोकेम लि.ची याचिका | ११.०७.२०१७ |
| ३१ | २०१७ चा १४ | विद्युत लोकपाल, मुंबई यांनी दि. १४.१०.२०१६ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांनी न केल्यासंबंधात ओम श्री ॲग्रो-टेक लि. ची याचिका | ११.०७.२०१७ |
| ३२ | २०१६ चा ७८ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ने २०१३ च्या प्रकरण क्र. ९५ आणि २०१४ चा संकीर्ण अर्ज क्र. १८७ मध्ये दिलेल्या आदेशांचा भंग, आणि वेळेच्या आधी वसूल केलेल्या अतिरिक्त ऊर्जा आकारांच्या परताव्यासाठी पॉल स्ट्रीप्स ॲण्ड ट्युब्स प्रा. लि.ची याचिका | १३.०७.२०१७ |

| अ.क्र. | प्रकरण क्र. | विषय | आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३३ | २०१५ चा १२३ | महापारेषण कंपनीच्या ४०० केव्ही कोराडी २ – वर्धा लाईन वर त्यांच्या ४०० केव्हीडी/सी लाईन एलआयएलओ साठी पारेषण परवान्याच्या मंजुरीसाठी आयईपीएलची याचिका | १४.०७.२०१७ |
| ३४ | २०१७ चा ३५ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (वितरण) ची आर्थिक वर्ष २०१६–१७ आणि २०१७–१८ साठी नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्यांकाच्या क्रमवर्ती पूर्ततेस परवानगी देण्यासाठी याचिका | १४.०७.२०१७ |
| ३५ | २०१६ चा ११० | टाटा पॉवर कंपनी लि. (पारेषण) ची २०१६ च्या प्रकरण क्र. २२ मध्ये दिनांक ३०.६.२०१६ रोजी दिलेल्या बहु–वर्षीय वीज दर आदेशाच्या काही तरतुदींच्या पुनर्विलोकनासाठी याचिका | १९.०७.२०१७ |
| ३६ | २०१६ चा १५१ | कृतीची मानके विनियम, २०१४ अंतर्गत महानगर पालिकेच्या बाहेरील क्षेत्रासाठी संलग्न भार मर्यादेत वाढ करण्याच्या संबंधात २०१६ च्या प्रकरण क्र. ९ मध्ये दि. १६.०५.२०१६ रोजी दिलेल्या आदेशांच्या पुनर्विलोकनासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.ची याचिका | २६.०७.२०१७ |
| ३७ | २०१६ चा १२४ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ची बहु–वर्षीय वीज दर विनियम, २०१५ च्या इंधन समायोजन आकाराच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका | २७.०७.२०१७ |
| ३८ | २०१५ चा १४१ | वीज निर्मिती केंद्र सुरु करण्यासाठी पुरविण्यात आलेल्या प्रारंभीच्या विजेला (स्टार्ट–अप पॉवर) लागू असलेला वीज दर, आणि दिनांक २२.०४.२०१० आणि ५.०६.२०१० रोजी झालेल्या वीज खरेदी करारांतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.ला पुरवठा केलेल्या विजेतून पुरविण्यात आलेल्या प्रारंभीच्या विजेची परतफेड (नेटींग) करण्यासाठी रत्तन इंडिया पॉवर लि. ची याचिका | ३१.०७.२०१७ |
| ३९ | २०१७ चा ६ | सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेसाठी वीज दराच्या प्रयोज्यतेसंबंधी स्पष्टीकरण मागण्यासाठी औरंगाबाद महानगर पालिकेची याचिका | ०१.०८.२०१७ |
| ४० | २०१६ चा ३७ आणि २०१६ च्या प्रकरण क्र. ३७ मधील २०१६ चा संकीर्ण अर्ज क्र.५ | आयडियल एनर्जी प्रोजेक्ट्स लि. सोबत केलेला वीज खरेदी करार स्थगित ठेवण्यासाठी टाटा पॉवर कंपनी लि. (वितरण) ची याचिका | ०२.०८.२०१७ |
| ४१ | २०१७ चा ४७ | निदार युटीलिटीज पनवेल एलएलपीची पनवेल, जिल्हा रायगड येथील त्यांच्या सेझ क्षेत्रासाठी तात्पुरत्या वीज दराच्या मान्यतेसाठी याचिका | ०३.०८.२०१७ |
| ४२ | २०१७ चा ११६ | महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि.ची वीज प्राप्तीची योजना आणि १.०९.२०१७ पासून एक वर्षासाठी वीज प्राप्त करण्यासाठी स्पर्धात्मक बोली लावण्यासाठी मान्यता मिळविण्यासाठी याचिका | ०४.०८.२०१७ |
| ४३ | २०१६ चा १६० | कोल्हापूर येथील महानगरपालिका घन–कचऱ्यावर आधारित वीज प्रकल्पाच्या वीज दराची निश्चिती केलेल्या २०१५ च्या प्रकरण क्र. ८७ मध्ये दिनांक १०.१०.२०१६ रोजीच्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी कोल्हापूर ग्रीन एनर्जी प्रा. लि. ची याचिका | ०७.०८.२०१७ |
| ४४ | २०१६ चा ९३ आणि २०१६ चा संकीर्ण अर्ज क्र. २५ | टाटा पॉवर कंपनी लि. (वितरण)कडून वीज पुरवठा घेतलेल्या त्यांच्या क्षेत्रातील ६ ग्राहकांकडून क्रॉस सबसिडी अधिभाराच्या दाव्यासंबधातील सन २०१५ च्या प्रकरण क्र. ४३ मध्ये दि. १०.५.२०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ची याचिका<br>आणि<br>२०१६ च्या प्रकरण क्र. ९३ मधील याचिका अ–दखलयोग्य म्हणून खारीज करण्यासाठी टाटा पॉवर कंपनी लि. (वितरण) ची याचिका | ०९.०८.२०१७ |
| ४५ | २०१६ चा १३९ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ने वितरण मुक्त प्रवेश विनियम, २०१६ चे पालन न करण्याबाबत आणि चुकीची मासिक देयक पध्दती अवलंबण्याबाबत अल्ट्रा टेक सिमेंट लि.ची याचिका | ११.०८.२०१७ |
| ४६ | २०१५ चा ५० | अपिलीय न्यायाधिकरणाने २०१२ च्या अपील क्र. २४६ मध्ये दिनांक २८.११.२०१४ रोजी दिलेल्या विद्युत निवाड्यानुसार लक्षणीय गुंतवणूक करण्यात आलेल्या वितरण जाळ्याच्या विकास कामांचे कार्यान्वयन आणि भांडवलीकरणाच्या मान्यतेसाठी टाटा पॉवर कंपनी लि. (वितरण)ची याचिका | १४.०८.२०१७ |

| अ.क्र. | प्रकरण क्र. | विषय | आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ४७ | २०१६ चा ९४ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.चा पारेषण परवाना क्र. २०११ चा १ (दुसरी सुधारणा) मध्ये सुधारणा करण्यासाठी अर्ज | १८.०८.२०१७ |
| ४८ | २०१६ चा ११७ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. सोबत दि. २३.२.२०१० रोजी झालेल्या वीज खरेदी करारामधील वीज दरात 'कायद्यातील बदलामुळे' सुधारणा करण्यासाठी जेएसडब्ल्यु एनर्जी लि. ची याचिका | २३.०८.२०१७ |
| ४९ | २०१६ चा ९० | दि. २३.२.२०१० रोजीच्या वीज खरेदी करारांतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. कडून प्रोत्साहन-अधिदानाच्या वसुली संबंधात जेएसडब्ल्यु एनर्जी लि.ची याचिका | २९.०८.२०१७ |
| ५० | २०१७ चा १२५ | महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि. ची वीज खरेदी करारास मान्यता देण्यासाठी आणि १.९.२०१७ ते ३१.८.२०१८ पर्यंत ४-९ मेगावॅट अल्प-कालीन वीज खरेदीसाठी वीज दराच्या स्वीकृतीकरिता याचिका | ३०.०८.२०१७ |
| ५१ | २०१६ चा १६७ | कृषी उत्पादनांसाठीच्या पूर्व-शीतलन आणि शीतगृह संचांच्या वीज दरासंबंधातील २०१६ च्या प्रकरण क्र. ४८ मध्ये दि. ३.११.२०१६ रोजीच्या बहु-वर्षीय वीज दर आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी महा कोल्ड स्टोअरेज असोसिएशनची याचिका | ३०.०८.२०१७ |
| ५२ | २०१६ चा ११९ | महाराष्ट्रातील वितरण परवानाधारकांना विजेची विक्री करण्यासाठी मिनि आणि मायक्रो जल-विद्युत प्रकल्पाकरिता सामान्य भांडवली खर्च आणि वीज दराच्या निश्चितीकरणासाठी श्री टी.पी. वर्तक यांची याचिका | ३१.०८.२०१७ |
| ५३ | २०१७ चा १२४ | स्वतंत्र वीज निर्मात्यांच्या निर्मिती केंद्रातील कोळशाच्या वापरामधील लवचिकतेसंबंधात मार्ग ४ मार्गदर्शिकेंतर्गत नोव्हेंबर, २०१७ पासून ८ महिन्यांसाठी ४०० मेगावॅट वीज प्राप्तीसाठी वीज दर-निहाय बोली प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. कडून संमती मिळविण्यासाठी रत्तन इंडिया पॉवर लि. ची याचिका | ०६.०९.२०१७ |
